# अनुक्रमणिका


**4**
अध्यक्षीय– जयंत पाटील
अर्थसंकल्प : महाराष्ट्रावर अन्याय करणारा

**5**
प्रबंध संपादकीय– दिलीप वळसे पाटील
आधारभूत किमतीचा निर्णय कधी करणार?

**6**
संपादकीय– डॉ. सुधीर भोंगळे
गरीब माणूस अदृश्य

**10**
मालेगाव नगरसेवकांचा राष्ट्रवादीत प्रवेश,भाषणे :
१) अजित पवार–१०
२) जयंत पाटील–१४
३) छगन भुजबळ–१६
४) नवाब मलिक–१८
५) रशिद शेख–१८
६) ताहिरा शेख–१९
७) आसिफ शेख–१९

**22**
उत्तर प्रदेश आणि अस्वस्थ भाजप
– अनंत बागाईतकर

**30**
सातारा येथील राष्ट्रवादी भवनाचे नूतनीकरण समारंभ
सर्वसामान्यांना बरोबर घेत आपल्या
पक्षाची ताकद वाढवलीच पाहिजे
– अजित पवार

**38**
अर्थसंकल्प–२०२२
अपारदर्शक आणि संदिग्ध
– अभय टिळक

**46**
महाराष्ट्रावर अन्यायाची केंद्र सरकारची परंपरा
यंदाच्या अर्थसंकल्पातही कायम
– अजित पवार

**48**
बूटकॅम्प समारोप समारंभ,बारामती,भाषणे–
१) शरद पवार–५०
२) विवेक सावंत–५४
३) अजित पवार– ५८
४) सुप्रिया सुळे–६२
५) प्रतापराव पवार–६६
६) राजेंद्र पवार–६८

**72**
वाढते केंद्रीकरण : केंद्र व राज्यांमध्ये
वाढता तणाव
– वसीम अहमद


**78**
आधुनिक मुंबईचे जनक– जगन्नाथ शंकरशेठ मुर्कुटे
– प्रा.डॉ. गणेश राऊत

**84**
महाराष्ट्राच्या हरितक्रांतीचे जनक
राजर्षी शाहू महाराज
– डॉ. जयसिंगराव पवार

**92**
घंटाकर्ण– कानोकानी (राजकीय किस्से)

**100**
दोन संत, विचार एकच– सचिन परब

**102**
शेवटचे पान– शिक्षणाचा खेळखंडोबा
– हेमन्त टकले



**संचालक**
**हेमन्त टकले**
**प्रबंध संपादक**
**दिलीप वळसे पाटील**
**संपादक**
**डॉ. सुधीर भोंगळे**
या अंकात प्रसिद्ध झालेल्या मतांशी प्रबंध संपादक, संपादक व संचालक सहमत असतीलच असे नाही.

**संपादकीय पत्रव्यवहार**
ठाकरसी हाऊस,
जे.एन.हेरेडिया मार्ग,
बॅलार्ड इस्टेट,
मुंबई-४०० ०३८
०२२-३५३४७४००/०१
**कला निर्देशन**
धनंजय सस्तकर
**मांडणी**
दिलीप रोडे

**वर्गणीचे दर–**
**वार्षिक रु. ५००/–**
**वर्गणीचा धनादेश**
**'हेमन्त मल्टिमीडिया ओपीसी प्रा.लि.'**
या नावाने काढावा.
**www.ncp.org.in**
यावर मासिक उपलब्ध
**फोटो**
प्रशांत चव्हाण

**मुद्रक, प्रकाशक**
**हेमन्त प्रभाकर टकले** यांनी **'हेमन्त मल्टीमीडिया ओपीसी प्रा.लि.'** च्या वतीने मीडिया आर ॲण्ड डी., १३, अमृत मधुरा, प्लॉट नं. ३, सेक्टर-३,आरएससी-२८, चारकोप, कांदिवली (पश्चिम), मुंबई-४०००६७ येथे छापून ७८, रेशमभवन, ६ वा मजला, वीर नरिमन रोड, चर्चगेट, मुंबई-४०००२० येथून अंक प्रकाशित केले.

अध्यक्षीय




# अर्थसंकल्प-२०२२ महाराष्ट्रावर मोठा अन्याय करणारा

विकास प्रक्रियेच्या परिचालनाचे फळ या भावनेतून सामाजिक कल्याण या विषयाकडे पाहिले जाते. अर्थसंकल्पात केली जाणारी तरतूद हे एक साधन आहे. सरकारच्या प्रत्येक खर्चातून कोणाचे ना कोणाचे काही ना काही कल्याण साधले जाते असे आजपर्यंत आपण सारेजण मानीत आलो आहोत. पण खऱ्या गरजू व सामान्य माणसांपर्यंत ही खर्चाची रक्कम किती पोहोचते हा अभ्यास व संशोधनाचाच विषय आहे. सामाजिक कल्याणाच्या खोट्या आणि फसव्या घोषणा करून २०१४ पासून सत्तेवर आलेले केंद्रातील मोदी सरकार अजूनही लोकांना भूलथापा देऊन मुर्ख बनविण्याचा प्रयत्न करीत आहे. केंद्रीय अर्थमंत्री मा. निर्मला सीतारामन यांनी २०२२-२३ या वर्षाचा जो अर्थसंकल्प सादर केला आहे तो याचा उत्तम नमुना आहे. वास्तविक अर्थसंकल्प हा एक-दोन वर्षांचा पुढचा काळ लक्षात घेऊन सादर केला जातो. मा. पंतप्रधान आणि मा. अर्थमंत्री मात्र म्हणतात, 'पुढच्या २५ वर्षांचा विचार करून हा अर्थसंकल्प सादर केला आहे.' एक-दोन वर्षातली आश्वासने जिथे सरकारला पूर्ण करता आली नाहीत तिथे पुढच्या २५ वर्षातली आश्वासने पूर्ण करायला मोदी-सीतारामन हे काही पुढची २५ वर्ष पदांवर राहणार आहेत का? लोकांना मूर्ख बनवायचे म्हणजे तरी किती?

लोकांच्या खिशातून वेगवेगळ्या मार्गाने पैसे कसे काढून घेता येतील आणि मोठ्या धनिक भांडवलदारांची व उद्योगपतींची घरे कशी भरता येतील याचेच सातत्याने चिंतन करून तद्नुषंगिक कार्यप्रणाली मोदी सरकार अंमलात आणत आले आहे. सर्वसामान्य गोरगरीब माणूस, शेतकरी, मजूर, कष्टकरी, कामगार केंद्र सरकारने केव्हाच वाऱ्यावर सोडून दिला आहे. शक्यतो खर्च करायला लागू नये मात्र सरकारची तिजोरी कायम भरतच गेली पाहिजे असे यांचे धोरण आहे. तिजोरीतला पैसा कुठे जातो आहे हे मात्र कुणी विचारायचे नाही. खर्चाच्या घटकांमध्ये यंदा मोठी कपात केली आहे. शेतकऱ्यांना खतासाठी जे अनुदान दिले जाते ते ३५ हजार कोटींनी कमी केले आहे. अन्न अनुदान ८० हजार कोटींनी तर पेट्रोलियमवरील अनुदान सात हजार कोटींनी कमी केले आहे. कोरोनाच्या संकटाचा देश मोठा सामना करीत असताना आरोग्यासाठीची तरतूद वाढविण्याऐवजी उलट ती एक हजार कोटींनी कमी केली आहे. ग्रामीण विकासावरील खर्च सातशे कोटींनी कमी करून मनरेगावरील खर्च २५ हजार कोटींनी कमी केला आहे. रोजगार व कौशल्य विकास कार्यक्रमावरचा खर्चही एक हजार कोटींनी कमी केला आहे. गरिबांना गॅस कनेक्शन देण्याच्या खर्चात आठशे कोटींची कपात करण्यात आली आहे. राष्ट्रीय अन्न सुरक्षा कायद्यांतर्गतची तरतूद ७० हजार कोटींनी कमी केली आहे.

शेतकरी आंदोलनामुळे तीनही कृषी बिले मोदी सरकारला मागे घ्यावी लागल्यामुळे जी नामुष्की ओढवली व अपमान झाला त्याचा वचपा घ्यायचा म्हणून अर्थसंकल्पात कृषी क्षेत्रासाठी एकही महत्वाकांक्षी योजना जाहीर झाली नाही. देशातील छोटा व अल्पभूधारक शेतकरी तर वाऱ्यावर सोडून दिला आहे. गहू व तांदूळाच्या हमीभावाची हमी देऊन उच्चांकी दराने खरेदी करण्याचे संकेत दिले आहेत पण उर्वरीत २३ पिकांच्या हमीभावासंबंधी अर्थसंकल्पात काहीही वाच्यता केलेली नाही. त्यामुळे गहू, तांदूळाचे मोठ्या प्रमाणावर उत्पादन करणाऱ्या दोन-चार राज्यांनाच फायदा होईल.

पाच नदीजोड प्रकल्पांना मान्यता देताना गुजरात राज्याला सर्वाधिक फायदा कसा होईल हेच पाहिले गेले आहे. दमणगंगा-पिंजाळ आणि पार-तापी नर्मदा या महाराष्ट्रातून वाहणाऱ्या नद्यांचे पाणी गुजरातला मिळणार आहे. या नदीजोड कार्यक्रमामुळे महाराष्ट्राचे पाणी जाणार असून महाराष्ट्राला मात्र त्याबदल्यात काहीच मिळणार नाही. या गंगा-कावेरी लिंक योजनेची २००२ मध्ये जेव्हा अंमलबजावणी करण्याचे ठरले होते तेव्हा मा. शरद पवार साहेबांनी प्रकल्पाच्या एकूण खर्चाच्या १० टक्के रक्कम (त्यावेळचे ५६ हजार कोटी) केंद्राने महाराष्ट्राला आंतरनदीजोड (इंट्रोबेसिन) प्रकल्प राबविण्यासाठी द्यावी अशी मागणी परिषद घेऊन केली होती. या मागणीचाही केंद्राने अद्याप विचार केलेला नाही. महाराष्ट्रावर मोठा अन्याय करणारा असा हा अर्थसंकल्प आहे.



प्रबंध संपादकीय



# शेतीमाल आधारभूत किमतीचा निर्णय कधी करणार ?

शेती ही निसर्गावर अवलंबून आहे. निसर्गाचा कुणी मालक नाही, नियंत्रक नाही. निसर्ग कायम आपल्या मनाप्रमाणे वागेल असे नाही. तो लहरी आहे आणि मनमानी करणारा आहे. त्यामुळे आपण त्याचे काही नुकसान करू शकत नाही व त्याला कह्यातही ठेवू शकत नाही. पण याऊलट तो मात्र आपले मनात आले तर रौद्र रूप धारण (अतिवृष्टी व पूर) किंवा रूसून (पाऊस न पडणे-दुष्काळ) नुकसान करू शकतो. त्यामुळे निसर्ग जसा ठेवेल तशी त्याच्याशी तडजोड करीत राहणे हे मानवाच्या हिताचे असते. निसर्गावर पूर्णपणे मात करून त्याला नियंत्रणात आणणे अजूनतरी माणसाला जमलेले नाही आणि भविष्यात जमेल असे वाटतही नाही. शेतकऱ्याचे सगळे जीवनच निसर्गाशी जोडलेले आहे. निसर्गाची कृपा असेल तर धनधान्य पिकून घरात येईल; अवकृपा असेल तर धान्य उत्पादित होणार नाही आणि चुकून झालेच तर शेतकऱ्याच्या घरात पोहचू शकणार नाही. म्हणून मा. यशवंतराव चव्हाण साहेब म्हणाले होते 'शेतकऱ्यांना दहा तोंडाच्या राक्षसाशी रोज सामना करावा लागतो.' स्वतः अनेक संकटांशी सामना करीत, अडीअडचणी व दैन्यदुःख सोसून शेतकरी जगाच्या पोटाची व इतरांच्या उदरनिर्वाहाची चिंता करीत धान्य, भाजीपाला, फळं पिकवीत राहतो. कधी पैसे मिळतात, कधी खर्चही वसूल होत नाही. बऱ्याचदा हातातोंडाशी आलेला घास निघून जातो. कधी तरीच एखाद्याला भावाची लॉटरी लागते आणि तो मालामाल होतो. पण हे फार थोड्या शेतकऱ्यांच्या बाबतीत घडते. बहुतांश शेतकरी हे उत्पादनखर्चाइतकाही भाव मालाला मिळत नसल्यामुळे बऱ्याचदा कर्जाच्या ओझ्याखाली दबून जातात आणि सतत कर्जबाजारी राहिल्याने चिंताग्रस्त होतात. त्यातून आत्महत्या वाढीला लागतात. २०१६ मध्ये केंद्र सरकारने लागू केलेली नोटबंदी आणि त्यानंतर आलेली कोरोना महामारीची लाट यात शेतकरी पूर्णपणे उध्वस्त झाला आहे. त्यामुळे तो केंद्र सरकारकडून आधारभूत किमतीची हमी मिळावी अशी अपेक्षा करतो आहे.

वास्तविक २०१४ मध्ये केंद्रात सत्तेवर येण्यापूर्वी स्वतः मा. नरेंद्र मोदी साहेब आणि त्यांच्या पक्षाचे सर्व वरिष्ठ नेते घसा फोडून फोडून सांगत होते आता 'अच्छे दिन' येतील आणि स्वामिनाथन समितीच्या शिफारशींची अंमलबजावणी करून त्यांनी सांगितलेली आधारभूत किंमत शेतकऱ्याच्या मालाला दिली जाईल. प्रत्यक्षात भाजपचे सरकार सत्तेवर येऊन आता आठ वर्ष झाली आहेत. आता या आधारभूत किंमतीबाबत मोदी सरकार मौन बाळगून आहे. कृषीबिले केंद्र सरकारने मागे घ्यावीत म्हणून शेतकऱ्यांनी वर्षभर मोठे आंदोलन केले. जवळपास ८०० शेतकऱ्यांचे यात प्राण गेले. पण सरकारला दया आली नाही. शेवटी उत्तरप्रदेश, पंजाब, उत्तराखंड यांसारख्या पाच राज्यांच्या विधानसभा निवडणुका जेव्हा तोंडावर आल्या आणि आता आपला पराभव अटळ आहे हे चित्र दिसू लागले तेव्हा मोदी साहेबांनी गुरू नानक जयंतीचे निमित्त करून तीनही कृषी बिले मागे घेतली. पण मुख्य प्रश्न आधारभूत किमतीचा अजूनही सुटलेला नाही. तो तसाच प्रलंबित, रेंगाळत ठेवला आहे. नुकत्याच पार पडलेल्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात यासंबंधीचा निर्णय व कायदा करू असे मा. केंद्रीय कृषीमंत्री नरेंद्र तोमर यांनी सांगितले होते. प्रत्यक्षात अधिवेशनात हा विषय ठेवण्यात आला नाही आणि आता एका लेखी उत्तरात मंत्री महोदयांनी किमान आधारभूत किंमतीच्या निर्णयासाठी समिती स्थापन करू असे शेतकऱ्यांच्या तोंडाला पाने पुसणारे उत्तर दिले आहे. माल उत्पादनासाठी आलेला खर्च आणि त्यावर ५० टक्के नफा असे आधारभूत किमतीचे सूत्र स्वामिनाथन आयोगाने सुचविले आहे. हे सूत्र केवळ गहू आणि तांदूळ या दोन पिकांनाच लावून उपयोग नाही. उर्वरीत प्रमुख २५ पिकांनाही लागू करून देशातल्या सर्व शेतकऱ्यांचा विचार केंद्र सरकारने केला पाहिजे. शेवटी प्रत्येक राज्याची पिकपद्धती निरनिराळी आहे व सर्व शेतकरी जगविणे हे सरकारचे आद्य कर्तव्य आहे.

संपादकीय



# अर्थसंकल्प-२०२२ सद्यःस्थितीचा विसर गरीब माणूस अदृश्य

काही राज्यकर्त्यांना कोट्या करुन बोलायची विलक्षण सवय असते. नवनव्या घोषणा आणि त्या योजनांना काहीतरी नावे द्यायची, त्यांचा बडेजाव निर्माण करायचा आणि स्वतःचीच पाठ थोपटून घेऊन आपण काहीतरी फार भव्यदिव्य केल्याचा आव आणायचा! २०२२-२३साठीचा केंद्रीय अर्थसंकल्प या सवयीला अपवाद कसा ठरेल आगामी आर्थिक उर्जितावस्थेचा काळ हा 'अमृत काळ' असल्याचा महान दावा अर्थमंत्र्यांनी त्यांच्या भाषणात केला. तसेच भारतीय अर्थव्यवस्थेच्या विकासवाढीचा संभाव्य सफरनामा सादर करताना सात इंजिनांच्या साह्याने ही विकास-वाढ कशी होणार आहे याचे विलक्षण चित्र त्यांनी लोकांसमोर मांडले. शब्द आणि संकल्पनांचे फुलोरे, मोठेमोठे शब्द व उपमा वापरणे आणि जणूकाही आता स्वर्गच अवतरणार असल्याचा प्रचारकी आव यातून स्पष्ट झाला. कधीकधी भाषेच्या अतिफुलोऱ्यामुळे त्याला सवंगपणा येतो. परंतु स्वस्तुती आणि स्वनामधन्यतेची अशी काही जबरी नशा राज्यकर्त्यांवर आहे की आपण सवंगपणा करीत आहोत याचे भानही त्यांना रहात नाही. या अर्थसंकल्पाबाबत बोलताना ब्रह्मांडनायकांनी स्तुतीचे पूल बांधताना तो भविष्यवेधी असल्याचे सूचित केले. त्यावर माजी अर्थमंत्री आणि ज्यांनी या देशाला खऱ्या अर्थाने पहिले 'ड्रीम-बजेट' दिले त्या पी. चिदंबरम यांनी केलेली टिप्पणी विलक्षण बोलकी होती. 'भविष्याचा वेध घेताना अर्थमंत्र्यांना वर्तमानाचा म्हणजेच सद्यःस्थितीचा विसर पडला असावा असे या अर्थसंकल्पावरुन दिसते' असे चिदंबरम म्हणाले आणि अक्षरशः एका वाक्यात त्यांनी या अर्थसंकल्पाचे वास्तव जनतेसमोर मांडले.

गगनभेदी, अतिशय भव्यदिव्य चमकदार घोषणांनी जनतेला दिपवून टाकणे आणि त्यांना एका मायावी दुनियेत नेत असल्याचे मोहजाल पसरवून त्यांना त्या संभ्रमित अवस्थेत ठेवणे व मूळ समस्यांवर त्यांचे लक्ष जाणार नाही किंवा त्या समस्यांचे भान त्यांना येणार नाही असे गुंगीचे इंजेक्शन देण्याचे प्रकार सर्वंकष राज्यव्यवस्थेत घडत असतात. जनतेला सतत काहीतरी महान गोष्टींच्या नशेत व धुंदीत ठेवणे आणि जेणेकरुन त्यांचे लक्ष खऱ्या अडचणींकडे जाणार नाही याची खबरदारी घेणे एवढाच प्रकार एकाधिकारवादी राज्यकर्ते करीत असतात. तोच प्रकार भारतात संसदीय लोकशाहीच्या नावाखाली सुरु आहे. या प्रकारच्या राज्यव्यवस्थेत केवळ सरकारच्या मूठभर पाळीव मंडळींचे उखळ पांढरे केले जाते. त्यांच्यावर सवलतींचा पाऊस पाडला जातो. त्यांच्या मार्फतच त्या सवलतींच्या पावसाचे पाणी झिरपून त्यातील काही थेंब सामान्य जनतेपर्यंत पोहोचतील असे सांगून गरीब जनतेला फसवण्यात येते. २०२२-२३च्या अर्थसंकल्पात हे चित्र पाहण्यास मिळते.

लोकांची नेहमी एक हरकत असते की सरकारची कोणतीच गोष्ट चांगली नसते का या अर्थसंकल्पाबाबतही हे म्हटता येईल. परंतु या स्वागतार्ह गोष्टी बोटावर मोजण्याइतक्याच आहेत. यामध्ये सरकारने राज्यांसाठी एक लाख कोटि रुपयांची रक्कम केवळ अर्थसाह्यासाठी ठेवलेली आहे. किमान तशी घोषणा तरी करण्यात आली आहे. या रकमेतून राज्यांना बिनव्याजी कर्ज देण्याचा प्रस्ताव केंद्राने केलेला आहे. नोटाबंदी, जीएसटी करप्रणालीची सदोष अंमलबजावणी आणि त्यानंतर करोनाकाळापासून देशातील बहुतेक राज्ये ही आर्थिक हालाखीत आहेत. जीएसटीमुळे तर राज्यांच्या महसुलावरच आघात झालेला आहे. त्यामुळे केंद्र सरकारने काहीसा मोठेपणा दाखवून ही एक लाख रुपयांची केवळ राज्यांसाठी केलेली तरतूद हा दिलासा ठरेल. अर्थात यामध्ये एका मुद्याकडे विशेष लक्ष द्यावे लागेल की केंद्राने हे अर्थसाह्य राज्यांना देताना सावत्रपणाची वृत्ती दाखवू नये. अन्यथा या योजनेचा मूळ हेतूच नष्ट होईल. दुसरी स्वागतार्ह बाब आहे ती भांडवलीखर्चात करण्यात आलेली वाढ ही आहे. सुमारे दीड लाख कोटि रुपयांनी ही वाढ करण्यात आली आहे. येत्या आर्थिक वर्षात साडेसात लाख कोटि रुपयांची रक्कम भांडवली खर्चासाठी ठेवण्यात आली आहे. भांडवली खर्चातील वाढीचा ढोबळमानाने अर्थ सरकारतर्फे विविध योजनांमध्ये केली जाणारी गुंतवणूक हा असतो. यामुळे अर्थव्यवस्थेला चालना मिळू शकते आणि रोजगारनिर्मितीही होते. त्यादृष्टीने या वाढीचे


स्वागतच करावे लागेल. परंतु इतर जे काही प्रस्ताव सरकारने केले आहेत त्यांची गणना केवळ चमकदार घोषणांमध्येच करावी लागेल. त्यामुळेच केंद्रीय अर्थसचिवांना जेव्हा या अतिमहत्वाकांक्षी योजनांच्या घोषणांच्या व्यावहारिकतेबद्दल विचारणा केली असता त्यांनी काहीसे चाचरतच, 'या घोषणांच्या परिणामकारक अंमलबजावणीवरच त्यांचे यश प्रामुख्याने अवलंबून असेल' असे सांगितले होते. म्हणजेच घोषणा करायच्या परंतु त्यांच्या अंमलबजावणीची बाब अनुत्तरितच राखायची असा हा खाक्या आहे.

२०२२-२३च्या अर्थसंकल्पाची चर्चा करण्यापूर्वी तो कोणत्या पार्श्वभूमीवर किंवा कोणत्या परिस्थितीत सादर करण्यात आला त्याचे आकलन प्रथम करावे लागेल. किंबहुना वर्तमानात म्हणजेच सध्या देश ज्या आर्थिक परिस्थितीशी मुकाबला करीत आहे त्याचे प्रतिबिंब या अर्थसंकल्पात कितपत पडले आहे यावरच त्याचे मूल्यमापन करणे उचित ठरेल. म्हणजेच बेकारी, महागाई, अर्थव्यवस्थेला एकंदरीत आलेली मरगळ आणि मंदगती, ग्राहकाची म्हणजेच सर्वसाधारण नागरिकाची खालावलेली क्रयशक्ति(खरेदी करण्याची क्षमता) आणि त्याच्याच जोडीला ग्राहकाचा आत्मविश्वास आणि बाजारात जाऊन पैसे खर्च करणे व जोखीम उचलण्याची त्याची क्षमता यात आलेले खालावलेपण ही अर्थव्यवस्थेतील सध्याची सर्वात मोठी आव्हाने किंवा मुद्दे आहेत. यातूनच देशातील आर्थिक धोरणे अशा प्रकारची झालेली आहेत की देशातील संपत्ती काही मोजक्यांच्या हाती केंद्रित होताना आणि गरीब हे अधिक गरीब होत चालल्याचे चित्र दिवसेंदिवस स्पष्ट होत चाललेले दिसत आहे. समाजवादी व कामगारनेते जॉर्ज फर्नांडिस याचा नेहमी 'कल्चर ऑफ लार्ज' म्हणून उल्लेख करीत असत. या आर्थिक धोरणांमध्ये सामान्य व गरीब माणूस जवळपास अदृष्य असतो. आर्थिक धोरणे ही प्रामुख्याने 'अभिजनवादी' किंवा इंग्रजीत ज्याला 'एलिटिस्ट' म्हटले जाते तशा प्रकारची असतात. २०२२-२३चा अर्थसंकल्प याच वर्गात समाविष्ट होणारा आहे व म्हणूनच तेथे गरीब माणसाचा मागमूसही दिसून येत नाही. सामान्यजनांचे अस्तित्वच त्यात नाकारण्यात आले आहे. हा तात्विक भाग सोडू पण वास्तव काय आहे हेही पाहणे महत्वाचे आहे. सध्याची आर्थिक परिस्थिती काय आहे अर्थव्यवस्था अद्याप सावरलेली नाही आणि करोनापूर्व काळाच्या अवस्थेत आलेली नाही. करोनाकाळात म्हणजेच गेल्या दोन वर्षात कोट्यावधी लोक रोजगाराला मुकून बेकार झाले आहेत. विविध आकडेवारीनुसार ८४ टक्के कुटुंबांचे उत्पन्न एकतर खालावले किंवा पूर्णपणे संपुष्टात आलेले आहे. सुमारे साठ लाख अतिलघु, लघु आणि मध्यम उद्योग बंद पडले. दरडोई उत्पन्न व परिणामी दरडोई खर्च यातही घट झालेली आहे. सुमारे पाच कोटी लोक हे अत्यंत हालाखी आणि गरिबीच्या खाईत लोटले गेले आहेत. शहरी व ग्रामीण भागातील बेकारीचे सरासरी प्रमाण सात टक्क्यांपर्यंत वाढले आहे. यामध्ये शहरी बेकारीचे वाढते प्रमाण भयावह आहे. त्याचा दबाव ग्रामीण भागावर व ग्रामीण रोजगारावर होताना आढळत आहे. घाऊक किंमत निर्देशांक १२ टक्के तर किरकोळ किंमत निर्देशांक ५.३ टक्क्यांवर पोहोचला आहे. सामान्य भाषेत हा वाढत्या महागाईचा निर्देशांक आहे. हे मुद्दे नसून अर्थव्यवस्थेपुढे निर्माण झालेली आव्हाने आहेत. यासंदर्भात अर्थमंत्र्यांनी सादर केलेल्या अर्थसंकल्पाचे आकलन करायचे झाल्यास आणि या समस्यांचा उल्लेख किंवा त्या दूर करण्याच्या दृष्टीने अर्थसंकल्पात काय तरतुदी आहेत असे पाहण्याचे ठरविल्यास हातात चक्का 'भोपळा' येतो! काही महिन्यांपूर्वी दिल्ली सरकारने दिल्लीतील भिकाऱ्यांचा सर्व्हे केला होता. त्यातून प्रकाशात आलेली माहिती अतिशय धक्कादायक होती. करोनाकाळात बेकार झालेल्या कुटुंबांनी चक्क भीक मागण्यास सुरुवात केल्याचे त्यात आढळून आले. दिल्लीमधील भिकाऱ्यांच्या संख्येत जवळपास पस्तीस ते चाळीस टक्क्यांनी वाढ झाल्याचे त्यात नमूद करण्यात आले होते. विलक्षण अस्वस्थ करणारा तो सर्व्हे होता. तो केवळ दिल्ली परिसरापुरता मर्यादित होता परंतु तशीच स्थिती इतरत्र नसेल हे छातीठोकपणे सांगता येणे अशक्य आहे. अशा भयानक वास्तवाचा मागमूस किंवा साधा उल्लेख देखील या सरकारच्या अर्थसंकल्पात नसावा हे भयंकर आहे. हे सरकार केवळ उद्योग, उद्योगपतींसाठी आहे काय असा प्रश्न कुणी विचारला तर तो वावगा ठरणार नाही. बालकांच्या कुपोषणात तसेच सकस आहाराच्या त्यांच्या अनुपलब्धतेच्या संदर्भात जागतिक कुपोषणाच्या निर्देशांकात भारताचे स्थान ११६ देशांच्या यादीत १०१ असल्याचे काही महिन्यांपूर्वीच जाहीर झाले होते. त्याची दखलही सरकारने घेतलेली नाही. उलट जागतिक संस्थांचा भारताबद्दल पूर्वग्रह आहे, त्यांचे निष्कर्ष चुकीच्या माहितीवर आधारित आहेत वगैरे पोपटपंची सरकारने केली आणि या मुद्याला सरसकट बगल दिली. अशा वेळी या सरकारची पाळीव माध्यमे, त्यांच्या प्रचारकी टोळ्या सोयीस्कर मौन बाळगून राहतात आणि उलट या जागतिक संस्थांना खोटे ठरविण्याचा निर्लज्जपणाही करीत राहतात.

वर उल्लेख केल्याप्रमाणे वर्तमानापेक्षा किंवा वर्तमानातील समस्यांचे निराकरण करणाऱ्या उपाययोजनांबद्दल हा अर्थसंकल्प मौन बाळगताना दिसतो. त्याऐवजी पुढील पंचवीस वर्षात सरकार काय करु इच्छिते याबाबत अर्थसंकल्पात लंब्याचौड्या गोष्टी सांगण्यात आल्या आहेत. त्या मोठमोठ्या योजनांची यादी देऊन त्याची पूर्तता पुढील पंचवीस वर्षात

करताना या काळास अर्थमंत्र्यांनी 'अमृतकाळ' असे संबोधले आहेत. वाहवा, काय जबरदस्त योजना आहे! अर्थसंकल्प हा वार्षिक असतो. गेल्या वर्षातील आर्थिक परिस्थिती लक्षात घेऊन आगामी आर्थिक वर्षात सरकार अर्थव्यवस्था किती चांगल्या रीतीने हाताळू शकते याचा ताळेबंद या वार्षिक अर्थसंकल्पाच्या माध्यमातून मांडलेला असतो. परंतु सध्याच्या राज्यकर्त्यांना पंचवीस वर्षांच्या अमृतकाळाचे वेध लागलेले दिसतात. एखाद्या डॉक्टरकडे विविध आजारांनी ग्रस्त रुग्णाला नेल्यावर त्याला तत्काळ दिलासा देणारे उपचार करण्याऐवजी पुढील पंचवीस वर्षात त्याची प्रकृती दुरुस्त कशी करता येईल असे उपचार करण्याचा हा प्रकार आहे. यामध्ये रुग्ण बरा होण्याऐवजी दगावण्याचाच धोका जास्त संभवतो.

तसाच हा 'अमृतकाळ' नावाचा प्रकार आहे. गरीब लोकांची ही क्रूर थट्टा आहे. अर्थव्यवस्थेला त्वरित चालना देण्याच्या दृष्टीने गरीब लोकांच्या हाती थेट पैसा कसा जाईल यासाठीच्या उपाययोजना अपेक्षित होत्या. गेल्या दोन वर्षात ज्यांच्या नोकऱ्या गेल्या त्यांना पुन्हा रोजगार मिळण्यासाठी त्वरित रोजगारनिर्मितीच्या कोणत्याही योजनांचा यात उल्लेख नाही. एवढेच नव्हे तर अतिलघु, लघु आणि मध्यम उद्योगांच्या(एमएसएमई) ज्या क्षेत्रामुळे सर्वाधिक रोजगारनिर्मिती होते त्याच्या तत्काळ पुनरुज्जीवनासाठीही कोणत्याच उपाययोजना केल्याचे स्पष्ट झालेले नाही. पगारदारांना प्राप्तीकराबाबत काही सवलतींची जी अपेक्षा होती ती देखील पूर्ण झालेली नाही कारण प्राप्तीकराबाबत 'यथास्थिती' म्हणजेच 'जैसे-थे' धोरण राखण्यात आलेले आहे. महागाई नियंत्रण आणि गरीबांना दिलासा देण्याबाबतही अर्थसंकल्पात कोणतीच तरतूद केलेली आढळत नाही.



दर वाक्यागणिक महान पंतप्रधान व त्यांच्या नेतृत्वाखाली देशाची कशी भरभराट होत असल्याचे भ्रामक चित्र रंगविताना अर्थमंत्र्यांनी पंतप्रधानांच्या 'गति-शक्ति' योजनेचा उल्लेख करताना त्या अंतर्गत पुढील पाच वर्षात साठ लाख रोजगारनिर्मितीचे उद्दिष्ट बोलून दाखविले आहे. म्हणजेच वर्षाला बारा लाख रोजगारनिर्मितीचे लक्ष्य ठेवण्यात आले आहे. प्रत्येक वर्षी दोन कोटि रोजगारनिर्मितीचे गाजर या राज्यकर्त्यांनी यापूर्वी दाखविले होते. ते आता खाली घसरत घसरत वर्षाला बारा लाख रोजगारनिर्मितीपर्यंत आले आहे. यावरुन या राज्यकर्त्यांच्या शब्दांवर किती विश्वास ठेवायचा हे ठरविण्याची वेळ आता आली आहे.

भारतात सामान्य व गरीब लोकांसाठी अनुदानाची किंवा सब्सिडींची योजना करण्यात येत असते. गरीबांचा फार कळवळा दाखविणाऱ्या ब्रह्मांडनायकांच्या सरकारने विविध योजनांवरील सब्सिडीमध्ये केलेल्या कपातीचा आकडा चकित करणारा आहे. या सरकारने सत्तावीस टक्क्यांनी विविध अनुदानांची छाटणी करुन टाकली आहे. पेट्रोलियम पदार्थांवरील सब्सिडी ६५१७ कोटि रुपयांवरुन ५८१३ कोटि रुपयांपर्यंत कमी करण्यात आली आहे. म्हणजेच सातशे कोटि रुपयांची सब्सिडी कमी करण्यात आली आहे. खतांवरील सब्सिडी पस्तीस हजार कोटि रुपयांनी कमी करण्यात आली आहे. २०२१-२२ मध्ये खतांवरील सब्सिडीची रक्कम १ लाख ४० हजार कोटि रुपये होती ती आता कमी करुन २०२२-२३मध्ये १ लाख पाच हजार कोटि रुपयांपर्यंत कमी करण्यात आली आहे. हे या राज्यकर्त्यांचे शेतकऱ्यांबद्दलचे प्रेम आहे! फूड सब्सिडी किंवा अन्नविषयक सब्सिडी २ लाख ८६ हजार २१९ कोटि रुपयांवरुन २ लाख सहा हजार ४८१ कोटि रुपयांपर्यंत कमी करण्यात आली आहे. म्हणजेच सुमारे ऐंशी हजार कोटि रुपयांची प्रचंड कपात करण्यात आली आहे. कृषि आणि अनुषंगिक क्षेत्रासाठीची तरतुदीची टक्केवारी गेल्यावर्षी ४.३ टक्के(जीडीपीच्या तुलनेत) होती ती आता कमी करुन ३.८४ टक्के करण्यात आली आहे. पीकविमा योजनेत १५९८९ कोटि रुपयावरुन १५५०० कोटि रुपयांपर्यंत कपात करण्यात आली आहे. 'मनरेगा' हे ग्रामीण रोजगार निर्मितीचे प्रमुख साधन असूनही त्यावरील तरतूद पंचवीस हजार कोटी रुपयांनी कमी करण्यात आली आहे. २०२१-२२ मध्ये या योजनेसाठी ९८ हजार कोटी रुपये देण्यात आले होते.

या अर्थसंकल्पात ही तरतूद ७३ हजार कोटि रुपये इतकी कमी करण्यात आली आहे. ही केवळ झलक आहे. हा अर्थसंकल्प किती गरीबविरोधी आहे याची चुणुक या आकडेवारीवरुन मिळाल्याखेरीज राहणार नाही. आपण जे काही करीत आहोत तेच चांगले, तेच

खरे, असा आव आणि अविर्भाव राज्यकर्ते आणतात तेव्हा त्यांच्याबरोबर युक्तिवाद करणे अशक्य होते. याचे कारण त्यांनी मनाशी पक्के ठरविलेले असते की त्यांची सत्ता व अधिकार यांच्या जोरावर वास्तव दडपायचे किंवा दडपण्याचा प्रयत्न करायचा. परंतु सत्य व वास्तव दडपले जात नाही. आणखी एक उदाहरण! देशाच्या पंतप्रधानांनी नानक जयंतीचे निमित्त करुन तीन कृषि कायदे मागे घेण्याची नाटकी-नाट्यमय घोषणा केली. परंतु केवळ कायदे मागे घेणे ही शेतकऱ्यांची मागणी नव्हती. त्यांना शेतीसाठी लागणाऱ्या विविध साधनसामग्रीचे मूल्य(इनपुट कॉस्ट) कमी करुन हवे होते. किमान आधारभूत किमतीची कायदेशीर हमी हवी होती. त्यासाठी केंद्रीय अर्थसंकल्पाची वाट पाहू असे शेतकऱ्यांनी म्हटले होते. परंतु अर्थसंकल्पात शेतकऱ्यांच्या तोंडाला पूर्णपणे पाने पुसण्यात आलेली आढळतात. गहू व तांदूळाच्या संदर्भातील उल्लेख वगळता बाकी मागण्यांबाबत मौन पाळण्यात आलेले आहे. त्यामुळे शेतकऱ्यांचे कैवारी असल्याचा दावा करणाऱ्या या उद्योगप्रेमी राज्यकर्त्यांनी शेतीला जी सुरुवातीपासून म्हणजे २०१४ पासून सावत्र वागणूक देण्याचे धोरण चालू ठेवले त्याच मालिकेतला हा अर्थसंकल्प आहे.

सरकारने भांडवली खर्चात मोठी वाढ करण्याची केलेली घोषणा स्वागतार्ह असली तरी त्यासाठी पैसा किंवा साधनसंपत्ती कोठून मिळविणार याबाबतचे प्रश्नचिन्ह कायम आहे. याचे कारण राजकोषीय किंवा वित्तीय तूट ही कमी होण्याऐवजी वाढलेली आहे. ६.८ टक्क्यांवरुन ती ६.९ टक्के झाली आहे. याचा सरळ सोपा अर्थ हा आहे की सरकारची मिळकत आणि खर्च यातील तफावत वाढलेली आहे. मिळकत व खर्चाची तोंडमिळवणी करणे सरकारला जमेनासे झाले आहे. आगामी काळात सरकार खर्चासाठी लागणाऱ्या रकमेपैकी सत्तर टक्के रक्कम कर्जाच्या रुपाने उभारणार असल्याचे अर्थमंत्र्यांनी जाहीर केले आहे. याचा बोजा कुणावर पडणार आहे त्याचबरोबर जेव्हा केंद्र सरकार मोठ्या प्रमाणात कर्ज घेऊ लागते तेव्हा राज्यांना कुणी कर्जे देईनासे होतात आणि म्हणूनच याचा प्रतिकूल परिणाम राज्यांच्या खजिन्यावर तसेच वित्तीय स्थितीवरही होणार आहे. सरकारच्या मिळकतीच्या केवळ तीन स्रोतांवरच अर्थसंकल्पात भर दिलेला आहे आणि त्यात प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष कर तसेच जीएसटी यांचा समावेश आहे. परंतु अन्य कोणत्याही स्रोतांचा उल्लेख नाही.

तज्ञांच्या मते मालमत्ता व संपत्ती करात सरकार वाढ करु शकले असते आणि त्या मार्गाने मिळकतीमध्ये वाढ करणे शक्य होते. देशातील १४२ महाश्रीमंत व्यक्तींच्या उत्पन्नात गेल्या दोन वर्षात जवळपास तीस लाख दोन हजार कोटि रुपयांनी वाढ झाल्याचे सांगण्यात येते. परंतु त्यांच्यावर कर लादण्याबाबत सरकारने मूग गिळलेले आहेत. याच संदर्भात आणखी एका जागतिक संस्थेने केलेल्या पाहणीत भारतात श्रीमंत किंवा महाश्रीमंताच्या संपत्ती व मालमत्तेत झालेल्या वाढीची आकडेवारी सादर करताना गेल्या तीन वर्षात गरीब हे आणखी गरीबीच्या गर्तेत लोटले गेले असल्याचे सोदाहरण व आकडेवारीसह मांडले आहे. या पाहणी अहवालाचीही अवहेलना मोदी सरकारने करुन आपला निरगट्टपणा सिध्द केला.

जनतेच्या ज्वलंत प्रश्नांवर उत्तरे व उपाय शोधण्याची क्षमता संपलेले राज्यकर्ते भव्यदिव्य, चमकदार, उदात्त असे युक्तिवाद करु लागतात. जनतेसमोर भलीमोठी भविष्यकाळाची स्वप्ने सादर करु लागतात. ही जनतेची शुध्द फसवणूक असते. जनतेला ते कळतही असते परंतु कधीकधी वळत नाही. सध्या देशात हीच स्थिती आहे. ही फसवणूक मुर्दाडपणे आणखी कितीकाळ सहन करायची हे जनतेने ठरवायचे आहे. मराठीत एक म्हण आहे, 'सर्व नाटके शक्य असतात पण पैशाचे नाटक करता येत नाही!' मोठे वास्तव या साध्या म्हणीतून सांगण्यात आले आहे. सरकारने अशी कितीही आर्थिक नाटके केली तरी लोकांच्या आर्थिक समस्यांवर उतारा मिळणार नाही. ही परिस्थिती जेव्हा टोक गाठेल तेव्हा मात्र फार उशीर झालेला असेल. त्याचे दुष्परिणाम सर्वांनाच भोगावे लागणार आहेत. ते दिवस फार दूर नाहीत!

जाताजाता .........! हे सरकार लोकांपासून आर्थिक वास्तव लपविण्याची किती धडपड करीत आहे पूर्वी अर्थसंकल्पपूर्व पाहणी अहवाल(इकनॉमिक सर्व्हे) आणि अर्थसंकल्पाचे सर्व छापील दस्तावेज मिळत असत. परंतु २०१४ पासून पत्रकारांना त्याच्या प्रती देणे बंद करण्यात आले. यावर्षीपासून खासदारांना देखील त्या प्रती देण्याचे बंद करण्यात आले. यामुळे प्रत्येक दस्तावेज संगणकाच्या पडद्यावर पाहण्यात खर्ची पडणारा वेळ आतोनात असतो. यामुळे पत्रकारांना अर्थसंकल्पाची पूर्ण माहिती घेणेच अवघड झाले आहे. अर्थसंकल्पावर सटीक लेख लिहिणाऱ्या तज्ञांची देखील मोठी अडचण झालेली आहे. जे सरकार आणि राज्यकर्ते डिजिटल प्रणालीच्या नावाखाली ही लपवालपवी करु लागतात त्यावरुनच त्यांची ओळख पटते. लपवालपवी कितीकाळ करतील? वास्तव हे कितीही दाबले तरी दबले जाणारे नसते. लवकरच या राज्यकर्त्यांना त्याची प्रचीती आल्याखेरीज राहणार नाही. कारण लपवालपवीचा अर्थ घोटाळे व गौडबंगाल हा असतो!

डॉ. सुधीर भोंगळे

# मालेगावच्या विकासासाठी एकत्रित प्रयत्न करत राहू

## उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे उद्गार



मित्रांनो, खरं तर आदरणीय पवार साहेबांनी आम्ही सगळ्यांनी सांगितलं होतं, भुजबळ साहेबांनी, जयंत पाटील साहेबांनी, की आपल्याला मालेगावमध्ये जाऊन हा मोठा कार्यक्रम घ्यायचांय. ज्यावेळी आसिफ शेख, रशीद शेख यांच्याशी आमची चर्चा झाली, त्यावेळेस त्यांनी पण इच्छा व्यक्त केलेली होती, की आपण सगळे मालेगावमध्ये या आणि मग रशीद शेख यांच्या नेतृत्वाखाली एवढी प्रचंड मोठी रॅली आम्ही मालेगावमध्ये अरेंज करतो आणि संपूर्ण मालेगावचा परिसर, मालेगाव शहराचा परिसर राष्ट्रवादीमय करून टाकतो अशा पद्धतीनं त्यांचा आग्रह होता. आमचाही प्रयत्न चालू होता. भुजबळ साहेबांचा, जयंत पाटील साहेबांचा. परंतु, करोनाचं सावट असल्यामुळं, ज्याचा उल्लेख

**माजी आमदार रशीद शेख आणि त्यांच्या पत्नी तसेच मालेगाव महानगरपालिकेच्या महापौर ताहिरा शेख यांच्यासह २८ नगरसेवकांनी काँग्रेसमधून राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश केला. २७ जानेवारी २०२२ रोजी मुंबई येथे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या मुख्यालयात झालेल्या कार्यक्रमाचा वृत्तांत व यावेळी अजित पवार यांनी केलेले भाषण.**



भुजबळ साहेबांनी आपल्या भाषणामध्ये केला, की नियमावली आम्ही लोकं करतो. म्हणजे उद्धव ठाकरे साहेब असतील, मी असेन, जयंतराव, नवाबजी किंवा भुजबळ साहेब, दिलीप वळसे पाटील आम्ही सगळे जण मिळून ती नियमावली करतो. आणि आपणच जर नियमावलीचं उल्लंघन करायचं म्हटलं, तर राज्यातल्या इतरांना आपण काय सांगणार, हा प्रश्न निर्माण होतो. आणि म्हणून नंतर घेऊ, नंतर घेऊ असं चाललं होतं. परंतु, करोनाचं सावट कमी व्हायला तयार नाही. मग शेवटी आज गुरूवारी इथंच तो कार्यक्रम घ्यायचं ठरलं आणि तशा पद्धतीचा कार्यक्रम आज आपल्या उपस्थितीमध्ये होतोय.

माजी आमदार आणि माजी महापौर शेख रशीद शेख शफी यांचा संबंध माझा, भुजबळ साहेबांचा, जयंतरावांचा ९९ साली झाला, ज्यावेळी ते आमदार झाले त्यावेळेस. आणि त्यांच्याबरोबर आम्ही आघाडीमध्ये एकत्र काम करत होतो. सतत मालेगावचे प्रश्न पोटतिडकीनं सांगण्याचं काम सभागृहामध्ये करायचे. आम्हा लोकांनाही भेटायचे आणि पाठपुरावा करत राहायचे. अनेक वर्षे तुमच्या सगळ्यांचं त्यांनी प्रतिनिधीत्व केलं. एक परिवार म्हणून त्यांनी तुम्हाला सांभाळलं. कधीही कुठलीही अडचण असेल तर आपल्याला शेख रशीद साहेब मदत करणारच हा एक विश्वास मालेगावकरांना आहे. शहरातील नागरिकांना आहे. आणि त्याच्यामुळं वय जरी त्यांचं झालेलं असलं तरी देखील समाजाशी जी बांधिलकी आहे, ती बांधिलकी कुठंही शेख रशीद साहेबांनी कमी होऊ दिलेली नाहीये. आणि हेच नेमकं त्यांची ताकद, त्यांची शक्ती हे त्याच्या पाठीमागचं कारण आहे.

आज एखादा नेता एखाद्या पक्षामध्ये जर निघाला, तर सगळेच नगरसेवक त्याच्याबरोबर येतात असं नाही. ते फक्त मालेगावमध्ये घडतं. का घडतं, तर ते शेख रशीद साहेबांच्या स्वभावामुळं घडतं. कारण तुम्हाला सगळ्यांना माहिती आहे, की हे योग्य निर्णय घेणार. आपल्या भल्याचा निर्णय घेणार. आणि तशा पद्धतीचा निर्णय त्यांनी घेतलेला आहे. पवार साहेबांनी तर गेली पन्नास-साठ वर्षे समाजकारण करत असताना, साहेबांनी कधी कुठल्या जातीचा, पातीचा, नात्याचा, गोत्याचा विचार केला नाही. एक संपूर्ण महाराष्ट्रातला सर्व समाज आपण पुढं घेऊन गेलं पाहिजे ही साहेबांची वक्तव्ये तुम्ही ऐकलीत, भाषणं तुम्ही ऐकलीत. त्यांचे विचार नेहमीच त्याठिकाणी ऐकलेले आहेत. नवाब मलिक साहेबांना, मला अणि भुजबळ साहेबांना, जयंत पाटील साहेबांना पवार साहेबांनी सांगितलं, की इतके दिवस आपण काँग्रेसबरोबर आघाडी करायचो. त्यावेळेस अल्पसंख्याक आणि अवघा विभाग हा काँग्रेसकडं राहायचा आणि यावेळेस तो आपल्याकडं आला पाहिजे. आणि तशा पद्धतीनं आम्ही चर्चा करत असताना तो विभाग घेतला. त्याच्यामध्ये साहेबांनी आम्हाला सांगितलं, की अल्पसंख्याक जे आपलं मौलाना आझाद मंडळ आहे, त्याला पाचशे कोटी रूपयांचं भागभांडवल करायचं. तोही निर्णय आम्ही पंधरा दिवसांपूर्वी की महिन्यापूर्वी कॅबिनेटमध्ये आणून घेतलेला आहे.

शेवटी नुसती भाषणं करून प्रश्न सुटत नाहीत.

आत्ता भुजबळ साहेबांनी जे सांगितलं, की आमच्या नवाब मलिक साहेबांच्याकडं जो विभाग आहे, त्या विभागाच्या माध्यमातनं महाराष्ट्रातल्या तरूण-तरूणींना उभं करण्याचं काम आपण करतो. आपल्या समाजामध्ये शिक्षण हे थोडंसं इतरांच्या तुलनेनं कमी आहे. तिथं शिक्षणाला महत्त्व कसं आपल्या मुला-मुलींच्या बाबतीमध्ये देता येईल, तिथं मदत कशी करता येईल.



त्याचबरोबर त्यांना स्वत:च्या पायावर उभं राहण्याकरता कशा पद्धतीनं मौलाना आझाद मंडळाची मदत करता येईल असा सगळा विचार आम्ही करतोय. साहेब वेगवेगळ्या घटकांना प्रतिनिधीत्वही देण्याचा प्रयत्न करतायंत. पार्लमेंटमध्ये असेल, राज्यसभेत किंवा तुमच्या महाराष्ट्राच्या विधीमंडळामध्ये असेल, साहेब अतिशय बारकाईनं या सगळ्या गोष्टींचा नेहमी विचार करत असतात. आणि त्याच्यातूनच आम्ही सगळेजण पुढं चाललो आहे.

ज्यावेळेस आसिफ शेख रशीद यांच्याशी आम्ही थोडीशी चर्चा केली, तर त्यांनी सांगितलं, की निधी द्या. निधी देणं हे तर आमचं सर्वांचं कर्तव्यच आहे. त्या कर्तव्याच्या भावनेतनं जयंतराव, मी, भुजबळ साहेबांनी, आम्ही त्याठिकाणी निधी दिला. आणि इथून पुढच्या काळामध्ये देखील आत्ता शेख रशीद साहेब म्हणाले, की काही मार्चच्या आधी काही निधीची गरज आहे. मी एवढंच तुम्हाला सांगतो, की मार्चच्या आधी पुन्हा एकदा तुम्हाला चांगल्यापैकी निधी देण्याचं काम आम्ही सगळेजण त्याठिकाणी करू. आणि हे



इथपर्यंतच नाही, पुन्हा नवीन अर्थसंकल्प ११ तारखेला जेव्हा आम्ही सभागृहामध्ये सादर करणार आहोत, त्याहीवेळेस अतिशय व्यवस्थितपणे आपण सगळ्यांनी त्याच्यामध्ये कशा पद्धतीनं, जसं भुजबळ साहेबांच्या नेतृत्वाखाली नाशिक शहराचा आणि त्या परिसराचा विकास झाला, ते काय कुणी झाकून ठेऊ शकत नाही. रस्ते असतील, बाकीच्या सगळ्या सुविधा असतील, अनेक गोष्टींचा उल्लेख आपल्याला करता येईल, तशाच पद्धतीनं आपल्या मालेगावच्या बाबतीमध्ये, तुम्ही यंत्रमागाच्याबद्दल बोलला, इतर पण काही प्रश्न आहेत. तेही प्रश्न सोडवण्याच्याकरता थोडंसं आपण एकत्रितपणे बसून कुठल्या प्रश्नाला प्रायोरिटी द्यायची, कुठले प्रश्न अतिशय तातडीनं सोडवायचेत, कुठले प्रश्न थोडेसे उशिरा सुटले तरी चालतील आणि लाँग टर्मला कुठले प्रश्न सोडवायचेत अशा पद्धतीनं आम्ही शेख रशीद शेख शफी साहेबांचं मार्गदर्शन घेऊ. त्यांना मोठा अनुभव आहे आणि त्यांच्या मार्गदर्शनाखाली मग शेख रशीद आमच्याकडं पाठपुरावा करतील.

श्रीमती ताहिरा शेख या पण आहेत आपल्या सगळ्यांच्या महापौर, त्या शहराच्या प्रथम नागरिक आहेत. त्यांचंही तिथं चांगल्या पद्धतीचं काम आहे. तुम्हीही सगळे चांगल्या प्रकारची साथ देताय आणि मी एवढा विश्वास तुम्हाला देतो, की यावेळेस शेख रशीद शेख शफी साहेबांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षामध्ये येण्याचा जो निर्णय घेतला, तो निर्णय अतिशय योग्य आहे, हे आम्ही तुम्हाला कृतीतनं, कामातनं सिद्ध करून दाखवू ही ग्वाही मी आमच्या प्रांताध्यक्षांच्या

साक्षीनं आपल्या सर्व सहकाऱ्यांना यानिमित्तानं देऊ इच्छितो. वेगवेगळ्या प्रकारचे अनेक प्रश्न वेळोवेळी निर्माण होणार आहेत. परंतु, त्याच्यातून मार्ग काढण्याचं काम आपण निश्चितपणे करू. त्याबद्दल कुठलीही शंका कुणी मनामध्ये बाळगू नका. फक्त आपल्याकडनं कुठली चूक होऊ देऊ नका. आपल्याकडनं कायद्याचं, नियमाचं उल्लंघन होणार नाही, ही पण खबरदारी आपण सगळे घ्या.

उद्याच्याला राष्ट्रवादी काँग्रेस पक्षामध्ये आपण गेलोय, म्हणजे गृहखातं राष्ट्रवादीकडं आहे. पालकमंत्री आपलेच आता भुजबळ साहेब घरचे आहेत, प्रांताध्यक्ष आपलेच आहेत, अजित पवार आपलेच आहेत, आम्ही जरूर तुमचे आहोत, त्याबद्दल दुमत नाही. परंतु, तुमच्या कुठल्या कृतीतनं राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला कमीपणा येईल, नेत्याला कमीपणा येईल, पवार साहेबांची मान शरमेनं खाली जाईल अशा पद्धतीचं कुठलंही छोटंसं कृत्य कार्यकर्त्याच्याकडनं घडता कामा नये. ही खबरदारी मात्र आपल्याला घ्यावी लागणार आहे. कारण, आजपासून एकदा प्रवेश झाल्यानंतर तुम्ही एका सत्ताधारी पक्षाच्या, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे सैनिक म्हणून त्याठिकाणी काम करणार आहात. तिथं तुमच्याकडं बघण्याचा लोकांचा दृष्टीकोन आता बदलणार आहे. ही गोष्ट आपण कृपा करून ध्यानामध्ये त्याठिकाणी ठेवा आणि जयंतरावांच्या नेतृत्वाखाली सांगली-मिरज-कूपवाड महानगरपालिकेचा चांगला कायापालट झाला आहे. तसंच माझ्याकडे पिंपरी-चिंचवड आणि पुणे महानगरपालिका होती, आमच्या भुजबळ साहेबांच्याकडं नाशिक महानगरपालिका होती, त्यावेळेस महानगरपालिकेतली कामं कशी करायची, प्रश्न कसे सोडवायचे, त्याच्यातल्या अडचणी कशा दूर करायच्या, याच्याबद्दलची चांगली जाण आम्हा लोकांना आहे.



पाठीमागच्या काळामध्ये जवाहरलाल नेहरू नॅशनल अर्बन रिन्यूअल मिशनमधनं आम्ही करोडो रूपयांचा निधी आणला होता. त्याच्यानंतरच्या काळामध्ये आता स्मार्ट सिटीच्या माध्यमातनं देखील वेगवेगळ्या भागामध्ये निधी येतो. अशा पद्धतीनं काम पण झालं पाहिजे. पण निधी पण कमी पडता कामा नये. असा एक समन्वय साधण्याचं काम राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्याकडनं, माझ्याकडनं, जयंतरावांकडनं, भुजबळ साहेबांच्याकडनं, नवाब मलिक साहेबांच्याकडनं, आमच्या सगळ्यांच्याकडनंच त्याठिकाणी केलं जाईल. आम्ही गुरूवारी बऱ्याचदा इथं पार्टी कार्यालयात असतो. मी मंत्रालयात तर ज्यावेळेस वर्किंग डे असतो त्यावेळेस सकाळी ९-१० वाजल्यापासून संध्याकाळपर्यंत असतो. आणि त्याच्यामुळं ही सगळी कामं आपण नीटपणे मार्गी लाऊ.

तुम्हाला साधारण आसिफ शेख रशीद साहेब ज्यावेळेपासून आले, तेव्हापासून तुम्हाला अंदाज आलेलाच असेल आणि ज्यावेळेस मी जिल्हा वार्षिक आराखड्याला पण नाशिकला, सगळ्याच राज्याला बऱ्यापैकी निधी देणार आहे. त्याच्यात नाशिकला पण चांगला निधी देण्याचा प्रयत्न आहे. आणि नवाब मलिक साहेबांच्या पण अल्पसंख्याक विभागाच्याकडनं आपले प्रश्न सोडवण्याच्याकरता आपण सगळेच जण मिळून कटिबद्ध राहूया. अशा प्रकारचा विश्वास मी आपल्या सर्व सहकाऱ्यांना देतो आणि तुम्ही २८ नगरसेवकांनी शेख रशीद शेख शफी साहेबांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रवादी काँग्रेस पक्षामध्ये येण्याचा जो निर्णय घेतला, त्याच्याबद्दल मी आपल्याला मनापासून धन्यवाद देतो. मी आपले मनापासून आभार मानतो. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षामध्ये आदरणीय पवार साहेबांच्यावतीनं, तमाम राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्यावतीनं मी आपलं सर्वांचं स्वागत करतो. मराठीमध्ये असं म्हटलं जातं, की आगीतून उठलो आणि फुफाट्यात पडलो अशा पद्धतीची वेळ तुमच्यावर येऊन देणार नाही. एक चांगल्या पद्धतीनं नेहमीच तुम्हाला आधार देण्याचं काम इथून पुढच्या काळामध्ये आपला एक परिवार म्हणून आपण एकमेकाला आधार देणारे आणि तसंच काम आम्हा सर्वांच्याकडनं होईल याबद्दलची ग्वाही शेख रशीद शेख शफी साहेबांना पण देतो आणि आपल्या सर्वांना पण देतो आणि माझे दोन शब्द संपवतो.

जय हिंद! जय महाराष्ट्र!!

■■



# मालेगाव शहराचा चेहरा-मोहरा

आपल्या सर्वांना माहिती आहे, की आसिफभाईंनी राष्ट्रवादी पक्षामध्ये प्रवेश करून काही महिने उलटून गेले आणि आसिफभाईंनी ज्या जोरात काम करायला सुरूवात केलेली आहे, असे वातावरण तर मी मालेगावमध्ये कधीच पाहिले नाही. यापूर्वीही आमचा पक्ष मालेगावमध्ये होता. पण, पक्षासाठी जे प्रेम असले पाहिजे, जी निष्ठा असली पाहिजे असा अनुभव आम्हाला आधी कधी आला नाही. आता आम्हाला अनुभव येत आहे. ज्या ज्यावेळी मी गेलो, तसं तर दोन वेळा गेलो. पण एका वेळी सभा झाली आणि वेळ संपल्यानंतरही एवढ्या मोठ्या संख्येने लोक आले होते, की मोठ्या संख्येने लोक उपस्थित होते. मला वाटते, की आमचा तेथील आमदार आजच निश्चित झाला आहे. आता गरज आहे, २०२४च्या निवडणुकीपर्यंत आम्हाला आमचे प्रयत्न वाढवण्याचे, अतिआत्मविश्वास न बाळगण्याची आणि त्यामुळे जी महत्त्वाची गोष्ट होती, आमचे त्या शहरातील जे नगरसेवक सहकारी आहेत, त्यांनी पक्षात प्रवेश करून पक्षाचे काम सुरू करण्याची. आणि आम्हा सर्वांना या क्षणाची प्रतिक्षा होती. आज तो क्षण आला आहे. आपल्या सर्वांच्या समोर आमचे २७ नगरसेवक याठिकाणी राष्ट्रवादी पक्षात प्रवेश करणार आहेत. विशेषत: रशिद शेख याठिकाणी बसले आहेत. त्यांच्या पायाला त्रास होत असूनही ते याठिकाणी उपस्थित आहेत. मी त्यांचेही मनापासून स्वागत करतो. आमचा पक्ष एका कुटुंबाप्रमाणे आहे. ज्यामध्ये आमच्या प्रत्येक कार्यकर्त्याला न्याय देण्याची भूमिका आमची असते. आज पवार साहेबही येणार होते. मात्र, सध्या कोरोनाची साखळी सुरू आहे. पवार साहेबही काही दिवसांपूर्वी पॉझिटिव्ह आढळले आहेत. त्यामुळे अजितदादा, भुजबळ साहेब, नवाबभाई, आम्ही सर्वजण उपस्थित आहोत.

मालेगाव शहराच्या अनेक समस्या आहेत. या समस्या सोडविण्याचं काम आमचा राष्ट्रवादी पक्ष पुढे जाऊन करणार



# बदलण्याचा प्रयत्न करू

प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील

आहे. मालेगाव शहराचा चेहरामोहरा बदलण्याचा प्रयत्न करताना मालेगावमध्ये विकासाचे अनेक कार्यक्रम आम्ही पुढे जाऊन करू शकतो. आसिफभाईसारखा एक युवा आणि सक्रीय नेता तुम्हा सर्वांना मिळाला आहे. आदरणीय भुजबळ साहेबांच्या नेतृत्वाखाली आम्ही सर्वजण काम करतो. मला आशा आहे, की येणाऱ्या महापालिका निवडणुकीत आमचे बहुमत असेल आणि बहुमताने ज्यावेळी आपला महापौर बसेल, तेव्हा आणखी वेगाने मालेगावचा विकास करण्यासाठी आम्ही सर्वजण तुम्हाला मदत करू शकतो. पक्षाचा अध्यक्ष म्हणून मी तुमचे सर्वांचे स्वागत करतो. पक्ष प्रवेशाचा कार्यक्रम मालेगावध्येच आयोजित केला जाणार होता. मात्र, कोरोनामुळे ५० जणांच्या उपस्थितीचे उल्लंघन न करता आपण याठिकाणी हा कार्यक्रम घेतला आहे. आमची सर्वांचीच त्याठिकाणी येण्याची इच्छा आहे. पण कोरोनाचा काळ थोडासा कमी झाल्यानंतर, कोरोना रूग्णांची संख्या कमी झाल्यानंतर आदरणीय पवार साहेबांना त्याठिकाणी आणून मोठ्या संख्येने आपण त्याठिकाणी सभा आयोजित करू असे आश्वासन देतो. आमच्या ताहिरा शेख महापौर आहेत आणि आमचे रशिद शेख दोन वेळा आमदार राहिले आहेत. आमची फार जुनी ओळख आहे. आम्हाला आनंद आहे, की आता तुम्ही सर्वजण आमच्या कुटुंबाचे सदस्य झाला आहात. मी तुम्हाला आश्वासन देतो, की आदरणीय पवार साहेबांच्या नेतृत्वाखाली आमचा पक्ष जो देशात काम करत आहे, त्यामध्ये मालेगावचे नाव अतिशय महत्त्वपूर्ण असेल आमच्यासाठी आणि मालेगावमध्ये जी प्रगती तुम्ही पाहू शकाल जशी पिंपरी-चिंचवडमध्ये प्रगती झाली आहे. अन्य शहरांमध्ये ज्या ज्या ठिकाणी आमचा पक्ष सत्तेत आला आहे, तेथील जी प्रगती आपण पाहिली आहे. तसाच विकास मालेगावमध्ये करण्याचा आमचा प्रयत्न आम्ही सर्वजण करू. या आश्वासनासह मी माझे दोन शब्द संपवतो. धन्यवाद!



# मालेगावच्या विकासासाठी काहीही कमी पडणार नाही

## अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांची ग्वाही

काल आमचे झेंडावंदन सुरू असताना काही चॅनेलवाले आले आणि म्हणाले, की मालेगावमध्ये काही झाले आहे? मी विचारलं, की काय झालं? तर म्हणाले, की उद्या असं असं होणार आहे. मी म्हटलं, मला काय माहित. असं आहे, की काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस आणि शिवसेना, आमची इच्छा असते, की आम्ही एकमेकांच्या पक्षाला त्रास देऊ नये. आता करायचे तर काय करायचे. हे आसिफभाई शेख यांनी काँग्रेसचा राजीनामा दिला आणि एक महिना नाशिकमध्ये चर्चा सुरू झाली, की ते एमआयएममध्ये जात आहेत. इकडे जात आहेत, तिकडे जात आहेत. आम्ही तर गप्प होतो. शेवटी आम्ही पाहिले, की ते तिकडे जातच आहेत काँग्रेस सोडून, तर आमच्याकडे का येऊ नये. तेव्हा आम्ही पण सांगितले, की आमचाही दरवाजा तुमच्यासाठी उघडा आहे. तेव्हा त्यांनी राष्ट्रवादीत येण्याच निर्णय घेतला.

आता तुम्ही सर्वजण संपूर्ण पक्षच, आमच्या ज्या ताहिराबहन आहेत, महापौर आहेत, तुम्ही जी लोकं आहात, तुम्ही सर्वांनी काँग्रेस पक्षाचा राजीनामा दिला. तेव्हा आम्ही तुम्हाला पर्याय दिला. हा प्रेमाचा विषय आहे. तुम्ही काँग्रेस पक्ष सोडला आहे. काय कारण आहे मला माहित नाही. आता काँग्रेस पक्ष सोडलाच आहे, तर इकडे तिकडे जाण्यापेक्षा पवार साहेबांच्या नेतृत्वाखाली याठिकाणी तुम्ही सर्वांनी काम करावे. जे झाले ते ठीक आहे. तुम्हा सर्वांचे पक्षात स्वागत आहे.

हे ठीक आहे, की अजितदादा काही निधी देत आहेत. आम्ही देत आहोत. आमचे कर्तव्य आहे, की संपूर्ण महाराष्ट्रात ज्या ज्या ठिकाणी आवश्यकता आहे, त्या पूर्ण करण्यासाठी आम्ही काम केले पाहिजे. त्यामुळे देत आहोत. असं नाही, की काही तरी निधी दिला म्हणून पक्षात आले आहेत. हे प्रेम आहे. निधी तर अनेक लोकांना दिला जातो. तुम्हाला पवार साहेबांचे नेतृत्व आवडले, आमचे अजितदादा, जयंतराव यांच्या नेतृत्वाखाली काम करण्याची तुमची इच्छा आहे. तेव्हा आम्ही पण नाही म्हणू शकत नाही. आमचा पण लोकशाही पक्ष आहे. जर कोणी पक्षात येत असेल तर आम्ही तुम्हाला घेणार नाही असं नाही म्हणू शकत नाही. आमच्या इथे पवार साहेबांचे नेतृत्व, त्यांचे विचार मान्य असतील आणि त्यानुसार काम करण्याची इच्छा असेल, तर आम्ही पक्षात घेणार. त्यानुसार तुम्ही आलात, त्याबद्दल खूप खूप आभार.

मालेगावची कथाच निराळी आहे. संपूर्ण देशात कोविड आला, त्यावेळी सर्वात जास्त रूग्णसंख्या मालेगावमध्ये. सर्व आजारी. नंतर कोविड आला, त्यावेळी एकही आजारी नाही. संपूर्ण देश आजारी. आमच्या इथे आरोग्य विद्यापीठ आहे. त्याठिकाणी लेफ्टनंट जनरल कानिटकर भगिनी आल्या आहेत, त्यांची जी संस्था आहे, ती देशभरात काम करत आहे. त्यांनी सांगितलं, की सर्वप्रथम आम्हाला मालेगावची तपासणी करायची आहे. सर्वत्र कोविड आला आहे. याठिकाणी कोविड का येत नाही. देशातील सर्व डॉक्टर आणि लेफ्टनंट जनरल भगिनी तिथे गेले, आणि हजार ते पंधराशे लोकांचे नमुने घेतले. आता त्याच्यावर संपूर्ण देश बसून अभ्यास करेल, की याठिकाणी जाण्यासाठी कोविड का घाबरत आहे. हे असं आहे. हे चमत्कार करतात. जेव्हा होता, त्यावेळीही संपूर्ण देशात पहिल्या क्रमांकावर आणि आता तिसऱ्यांदा कोविड आला, तर सर्वात कमी रूग्णसंख्येतही पहिल्या क्रमांकावर मालेगावच. ही अतिशय चांगली गोष्ट आहे.



ताहिरा बहनचे मी आभार मानू इच्छितो. त्यांच्या बाजूला नांदगाव आहे. त्याठिकाणी मोठा पूर आला आणि घराघरांत, दुकानांमध्ये चिखल भरून गेला. चिखल कसा काढायचा. रस्त्यांवरून कोणाला चालता येत नव्हते. मी दोन-तीन वेळा गेलो. पडता पडता वाचलो. तेव्हा यांना फोन केला आणि सांगितलं, की तुमचे जे सफाई कर्मचारी आहेत, फायर ब्रिगेडवाले आहेत त्यांना पाठवा. सर्व टीम आली आणि दोन दिवसांत संपूर्ण स्वच्छता केली. नवाब भाईंकडे कौशल्य विकास विभाग आहे. कुशलतेचा विकास करत आहे. याठिकाणी जी कुशलता भरून वाहात आहे, घराघरांमध्ये यांचे जे पॉवरलूम्स आहेत, ज्यावर कपडा तयार होतो. कोविडच्या काळात काम ठप्प झाले होते. कोविड ओसरल्यानंतर त्यांना काम सुरू करायचे होते. पवार साहेबही म्हणाले होते, की पॉवरलूम सुरू झाले पाहिजे.आम्ही तयारी केली. मात्र, यांच्याकडे कच्चा मालच उपलब्ध नव्हता. आमच्या जिल्हाधिकाऱ्यांनी बंगळूरच्या जिल्हाधिकाऱ्यांशी संपर्क साधून माल मागविला आणि कसेतरी काम सुरू झाले. नवाब भाईंनी यामध्ये लक्ष घालून येथील लोकांच्या कुशलतेचे काम वाढवावे. आणखी नवीन काय करता येईल का ते पाहावे. तसे नवाब भाई हे काम करतीलच. कारण ते शब्दांचे पक्के आहेत.

आता येणाऱ्या निवडणुकीमध्ये पुन्हा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचाच महापौर त्याठिकाणी बसेल, जसे तुम्ही सांगितले आहे. यामध्ये कोणतीही कमतरता आली नाही पाहिजे. आणि तुम्ही हेही म्हटले आहे, की आगामी काळात जी विधानसभेची निवडणूक होईल, तेव्हा आमदार राष्ट्रवादीचाच असेल. त्यासाठी दादा आहेत. जयंतराव आहेत. पवार साहेबही आहेत. पवार साहेब तुम्ही बोलवाल त्यावेळी निश्चित येतील. पण जरा थांबा. कोविडमुळे उपस्थितीची मर्यादा आहे. ती संपल्यानंतर जयंतराव जसे म्हणाले आहेत, की जेव्हा तिथे जाऊ, त्यावेळी पन्नास हजार, एक लाखापेक्षा कमी लोक नाहीत अशी गर्दी होते. पवार साहेब येतील. आम्हीही येऊ. तुमचे जे काही काम करायचे आहे, त्यासाठी आमची जबाबदारी आहे. आपल्याला कधीही असे वाटणार नाही, तुम्हाला कधीही पश्चाताप होणार नाही, की आम्ही हा पक्ष का निवडला. आम्ही सर्वजण तुमच्याबरोबर राहू आणि महाविकास आघाडी तुमच्या ज्या काही समस्या आहेत त्या सोडवण्यासाठी भरीव प्रयत्न करेल. येणाऱ्या सर्व निवडणुका आम्ही राष्ट्रवादीच्याच लोगोवर लढू आणि जिंकूही. मी पुन्हा तुम्हा सर्व लोकांचा आभारी आहे. एका चांगल्या पक्षात तुम्ही आला आहात आणि मालेगावच्या विकासासाठी येथे काहीही कमी पडणार नाही या आश्वासनासह थांबतो. खूप खूप आभार. जय हिंद! जय महाराष्ट्र!!

■■

# समारंभात झालेली अन्य मान्यवरांची भाषणे...

## नवाब मलिक



मला आठवतंय, की निवडणुकीच्या काळात आसिफ भाईंचा फोन यायचा, ज्यावेळी ते लढत होते, आम्हा लोकांची आघाडी होती, पण त्यावेळी त्यांना त्यांच्या पक्षाने ज्या पद्धतीने दुर्लक्षित केलं, त्यामुळे त्यांच्या मनात एक प्रकारची अस्वस्थता होती. नंतर त्यांनी निर्णय घेण्याचे काम केले. आज तुम्ही सर्व लोकांनी निर्णय घेतला आहे आणि ज्या अपेक्षेने तुम्ही राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश करत आहात, मी आश्वासन देतो, की सर्व अपेक्षा पूर्ण करण्याचा आम्ही प्रयत्न करू.

रशीद भाईंनी नगर उद्यानमधून डीपीडीसीतून निधी घेऊन मालेगावच्या प्रगतीसाठी काम करण्याचे आश्वासन दिले आहे. रशीद भाई तुम्ही मला मागितले नाही, पण मालेगावच्या विकासासाठी निधी देण्याचे काम केले जाईल. त्याचबरोबर आणखी काही योजना आहेत. तुम्ही सांगितलं, की आम्हाला पॉलिटेक्निक उभारायचं आहे. त्यासाठीही पैसे देता येतात का तेही पाहिले जाईल आणि जी काही मालेगावच्या विकासाचे काम असेल ते पूर्ण करण्याचे काम केले जाईल. त्याचबरोबर मालेगावमध्ये राहणारे अन्सारी बिरादरीचे लोक, विणकर, पॉवरलूमचे लोक आहेत, त्यांच्याही समस्या असतील. त्याही सोडवण्याचे काम करू. मालेगाव शहरात अल्पसंख्याक समाज मोठा आहे. त्यांच्या विकासासाठीही काही कार्यक्रम राबविण्याचा आमचा प्रयत्न राहील. आमचे विशेष लक्ष मालेगाववर राहील असे आश्वासन देतो.

ही गोष्ट खरी आहे, की संपूर्ण भारतातील लोक पवार साहेबांकडे पाहात आहेत. सर्व लोकांना विश्वास आहे, की भारतीय जनता पक्षाचा खरा सामना कोण करू शकतो, तर ते पवार साहेब आहेत. दुसरा कोणता नेता नाही. आम्ही धर्मनिरपेक्ष विचारांचे पालन करणारे आहोत. धर्मनिरपेक्षतेशी आम्ही कधी तडजोड करत नाही. रशीद भाई आपण योग्य निर्णय घेतला आहे. त्यामुळे मालेगावमध्ये पुढील महापौर पुन्हा राष्ट्रवादीचाच असेल, अशी आशा करून मी माझे दोन शब्द संपवतो. जय हिंद! जय महाराष्ट्र!!

## रशीद शेख



मी जास्त बोलणार नाही. पण, आगामी काळात जी महापालिकेची निवडणूक होईल, आपल्या पक्ष प्रवेशापूर्वीच अजितदादांनी मालेगावच्या विकासासाठी दहा कोटी रूपये दिले आहेत, त्याचवेळी आपले पालकमंत्री भुजबळ साहेबांनीही पाच कोटी रूपये दिले आहेत, मला आशा आहे, की आगामी अर्थसंकल्पातही आसिफभाईंनी केलेल्या मागणीचा समावेश केला जाईल आणि अशा पद्धतीने निवडणुकीच्या आधीचशहराला दहा ते पंधरा कोटीचा निधी मिळाला आहे. यामध्ये आणखी भर पडली जाईल. ज्या पद्धतीने दादा कोणत्याही पक्षाच्या विरोधात जात नाहीत आणि आजी असो, माजी असो काही गोष्टी बसून त्यावर तोडगा काढतात. आम्ही अशी गोष्ट शहरात होऊ देणार नाही, की आमचा नगरसेवक असो किंवा छोटा-मोठा कार्यकर्ता असो, त्यांना नाराज होऊ देणार नाही.

आजपर्यंत मालेगाव शहरात, जसे आसिफभाईंनी सांगितलं, की पूर्वी मालेगाव शहरात काँग्रेसकडून नेहमी लाल फुली असायची, की तिथे काँग्रेसची जागा कधी येणार नाही. पण १९९९मध्ये आमच्या शहरातील तमाम छोटे-मोठे कार्यकर्ते, आणि नगरसेवकांनी दाखवून दिले होते, की काँग्रेसचा आमदार जिंकून येऊ शकतो. त्याच पद्धतीने आज तर आमच्या प्रवेशाने मालेगावमध्ये राष्ट्रवादीला बहुमत मिळाले आहे. आगामी निवडणुकीनंतरही महापालिकेत राष्ट्रवादीचा महापौर तसेच समित्यांचे अध्यक्ष राष्ट्रवादीचेच असतील हे तुम्हाला सांगू इच्छितो. अजितदादा साहेब, भुजबळ साहेब, जयंत पाटील साहेब यांच्या नेतृत्वाखाली आम्ही सर्वजण राष्ट्रवादीमध्ये प्रवेश करताना जी आशा आम्ही ठेवली आहे, ती निश्चितपणे जयंत पाटील साहेब यांनी सांगितल्याप्रमाणे पिंपरी-चिंचवडला जसे तुम्ही डेव्हलप केले. मालेगावलाही अशाच पद्धतीने तुम्ही सुंदर बनवा. तुम्हाला कधीही तक्रार ऐकायला मिळणार नाही. धन्यवाद. जय हिंद! जय महाराष्ट्र!! जय राष्ट्रवादी!!!

## ताहिरा शेख



आज आपल्यासाठी खूप मोठा दिवस आहे. आज आपण काँग्रेस पक्ष सोडून राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश करत आहोत. मी अजितदादा साहेब, भुजबळ साहेब आणि राष्ट्रवादीच्या नेते मंडळींना विश्वास देऊ इच्छिते, की शेख रशिद साहेबांचे आशिर्वाद आणि आसिफ शेख यांच्या नेतृत्वाखाली मालेगाव शहरात महापालिकेच्या येणाऱ्या निवडणुकीत राष्ट्रवादीचा झेंडा फडकेल, असा विश्वास या व्यासपीठावरून मी तुम्हा सर्वांना देते. भुजबळ साहेब आणि पवार साहेब, मालेगाव शहरातून हे जे २८ नगरसेवक आले आहेत, ते शेख रशीद शेख आणि आसिफ शेख यांचे सहकारी आहेत. हे जमिनीवरील युद्ध लढणारे शिपाई आहेत. त्यांनी जमिनीवरून वर येत हे यश मिळवले आहे. मी तुम्हाला सांगू इच्छिते, की आगामी काळात मालेगावमध्ये केवळ आणि केवळ राष्ट्रवादीचा रंग पाहायला मिळेल. आणि तुम्हा लोकांनाही एक विनंती आहे, की मालेगाव शहरातील हे जे कार्यकर्ते, लोक दिसत आहेत ते अतिशय कमी प्रमाणात तुम्हाला पाहायला मिळत आहे. आम्ही केवळ निवडक नगरसेवक, पदाधिकाऱ्यांना बोलावले आहे. अन्यथा निम्म्यापेक्षा अधिक मालेगाव शहर उपस्थित राहिले असते.

मी तुम्हाला विनंती करते, की तुम्ही जास्तीत जास्त विकास निधी देऊन मालेगाव शहराचा विकास कराल आणि विकास निधी देऊन मालेगाव शहराच्या सर्व समस्या सोडवाल अशी आशा आम्हाला तुमच्याकडून आहे. तुम्हाला आमचा विश्वास सार्थ करून दाखवायचा आहे हाच आमचा प्रयत्न राहील. शेख रशीद साहेबांच्या मार्गदर्शनाखाली आणि आसिफ शेख यांच्या नेतृत्वाखाली आम्ही तुम्हाला विश्वास देतो, की आम्ही आगामी काळात मालेगाव शहरात राष्ट्रवादीचा महापौर तर बसवूच आणि आगामी विधानसभा निवडणुकीत मालेगावमधून आमदार म्हणून आसिफ शेख यांना निवडून आणू असा विश्वास देत मी माझे दोन शब्द संपवते. जय हिंद! जय महाराष्ट्र!!

## आसिफ शेख



आजचा हा कार्यक्रम आमचे नेते शेख रशीद साहब, ताहिरा शेख रशीद साहिबा आणि २८ नगरसेवकांचा राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेशाचा कार्यक्रम आहे. आज मी मालेगाव शहर जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्यावतीने, महाराष्ट्र प्रदेश राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्यावतीने तुम्हा सर्वांचे स्वागत करतो. मी आमचे नेते अजितदादा साहेब, जयंत पाटील साहेब, भुजबळ साहेब आणि मलिक साहेब यांना सांगू इच्छितो, की मालेगाव शहर हे यंत्रमागधारकांचं शहर आहे. कामगारांचं शहर आहे आणि आमच्या ठिकाणी ७० टक्के कामगार वस्त्या आहेत. संघर्ष करणारे लोक मालेगाव शहराचे आहेत. आणि हे आमचे सगळे विद्यमान नगरसेवक, कार्यकर्ते हे अतिशय संघर्ष करून, कष्ट करून शेख रशिद साहेबांच्या नेतृत्वाखाली आम्ही काँग्रेस पक्षात काम केले आणि आज पक्ष प्रवेश झाल्यानंतरही शेख रशिद साहेब यांच्या नेतृत्वाखाली मालेगाव शहरात काम करणारे कार्यकर्ते आहोत. हे सर्व संघर्ष करणारे आमचे नगरसेवक, कार्यकर्ते मालेगाव शहरातील आहेत.

शेख रशिद साहेब हे अजितदादा साहेब, जयंत पाटील साहेब, भुजबळ साहेब, नवाब मलिक साहेब यांच्यासमवेत १९९९पासून २००९पर्यंत आमदार होते आणि शेख रशिद साहेबांचा इतिहास सांगण्याची मला वाटते, की अधिक आवश्यकता नाही. शेख रशिद साहेब खूप संघर्ष करून, खूप कष्ट करून नगरसेवक, नगराध्यक्ष, आमदार, यंत्रमाग महामंडळाचे अध्यक्ष आणि महापौरपदापर्यंत त्यांनी जे काम केले आहे, त्यांचा जो प्रवास झाला आहे, तो अतिशय कष्ट करून आणि अतिशय छोट्या कुटुंबातून, एका गरीब कुटुंबातून, कामगार कुटुंबातील आमचे जे नेते आहेत शेख रशीद साहेब यांनी इथपर्यंतचा प्रवास केला असून, आज ते या टप्प्यावर पोहोचले आहेत, की आमचे नेते आज राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश करत आहेत.

शेख रशीद साहेबांची जी विचारधारा आहे, आणि त्यांच्या मार्गावरून एकत्रितपणे पुढे जाण्याच्या भूमिकेतून आम्ही मालेगाव शहरात राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष मजबूत करण्याचे काम आम्ही एकत्रितपणे करू असा विश्वास मी आज आमच्या

नेत्यांना देतो. मी अजितदादा साहेब, भुजबळ साहेबांचे आभार मानतो, की मार्चमध्ये मी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश केला आणि अजितदादांकडे ज्यावेळी आम्ही निधीची मागणी केली, पत्र घेऊन मी गेलो, त्यावेळी अजितदादा पवार साहेबांनी १० कोटी रूपये विकास निधी मालेगाव शहरासाठी मंजूर केला. छगन भुजबळ साहेबांकडे आम्ही शहरासाठी पाच कोटी रूपये मागितले. त्याचीही ऑर्डर निघाली आहे. त्याचे पैसे मिळणे बाकी आहे. दुसऱ्यांदा आठ दिवसांपूर्वी मी अजितदादांना मंत्रालयात भेटलो आणि त्यांना मी दोन प्रस्ताव दिले, की अर्थसंकल्पात तरतूद असली पाहिजे, एक पॉलिटेक्निक कॉलेजसाठी आणि दुसरी हिल स्टेशनसाठी आणि पंधरा कोटी रूपये जो विशेष निधी आहे, तो आम्हाला मालेगाव शहरातील रस्त्यांसाठी मिळाला पाहिजे. मी ही मागणी केली आणि अजितदादा पवार साहेबांनी विश्वास दिला आहे, की तुम्ही चिंता करू नका, मालेगाव शहरासाठी जेवढा निधी लागेल, जो विकास निधी लागेल, तो निश्चितच मालेगाव शहराला देण्याचे काम करेन. मी त्यांचे खूप खूप आभार मानतो आणि हे आश्वासन देऊ इच्छितो आमच्या नेत्यांना, की शेख रशीद साहेब यांच्या नेतृत्वाखाली २८ नगरसेवक राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश करत आहेत हे अतिशय मोठे काम महाराष्ट्रात होत आहे. मी आश्वासन देऊ इच्छितो, की एप्रिल–मे महिन्यात आमच्या महानगरपालिकेची निवडणूक आहे आणि आजपासूनच आम्ही कामाला सुरूवात केली आहे. आम्ही विश्वास देऊ इच्छितो, की राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा महापौर बसवण्याचं काम आम्ही सर्वजण मिळून करू आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला मजबूत करण्याचं काम करू.

मालेगाव शहरात अल्पसंख्याक समाज मोठ्या प्रमाणात राहातो. ९० टक्के लोक अल्पसंख्याक समाजाचे आहेत आणि त्यांच्या ज्या भावना आहेत त्या दुखावण्याचं काम या देशात ज्यावेळी भारतीय जनता पक्षाचे सरकार आले आणि २०१४मध्ये महाराष्ट्रामध्ये सरकार आले, तेव्हापासून मालेगाव शहर आणि संपूर्ण महाराष्ट्रातील मुस्लिम समाज, अल्पसंख्याक समाजाचे मन दुखावण्याचं काम, महिलांचे मन दुखावण्याचं काम केले गेले आहे. मात्र, आम्हाला आज आनंद होतोय, की ज्या पक्षात मी आहे आणि आज आपण सर्वजण सहभागी होणार आहात, ते शरद पवार साहेब, ज्यांच्या नेतृत्वाखाली आम्ही करत आहोत, जी त्यांची रणनीती आहे, त्यांची जी धर्मनिरपेक्ष विचारधारा आहे, देशातील सेक्युलर पक्षांना एकत्र करून जे काम करत आहेत भारतीय जनता पक्षाच्या विरोधात आणि या देशात सेक्युलॅरिझम मजबूत व्हावे त्यासाठी जे काम करत आहेत, आम्हाला आणि अल्पसंख्याक समाजाला पूर्ण विश्वास आहे, की निश्चितच शरद पवारच एक असे नेते आहेत, जे या देशात भारतीय जनता पक्षाचा सामना करू शकतात आणि राज्यात अजितदादा पवार साहेबांच्या नेतृत्वाखाली जो विकास होत आहे, निश्चितच मला आशा आहे, की येणाऱ्या महापालिका निवडणुकांमध्ये महाराष्ट्रात आणि येणाऱ्या विधानसभा निवडणुकीत निश्चितच राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष महाराष्ट्राचा एक नंबरचा पक्ष बनेल असा विश्वास आम्हाला वाटतो.

मी अधिक वेळ न घेता, पुन्हा एकदा तुम्हा सर्व लोकांचे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात स्वागत करतो आणि आमच्या नेत्यांना विनंती करतो, की मालेगाव शहरासाठी जो विकास निधी लागेल, त्यासाठी तुम्ही निश्चितच मालेगाव शहराला झुकते माप द्याल असा विश्वास व्यक्त करताना तुम्हा सर्वांचे आभार मानून माझे दोन शब्द संपवतो. जय हिंद! जय महाराष्ट्र!! ■■



With Best Compliments From

IVORY SOAP WORKS LTD.

Manufacturer of Cosmetic & Toiletries

- Address -
H-44 MIDC Industrail Area, Nashik - 422010.
Tel. No. : (0253) 6603424 / 6603425
(0253) 2381436 / 2381654


With Best Compliments From

SBS MEDICALS

Lion Kartar Singh Hospital,
Near Navrang Cinema, Gaon Devi, Dongari, Andheri West.

**अनंत बागाईतकर**

# उत्तर प्रदेश आणि अस्वस्थ भाजप!





उत्तर प्रदेशासह पाच राज्यांमध्ये विधानसभेच्या निवडणुका होत आहेत. त्या जिंकण्याच्या ईर्षेने भाजपचे नेते रिंगणात उतरले आहेत. पंजाबमध्ये भाजपला सत्ता मिळण्याची चिन्हे नाहीत. स्वबळावर तर अजिबातच नाही. परंतु तेथे राजकीय अस्थिरता निर्माण करणे हे भाजपला त्यांच्या राजकीय उद्दिष्टांसाठी हितकारक वाटत असल्याने या संवेदनशील राज्यात त्रिशंकू विधानसभा अस्तित्वात आणण्यासाठी व त्याद्वारे तेथे आपला 'दिल्ली रिमोट कंट्रोल' चालविण्याचे स्वप्न किंवा उद्दिष्ट भाजपने राखले आहे. उत्तराखंड व गोव्याबाबत भाजपचे नेतृत्व जरा बेफिकिर आहे. यामध्ये मणिपूरचाही समावेश करणे उचितच ठरेल कारण ही तिन्ही राज्ये लहान आहेत. तेथे 'निवडून कुणीही येवो, सरकार भाजपचेच स्थापन होणार' अशी फुशारकी भाजपचे नेते खासगीत मारताना आढळतात. त्यात तथ्यही आहे. कारण सध्या साधनसंपत्तीने मत्त असा एकमेव राजकीय पक्ष भारतीय राजकारणात आहे व तो म्हणजे 'भारतीय जनता पक्ष' आहे. या जोरावरच या पक्षाने गोव्यात 'बहुमत व तथाकथित विजय खरेदी करुन' सरकार स्थापन केले होते. एका राजकीय नेत्याने भाजपच्या या नव्या रणनीतीवर चांगली टिप्पणी केली होती. तो म्हणाला होता 'या नव्या बदलत्या राजकारणात ज्या पक्षाकडे साधनसंपत्तीची ताकद असते तो पक्ष बहुमतच नव्हे तर राजकीय विजय सुध्दा चक्क शत-प्रतिशत खरेदी करण्याची क्षमता राखून असतो. आणि भाजपने ती क्षमता सिध्द केलेली आहे.' त्यामुळे उत्तराखंड, गोवा व मणिपूर यासारख्या

लहानलहान राज्यांमध्ये राजकीय निष्ठेपेक्षा स्वतःच्या राजकीय किमतीचे भान अधिक प्रभावीपणे राखणाऱ्या आमदारांमुळे राजकीय घोडेबाजार नेहमीच तेजीत राहतो आणि ज्या राजकीय पक्षाकडे पैसा त्याच्याकडे सत्ता जात असते. त्यामुळे या तीन लहान राज्यांच्या राजकीय भवितव्याबद्दल राजकीय आडाखे बांधण्यापेक्षा त्यांचे येणारे निकाल आणि नंतरच्या राजकीय कोलांट उड्या पाहणे एवढेच जनतेच्या हाती राहते.

या पार्श्वभूमीवर उत्तर प्रदेशासारख्या महाकाय आणि देशातील सर्वात मोठ्या राज्याच्या विधानसभा निवडणुकीचा विचार करावा लागेल. उत्तर प्रदेशातील विधानसभेच्या एकंदर जागा ४०३ आहेत. (लोकसभेच्या जागांची संख्या ८० आहे). २०१७च्या विधानसभा निवडणुकीत भाजपने अपना दल व इतर काही लहानशा पक्षाबरोबर आघाडी केली होती. या आघाडीला ३१२ जागा मिळाल्या होत्या. त्यामुळे ४०३च्या विधानसभेतील भाजपचे बहुमत ३१२ असे महाकाय होते. दुसऱ्या क्रमांकावर समाजवादी पक्ष होता त्यांना ४९ जागा मिळाल्या होत्या. बहुजन समाज पक्षाची वाताहात झाली होती. केवळ १७ जागा मिळाल्या होत्या. काँग्रेसला केवळ तीन





**योगी महाराजांनी उत्तर प्रदेशात हिंदुत्वाचे आणि उघडउघड मुस्लिमद्वेषाचे उन्मादी राजकारण सुरु केले. यामध्ये गोरक्षणाच्या नावाखाली मुस्लिमांना टार्गेट करण्यात आले. गोमांस खाण्याचे तथाकथित खोटे बनावट प्रकार रचण्यात आले आणि अगदी पार संबंधित मुस्लिमांच्या हत्यांपर्यंत मजल गाठण्यात आली. परंतु धार्मिक राजकारण करताना आणि हिंदुत्वाच्या एकाच आवरणात सर्वांना बंदिस्त करण्याचा त्यांचा प्रयत्न मात्र त्यांची पाच वर्षांची कारकिर्द संपतासंपता फसला गेला. कारणजेव्हा धर्माच्या नावाने राजकारण सुरु झाल्यानंतर त्यांची व्याप्ती मर्यादितच राहते.**


जागा जिंकता आल्या होत्या. भाजपचा विजय हा हिंदुत्वाचा विजय असल्याचे सांगण्यात आले आणि उत्तर प्रदेशाच्या मुख्यमंत्रीपदाची माळ योगी आदित्यनाथ यांच्या गळ्यात घालण्यात आली. उत्तर प्रदेशाची २०१७ची ही निवडणूक आणि त्या पार्श्वभूमीवर झालेली २०१९ची सार्वत्रिक किंवा लोकसभेची निवडणूक यांचा निश्चितपणे परस्परसंबंध होता. किंबहुना २०१९च्या लोकसभा निवडणुकीचा २०१७ची उत्तर प्रदेश विधानसभा निवडणूक हा 'ट्रोलर' होता असे म्हटल्यास वावगे होणार नाही. याचे कारण भाजपने किंवा भाजपच्या वर्तमान नेतृत्वाने विकास व प्रगती किंवा राष्ट्रीय मुद्यांवर कधीच निवडणुका जिंकलेल्या नाहीत. दरवेळेस त्यांनी हिंदुत्व, कट्टर

व आक्रमक हिंदुत्व, धार्मिक ध्रुवीकरणाचा आधार घेऊनच निवडणुका जिंकलेल्या आहेत.

विश्वप्रिय ब्रह्मांडनायकांनी देखील गुजरातमधील विधानसभा निवडणुकांमध्ये याच मुद्यांचा वापर केलेला होता. अन्यथा गुजरातच्या तथाकथित विकासाच्या मॉडेलच्या आधारे त्यांना निवडणुका लढवायच्या असत्या तर त्यांनी निवडणुकांमध्ये 'हमारे पाच उनके पच्चीस', गुजरातमे भाजप हारेगी तो पाकिस्तान में दिवाली मनाएंगे, मियाँ मुशर्रफ' अशा मुस्लिमविरोधी आणि हिंदुत्वाचा उन्माद फैलावणाऱ्या घोषणांचा वापर केला नसता. पण स्वतःच्या पोकळ विकासाच्या मुद्यावर निवडणूक जिंकण्याची खात्री नसल्यानेच भाजपनेतृत्वाने नेहमीच धार्मिक ध्रुवीकरणाचा वापर केलेला आढळतो. हाच खेळ त्यांनी २०१७-२०१९मध्ये केला होता. तो खेळ व ती रणनीती देखील या सध्याच्या निवडणुकीच्या निमित्ताने विचारात घ्यावी लागेल. त्याचबरोबर २०१७मध्ये उत्तर प्रदेशाची सूत्रे या काषाय-वेषधारी(भगव्या वेषधारी) योगीमहाराजांकडे देण्यामागेही हा राजकारणप्रेरित धार्मिकतेचाच भाग होता. भाजप नेतृत्वद्वयास योगीमहाराजांबद्दल फार प्रेम व आस्था आहे म्हणून नव्हे तर त्यांच्या हिंदुत्वाने प्रेरित राजकारणाला योगीमहाराज सोयीचे वाटल्याने त्यांना मुख्यमंत्रीपद देण्यात आले होते. आता त्यास पाच वर्षे लोटली आहेत. त्यामुळेच पाच वर्षात गंगा-यमुनेतून जे पाणी वाहून गेलेले आहे त्याचा आढावा घेऊनच आगामी निवडणुकीबद्दल काही अंदाज बांधावे लागतील. ते तंतोतंत बरोबर व अचूक येतील हे शक्य नाही. परंतु उत्तर प्रदेशातील सद्यःस्थिती काय आहे हे लक्षात घेऊन निवडणुकीतील फलनिष्पत्तीचा एक सर्वसाधारण अंदाज बांधणे शक्य होईल.

२०१७ मध्ये योगी महाराजांकडे मुख्यमंत्रीपद देण्यात आले त्यावेळी झालेल्या चर्चेचा संदर्भ लक्षात ठेवणेही महत्वाचे राहील. त्यावेळच्या दिल्लीतील राजकीय वर्तुळातील चर्चेनुसार पंतप्रधानांना योगीं ऐवजी उत्तर प्रदेशाचे मुख्यमंत्रीपद मनोज सिन्हा या त्यांच्या अतिविश्वासू सहकाऱ्याकडे देण्याची इच्छा होती. (सध्या सिन्हा हे जम्मू-काश्मीरचे नायब राज्यपाल आहेत). परंतु अमित शहा यांनी योगीमहाराजांचे नाव पुढे चालविले आणि लोकसभेची निवडणूक वगैरे राजकीय मुद्दे सादर करुन त्यांना मुख्यमंत्री केल्यास भाजपला हिंदुत्वाचे राजकारण चालविणे शक्य होईल असे सांगितले. त्यांची भूमिका मान्य केली गेली व योगीमहाराज मुख्यमंत्री झाले. योगीमहाराज हे गोरखपूर पीठाचे वारसदार किंवा उत्तराधिकारी असले तरी ते मूळचे उत्तराखंडी म्हणजे उत्तराखंडचे आहेत. ते बिष्ट म्हणजे राजपूत किंवा ठाकूर आहेत.

भारतात गोरखपूरचे गोरक्षनाथ मंदिराचे पुजारीपद राजपूत किंवा ठाकूर समाजाकडे असण्याचे अपवादात्मक उदाहरण आहे. महंत अवैद्यनाथ यांचे उत्तराधिकारी या नात्याने ते गोरखपूरचे झाले आहेत. गोरखपूरमध्ये त्यांनी हिंदू युवा वाहिनी नावाची संघटना स्थापन करुन भरपूर प्रसिध्दी मिळविली. ही संघटना आणि तिचे उद्योग हे वादग्रस्त ठरल्यामुळे तिची प्रसिध्दी कोणत्या स्वरुपाची असेल याचा अंदाज लावणे शक्य




होईल. आता या निवडणुकीत योगीमहाराज गोरखपूरमधूनच विधानसभा निवडणूक लढविणार आहेत आणि त्यांनी तत्काळ या संघटनेला पुनर्जीवित केले आहे. त्यामुळे मुख्यमंत्र्याचा वरदहस्त असलेली ही संघटना कशा प्रकारे काम करील याचाही अंदाज येऊ शकेल. योगी महाराजांसाठी गोरखपूरप्रमाणेच अयोध्या आणि मथुरा या दोन ठिकाणच्या मतदारसंघांचाही विचार करण्यात आला होता.

वाराणसीचा विचारही झाल्याचे सांगितले जाते. परंतु दोन अतिगर्विष्ठ व्यक्ती, अति अहंमन्य नेते परस्परांची सावलीही पडू देत नसतात. त्यामुळे योगी महाराजांना वाराणसीच्या आपल्या प्रभाव क्षेत्रात प्रवेश देण्याची चूक ब्रह्मांडनायकांकडून कदापि होणार नव्हती आणि त्यामुळेच योगी महाराजांसाठी वाराणसीचे दरवाजे बंद राहणे अत्यंत स्वाभाविक आणि अपेक्षितच होते. त्यांना गोरखपूरवरच समाधान मानावे लागले. त्याचप्रमाणे योगीमहाराजांना अयोध्या, मथुरा किंवा

वाराणसीसारख्या हिंदुत्वनिष्ठ राजकारणाची प्रमुख प्रतीके असलेल्या मतदारसंघातून निवडणूक लढवायला लावून आपल्या स्वतःच्या बरोबरीला आणून ठेवण्याची घोडचूक ब्रह्मांडनायक करणार नसल्याने त्यांनी योगीमहाराजांना मुकाट्याने त्यांच्या गोरखपूरमधूनच निवडणूक लढवायला भाग पाडले असा त्याचा अर्थ लावला जातो. अन्यथा नंदनवनात केल्याचे दावे सध्या केले जातात. ब्रह्मांडनायकांनी योगीमहाराजांनी त्यांच्या नेहमीच्या स्टाईलमध्ये , 'योगी नव्हे उपयोगी' वगैरे विशेषणे देण्याचा सवंगपणा किंवा हलकेपणा केलेलाच आहे. परंतु घोषणाबाजी, जाहिरातबाजी, खोटा प्रचार, गगनभेदी घोषणा यापलीकडे उत्तर प्रदेशात काहीही घडलेले नाही. अन्यथा केंद्र सरकारचेच अंग असलेल्या



योगीमहाराजांना अयोध्येहून निवडणूक लढविण्याची मनोमन इच्छा होती. ज्याप्रमाणे ब्रह्मांडनायकांनी त्यांच्या हिंदुत्वनिष्ठ राजकारणाचा भाग म्हणून गुजरातऐवजी वाराणसीतून लोकसभा निवडणूक लढवून तेच हिंदुत्वनिष्ठ राजकारणाचे प्रमुख ठेकेदार कसे आहेत हे दाखवले तोच प्रकार उत्तर प्रदेशाच्या पातळीवर योगीमहाराज करु इच्छित होते आणि अयोध्येहून निवडणूक लढवून विजयी झाल्यानंतर त्यांना त्यांच्या अनुयायांनी भगवान रामचंद्राचे स्थान देणेच बाकी ठेवले असते ही धास्ती भाजपच्या दिल्लीपतींना डाचत असल्याने योगीमहाराजांना गोरखपूरमध्येच मर्यादित करण्यात आले. भाजपमध्ये आपल्यापुढे कुणी जाता कामा नये यासाठी ब्रह्मांडनायक किती सतर्क असतात याचा हा नमूना आहे. त्यामुळेच योगीमहाराजांना अयोध्या व मथुरेहून तिकिट नाकारण्यात आले.

आता जरा योगीमहाराजांच्या पाच वर्षांच्या कारकिर्दीवर नजर टाकू यात. योगी महाराजांनी उत्तर प्रदेशाचे रुपांतर नीती आयोगाने निर्धनता आणि गरीबी यामध्ये उत्तर प्रदेशाला तिसऱ्या क्रमांकावर ठेवले नसते. एवढेच नव्हे तर आरोग्याच्या क्षेत्रात या महान राज्याचा क्रमांक शेवटचा असल्याचेही आता स्पष्ट व सिध्द झाले आहे. ही माहिती सरकारी असल्याने कुणी त्यावर अविश्वास दाखविण्याचे कारण नाही. करोना साथीची हाताळणी योगीमहाराजांनी कशी केली याचे पुरावे आणि आठवणी कुणाच्याच मनातून पुसल्या जाणाऱ्या नाहीत. गंगा नदीत करोनाग्रस्त बळींचे वाहणारे मृतदेह किंवा गंगेच्या किनाऱ्यावरील शेकडो-हजारो दहनक्रियांचे फोटो किंवा वृत्तवाहिन्यांवरील वार्तांकन सर्वांच्याच स्मरणात आहेत.

लसीकरणातही उत्तर प्रदेश प्रथम क्रमांकावर असल्याचा दावा केला गेलेला आहे. खुद्द ब्रह्मांडनायकांनीही त्यांच्या नेहमीच्या असत्यकथन शैलीत त्याचा उल्लेख केलेला आहे. प्रत्यक्षातील चित्र काय होते याचे एकच प्रातिनिधिक उदाहरण पुरेसे आहे. दिल्लीला लागून असलेल्या



कोरोनाग्रस्त मृत व्यक्तींची प्रेते गंगा नदीत सोडून दिली.

गाझियाबाद परिसरातील अनेक कुटुंबातील हा प्रकार आहे. लसीकरणासाठी मोबाईलद्वारे नोंदणी केली जाते. त्यानुसार असंख्य नागरिकांनी नोंदणी केली आणि लसीकरणासाठी हजर होण्याचा निरोप आल्यानंतर ते सरकारी आरोग्यकेंद्रात गेल्यावर त्यांना त्यांच्या आयुष्यातला मोठा धक्का बसला. कारण तेथे गेल्यावर त्यांना तुमचे लसीकरण झाल्याची नोंद असल्याचे कारण त्यांना सांगण्यात आले. याचा अर्थ काय होतो? म्हणजेच ज्यांनी लसीकरणासाठी नोंदणी केली त्यांचे लसीकरण झाल्याची खोटी व परस्पर नोंद सरकारी कागदपत्रात करण्यात आली आणि लोकांना तुमचे लसीकरण झाले म्हणून लस न देताच घरी परत पाठविण्यात आले. वर उत्तर प्रदेशात शंभर टक्के लसीकरण झाल्याचा दावाही करण्यात आला. थोडक्यात योगीमहाराजांच्या राज्यकारभाराचे हे काही नमूने सादर केल्यानंतर त्यांच्या महान कारभाराची थोडी कल्पना लोकांना यावी. आता प्रश्न पडतो की एवढे सर्व होऊनही माध्यमांनी योगीमहाराजांच्या विरोधात बातम्या का दिल्या नाहीत? याचे कारण योगीमहाराजांनी त्यांच्या पाच वर्षांच्या काळात दिल्लीसह देशातील सर्व प्रमुख वृत्तपत्रे आणि वृत्तवाहिन्या यांना मोठमोठ्या जाहिरातींचा खुराक भरवून मिंधे करुन ठेवले. त्यामुळे त्यांना योगीमहाराजाच्या विरोधात चकार शब्दाने विरोध करण्याची हिंमत राहिलेली नव्हती. योगींनी या जाहिरातबाजीवर केलेली अब्जावधी रुपयांची उधळण देशाच्या सत्तर वर्षातील सर्वोच्च असावी. या त्यांच्या अमाप खर्चाचे खरोखर ऑडिट होण्याची गरज आहे. याखेरीज योगीमहाराजांचे व्यक्तिमत्वही त्यांच्या प्रतिमाभंजनास कारणीभूत ठरले. योगीमहाराज हे त्यांच्या विनम्र किंवा राजकीय नेत्याला आवश्यक असा मिळूनमिसळून वागण्याच्या स्वभावाबद्दल प्रसिध्द नाहीत. ते एकाकी किंवा स्वतःच्या कोषात राहणारे राजकारणी आहेत. आता त्यांच्या पक्षातले अनेक आमदार सांगतात की योगीमहाराजांनी क्वचितच आमदारांच्या बैठका गेल्या पाच वर्षात घेतल्या. त्यामुळे आमदार आणि अगदी खासदारांची मतदारसंघांमधली कामे तर दूरच राहिली. योगीमहाराज सहजासहजी त्यांच्या पक्षाच्याच आमदारांना भेटतही नव्हते. त्यांनी त्यांच्या खास नोकरशहांचे वर्तुळ तयार केलेले होते व ते त्यांच्या नावे कारभार करीत असत. आमदारांना देखील कामासाठी या अधिकाऱ्यांकडे जाण्यास सांगितले जाई. ही शैली त्यांनी ब्रह्मांडनायकांकडून उचलली असावी असे वाटते. आमदारांना



१५ वर्षांपूर्वी धर्मांतर केलेल्या व्यक्तीला पुन्हा हिंदू धर्मात घेण्यात आले.

आणि उत्तर प्रदेशातील खासदारांना त्यांच्या मतदारसंघांमधील कामांसाठीही योगीमहाराजांऐवजी या अधिकाऱ्यांशीच संपर्क साधावा लागे. यामुळे त्यांच्या या कामकाज पध्दतीच्या विरुध्द असंतोष वाढतच गेला नाही तर त्याची तीव्रता वाढत गेली.

याखेरीज योगी महाराजांनी उत्तर प्रदेशात हिंदुत्वाचे आणि उघडउघड मुस्लिमद्वेषाचे उन्मादी राजकारण सुरु केले. यामध्ये गोरक्षणाच्या नावाखाली मुस्लिमांना टार्गेट करण्यात आले. गोमांस खाण्याचे तथाकथित खोटे बनावट प्रकार रचण्यात आले आणि अगदी पार संबंधित मुस्लिमांच्या हत्यांपर्यंत मजल गाठण्यात आली. परंतु धार्मिक राजकारण करताना आणि हिंदुत्वाच्या एकाच आवरणात सर्वांना बंदिस्त करण्याचा त्यांचा प्रयत्न मात्र त्यांची पाच वर्षांची कारकिर्द संपतासंपता फसला गेला. कारण जेव्हा धर्माच्या नावाने राजकारण सुरु झाल्यानंतर त्यांची व्याप्ती मर्यादितच राहते.





गोमांस खाल्ल्याच्या संशयावरून गोरक्षकांकडून निरपराध व्यक्तींना मारहाण.

भारतात धार्मिक ध्रुवीकरण एका विशिष्ट पातळीपर्यंत यशस्वी होताना दिसते. परंतु जो समाज जातनिष्ठ असतो तेथे धार्मिक ध्रुवीकरणाच्या राजकारणावर मर्यादा पडतात. ही बाब धार्मिक राजकारण करणाऱ्या राजकीय नेत्यांच्या लक्षात येत नाही. हिंदू समाजात धर्माचे महत्व विशिष्ट मर्यादेपर्यंतच आहे. जेथे धर्माची मर्यादा संपते तेथूनच जातीचा प्रभाव सुरु होतो. हे वास्तव आहे आणि हे भलेभले राजकारणी विसरताना दिसतात. भाजपचे नेतेही हे वास्तव विसरलेले दिसतात. त्यामुळेच योगीमहाराजांनी हिंदुत्वाचे राजकारण केले परंतु जेव्हा ते राजकारण संपले त्यानंतर ते ज्या जातीचे प्रतिनिधित्व करतात त्या जातीने उत्तर प्रदेशाच्या राजकारणावर वर्चस्व गाजवायला सुरुवात केली. त्यांच्या ‘ठाकूरवादा’ने उत्तर प्रदेशातील इतर जातींवर वर्चस्व गाजविण्यास सुरुवात केली. पोलिस, प्रशासन आणि राज्यकारभाराच्या सर्व प्रमुख स्थानांवर आणि सत्तेची कळ ज्यांच्या हाती असते अशा सर्व पदांवर ठाकूरांनी ताबा मिळविल्याचे चित्र स्पष्ट होऊ लागले. उत्तर प्रदेशात सामाजिक अत्याचाराच्या काही कुप्रसिध्द घटना घडल्या त्यातील प्रमुख आरोपी हे प्रामुख्याने ठाकूर समाजाचे असल्याचे आणि त्यांना पोलिस व प्रशासनाकडून पध्दतशीरपणे पाठीशी घालण्याचे निर्लज्ज प्रकारही समाजासमोर येऊ लागले होते.

या त्यांच्या वाढत्या ठाकूरवादामुळे स्वाभाविकपणे ब्राह्मणांसह इतर जातीसमूहांची मंडळी अतिशय नाराज होऊ लागली. हिंदुत्वाच्या एकाच चौकटीत जातिनिष्ठ नाराजी सामावणे अशक्यप्राय ठरु लागले. परिणामी निवडणुकीच्या ऐन तोंडावर भाजपमधील ओबीसी नेते व त्यांचे अनुयायी यांनी भाजपकडे पाठ फिरविण्यास सुरुवात केली. स्वामीप्रसाद मौर्य, दारासिंग चौहान, राजभर यासारखे त्यांच्या समाजाचे नेते भाजपपासून फारकत घेताना आढळू लागले. ज्या ओबीसी वर्गांच्या आधारे आपल्या सवर्ण किंवा उच्चवर्णीय जनाधाराचा विस्तार केल्याचे भाजपनेते फुशारकीने सांगत

होते त्यांच्या पायाखालची वाळू आता या 'गळती'मुळे घसरु लागल्याचे चित्र निर्माण होत आहे. पश्चिम उत्तर प्रदेशातील जाट व गुज्जर समाजही भाजपकडून निसटत चालल्याचे चित्र समोर येऊ लागले. पश्चिम उत्तर प्रदेशात एकंदर १२९च्या आसपास विधानसभा मतदारसंघ आहेत. जाट-गुज्जर व मुस्लिम यांच्यात हा प्रदेश विभागलेला आहे. माजी पंतप्रधान चौधरी चरणसिंग यांचे प्रभावक्षेत्र असलेला हा भाग आहे. याच भागातून त्यांनी जाट, गुज्जर, आहिर, मुस्लिम यांना एकत्र करुन उत्तर प्रदेशातील यशस्वी असे सामाजिक न्यायाचे राजकारण केले होते. प्रामुख्याने शेतीशी निगडित हा भाग आहे. हा सधन भाग आहे. ग्रामीण सधनता येथे अस्तित्वात आहे. आपले राजकीय स्थान आणि मूल्य याची प्रखर जाणीव असलेला हा भाग आहे. त्यामुळेच या भागात बस्तान बसविणाऱ्यांना उत्तर प्रदेशाचे राजकारण करणे सोपे जाते. २०१३ मध्ये या भागातील सामाजिक सामंजस्य व सलोखा नष्ट करण्यात धर्मांध शक्तींना यश आले होते व यावेळी झालेल्या दंग्यांमध्ये सामाजिक न्यायाची जागा कट्टर हिंदुत्वाने घेतली होती. परिणामी २०१४ची लोकसभा निवडणूक व २०१७ची उत्तर प्रदेश विधानसभा निवडणूक या दोन्हीमध्ये हिंदुत्ववादी शक्तींना अमाप यश मिळाले. अर्थात परिस्थिती वळणे घेत राहते आणि विविध स्थित्यंतरेही चालू असतात. केंद्र सरकारने एकतर्फी स्वरुपात तीन कृषि कायदे केले आणि पाहतापाहता परिस्थिती बदलली. पंजाब आणि पश्चिम उत्तर प्रदेश व हरयानातील शेतकऱ्यांनी त्याविरोधात आंदोलनाचे अस्त्र उपसले. ते यशस्वी केले. कायदे कधीच मागे घेणार नाही अशी मुजोरी भाजपच्या अंगाशी आली आणि उत्तर प्रदेशात पराभवाच्या शक्यतेने धास्तावलेल्या भाजपला कायदे बिनशर्त मागे घ्यावे लागले. परंतु जे नुकसान व्हायचे होते ते झाले होते. पश्चिम उत्तर प्रदेशात घरोघर जाऊन प्रचार करण्यास भाजपने सुरुवात केली परंतु लोकांचा प्रखर विरोध सुरु झाला आहे. स्मृति इराणी यांच्यासारख्या महिला मंत्री असोत किंवा इतर भाजप आमदार व खासदार असोत, त्यांना या भागात प्रचार करणे अवघड होऊन बसले आहे. पाळीव माध्यमांनी ही दृष्ये व बातम्या दाखविण्याचे बंद केले असले तरी सोशल मीडियावर ही माहिती सर्वत्र प्रसारित होत आहे. यातील वास्तव एवढेच आहे की या भागात भाजपला प्रचार करणे दिवसेंदिवस अवघड होत चालले आहे.

या प्रकारांच्या अधिक तपशीलात जाण्यापेक्षा त्याचा अन्वयार्थ समजून घेणे अधिक महत्वाचे आहे. पहिला मुद्दा हा आहे की ही निवडणूक आता सामाजिक न्यायाच्या शक्तींकडे झुकलेली दिसते. यामुळे भाजपच्या गोटात निर्माण झालेली अस्वस्थता दिवसागणिक वाढत आहे. कोणत्याही परिस्थितीत उत्तर प्रदेशातील सत्ता हातून जाऊ द्यायची नाही या ईर्षेने भाजपचे नेतृत्व पेटलेले आहे. त्यामुळे विजयासाठी कोणत्याही थराला जाण्याची तयारी त्यांनी केलेली आहे. म्हणूनच त्यांनी २०२४ मध्ये होणाऱ्या सार्वत्रिक किंवा लोकसभा निवडणुकीला उत्तर



प्रदेशाची ही निवडणूक जोडण्याचा प्रकार केला आहे. नरेंद्र मोदींना २०२४मध्ये पुन्हा पंतप्रधानपदी पहायचे असेल तर या निवडणुकीत उत्तर प्रदेशात भाजपला विजयी करा असे आगतिक आवाहन भाजपकडून केले जात आहे. भाजपमध्ये ही तगमग असण्याची कारणे आहेत.

योगीमहाराजांच्या गेल्या पाच वर्षातील कारभारावर भाजपमधीलच असंख्य आमदार व खासदार तीव्र नाराज आहेत. त्यांच्याकडून अंतर्घात किंवा आतून घातपात केला जाण्याच्या शक्यतेचा भाजपमधील मंडळीही इन्कार करीत नाहीत. अडचण अशी आहे की हिंदुत्वासाठी योगीमहाराजांना जवळ करावे लागणारच आहे परंतु त्यासाठी सामाजिक न्यायाच्या म्हणजेच ओबीसी वर्गाला बरोबर घेण्याची कसरत

भाजपला जमेनाशी झाली आहे. परिणामी हे वर्ग भाजपकडून खिसकू लागले आहेत. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी पश्चिम उत्तर प्रदेशात जाट समुदायातील प्रतिष्ठितांशी संवाद साधण्याचा केलेला प्रयत्न जवळपास असफल ठरल्याच्या बातम्या सर्वत्र प्रसिध्द झाल्या आहेत. याठिकाणी ही गोष्ट विशेषत्वाने नमूद करावी लागेल की अद्याप पश्चिम उत्तर प्रदेशात म्हणजेच फेब्रुवारीच्या पहिल्या तारखेपर्यंत महामहिम पंतप्रधान, भाजपचे स्टार प्रचारक आणि विश्वप्रिय ब्रह्मांडनायकांनी एकही प्रचारसभा घेतलेली नाही. यावरुन त्यांच्या आत्मविश्वासाच्या पातळीचा अंदाज यावा.

निवडणुकीच्या मतदानाचे टप्पे आता सुरु होतील. म्हणजे त्यांनी समाजवादी पक्ष आणि त्या पक्षाचे तरुण नेते अखिलेश यांना नको इतके महत्व देऊन त्यांना प्रमुख प्रतिस्पर्धी बनविले आहे. याचाच परिणाम म्हणून भाजपची 'गळती' ही समाजवादी पक्षासाठी 'भरती' ठरली आणि पक्षाची प्रतिमाही भाजपच्या तोलामोलाची होऊ लागली. यातूनच सामाजिक न्यायाच्या शक्तींनाही मोठे प्रोत्साहन मिळाले आणि त्या समाजवादी पक्षाच्या छत्राखाली एकत्र होऊ लागल्या. याचा धोका भाजपच्या हिंदुत्वाला होणार हे निश्चित आहे. उत्तर प्रदेशातील विजय भाजपसाठी निर्णायक असेल कारण त्यानंतर होणाऱ्या राष्ट्रपतिपदाच्या निवडणुकीसाठीही तो तितकाच महत्वाचा आहे. या सर्व बाबी लक्षात घेता भाजपनेतृत्व त्यांच्या भात्यात असलेले सर्व बाण वापरणार हे स्पष्ट आहे. आता त्या बाणांमुळे किती नुकसान होणार आहे याचा अंदाजही घ्यावा लागेल. करोनामुळे प्रचारावर मर्यादा आणण्यामागील कारणही स्पष्ट आहे. इतरांना प्रचारासाठी फारशी संधी मिळू नये हाच त्यामागील हेतु आहे. कारण ब्रह्मांडनायकांनी विविध योजनांच्या उद्घाटनांच्या निमित्ताने प्रचार केलेला आहे. परंतु आता मतदारही एवढे दूधखुळे राहिलेले नाहीत. उद्घाटने आणि प्रत्यक्षातील योजना यातील फरक त्यांनाही कळू लागला आहे. उत्तर प्रदेश हे राज्य राजकीयदृष्ट्या अत्यंत जागरूक राज्य आहे. त्यामुळेच भाजपच्या बलाढ्य नेतृत्वालाही आव्हान देणारे प्रादेशिक नेते प्रकाशात येऊ लागले आहेत. उत्तर प्रदेशातील ब्राह्मण समाज हा भाजप आणि बिगर भाजपमध्ये विभागला जाणार असल्याचे स्पष्ट दिसून येत आहे. ती देखील भाजपच्या दृष्टीने चिंतेची बाब आहे. या सर्व मुद्यांच्या आधारे येणाऱ्या काळात उत्तर प्रदेशातील निवडणूक व प्रचार आणि त्यानुसार होणाऱ्या घडामोडींवर लक्ष ठेवून अंदाज घ्यावा लागेल. त्याआधारेच काही अनुमाने काढणे शक्य होईल.



त्यामुळे अंदाज बांधत बसण्याऐवजी प्रत्यक्ष निकालापर्यंत वाट पाहणेच श्रेयस्कर ठरेल. माहीतगारांच्या मते भाजप सहजासहजी उत्तर प्रदेश हातचा निसटू देणार नाही. प्रसंगी बहुजन समाज पक्ष आणि इतर पक्षांच्या आमदारांच्या फोडाफोडीपर्यंतही ते मजल गाठू शकतात. मात्र त्यासाठी बहुजन समाज पक्षाला पुरेशा जागा जिंकणे शक्य झाले पाहिजे. कदाचित ज्याठिकाणी विरोधी पक्षांचा उमेदवार बलशाली असेल तेथे भाजपची मते बहुजन समाज पक्षाकडे वळविण्याचे प्रकारही नाकारता येणार नाहीत. त्यामुळेच प्रत्यक्ष निकालापर्यंत वाट पाहणे आणि त्यानंतरच्या राजकीय घडाडमोडींवरच उत्तर प्रदेशात कुणाचे सरकार स्थापन होईल याचे चित्र स्पष्ट होईल. भाजपची या प्रकरणातील महत्वाची आणि रणनीतीच्या दृष्टीने झालेली चूक

■■

सातारा जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेसच्या नुतनीकरण केलेल्या कार्यालयाचा लोकार्पण सोहळा ३ जानेवारी २०२२ रोजी सातारा येथे पार पडला. या कार्यक्रमात मा. उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांनी केलेले भाषण...




# सर्वसामान्यांना बरोबर घेत आपल्या पक्षाची ताकद वाढवलीच पाहिजे

## उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे विचार

आज क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांची १९१वी जयंती आहे. आम्ही सगळेजण नायगावला जाऊन अभिवादन करून, तिथं एक छोटीशी मिटिंग घेऊन तिथले काही प्रश्न कसे निकाली काढता येतील याबद्दल चर्चा केली. आज बरेच कार्यक्रम होते. पण आपल्या सगळ्यांना माहिती आहे, की दोन दिवसांपूर्वी नियामवली नवी आली आणि पन्नासच्यापेक्षा जास्त लोकांच्या उपस्थितीत कार्यक्रम घ्यायचा नाही असं ठरवलं. राज्य सरकारमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पक्षामुळं आणि तुमच्या सगळ्यांच्या आशिर्वादामुळं माझ्यासारखा कार्यकर्ता उपमुख्यमंत्री म्हणून कामगिरी पार पाडत असताना आपणच कुठल्या नियमाचं उल्लंघन करणं माझ्या बुद्धीला पटत नाही. आणि त्याच्यामुळं नाईलाजास्तव, मला बाळासाहेबांनी पण खूप आग्रह केला, की दादा तुम्ही रहिमतपूरला बरेच दिवस आला नाही. मला कार्यक्रम देता आला असता, पण माझी ही अडचण आली. कृपया, आपण कार्यकर्त्यांनी समजून घ्या. कार्यकर्ते उत्साहाच्या पोटी वेळ मागतात. आम्हालादेखील पवार साहेबांनी शिकवलेलं आहे, की कार्यकर्ते हा पक्षाचा कणा असतो आणि हा कणा मजबूत असला पाहिजे. म्हणजे कार्यकर्त्यांना आपण या ना त्या प्रकारे मदत केली पाहिजे. ताकद दिली पाहिजे.

इथं आल्यानंतर काही कार्यकर्त्यांनी सांगितलं, की दादा, थोडा आम्हाला काहींचा त्रास होतो. महाविकास आघाडीचं सरकार सत्तेवर आहे. १७० आमदारांनी पाठिंबा दिलेला आहे. त्यांच्या बाबतीमध्ये साधारण त्यांच्या कलानं चालायचं आम्ही ठरवलेलं आहे. पण, त्याच्यातले काही लोकप्रतिनिधी सर्वांना बरोबर घेऊन जाण्याचा प्रयत्न करत नसतील, तर मग मात्र अडचणी येतात आणि त्याच्यातनं आमचेही कार्यकर्ते बरेचसे आमचेही सहकारी भरडले जातात. आम्हालाही वेदना होतात, की बाबा आपण सरकारमध्ये असताना आपल्या काही कार्यकर्त्यांना न्याय देऊ शकत नाही. पण हे सगळं जर दूर करायचं असेल, तर आपण आपल्या पक्षाची ताकद ही वाढवली पाहिजे.

यशवंतराव चव्हाण साहेबांचा जिल्हा म्हणून या जिल्ह्याची ओळख, त्याच्यानंतर राष्ट्रवादी काँग्रेसची स्थापना झाल्याच्यानंतर मनापासून राष्ट्रवादीला साथ देणारा, पाठिंबा देणारा, प्रेम देणारा जिल्हा कुठला, तर तो सातारा जिल्हा होता. अर्थात जेव्हा लक्ष्मणतात्या असतील, श्रीनिवास पाटील असतील, दोन्ही खासदार आपल्या विचाराचे असायचे. काही आमदार आपल्या विचारांचे असायचे. त्याच्यानंतरच्या काळामध्ये थोडंसं चित्र बदलत गेलेल्या घटना घडल्या. आत्ताच जिल्हा बँकेच्या निवडणुकीमध्येदेखील, निवडणूक म्हटलं, की काही गोष्ट घडतात. त्याच्यातनं नोंद घ्यायची असते. काहींनी काही दुरूस्त्या करायच्या असतात. काहींनी आत्मचिंतन करायचं असतं, आत्मपरिक्षण करायचं असतं,

फीत कापून अजित पवार नूतनीकरण केलेल्या राष्ट्रवादी भवनाचे उद्घाटन करताना, शेजारी बाळासाहेब पाटील, मकरंद पाटील, श्रीनिवास पाटील, सुनील माने, शशिकांत शिंदे व इतर मान्यवर.





क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त साताराच्या राष्ट्रवादी भवनात सावित्रीबाईंच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करताना अजित पवार, बाळासाहेब पाटील, मकरंद पाटील, श्रीनिवास पाटील, सुनील माने, शशिकांत शिंदे व इतर मान्यवर.

की आपण कुठं कमी पडलो का. आपल्याला त्याच्यामध्ये आणखीन काही बदल करण्याची गरज आहे का आणि असं करून पुढं जायचं असतं. कारण, आपले नेते पवार साहेबांनी सांगितलंय, की रोज नवीन शिकण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

मी जरी आता ३० वर्षे झाली, ९१ला खासदार झालो होतो पहिल्यांदा, ३१ वर्षे झाली. परंतु, आता २०२२ सालामध्ये, पण आम्ही पण काही ना काही नवीन गोष्टी शिकण्याचा प्रयत्न करत असतो. आज आल्यानंतर माघाशी सुनीलनी बोलता बोलता सांगितलं, की बाबा बऱ्याच काही गोष्टी देण्याचा प्रयत्न झाला. नेहमीच मला कुठल्याही जिल्ह्यामध्ये गेल्यानंतर मनापासून आपण सरकारमध्ये असताना काही दिलं गेलं पाहिजे. उद्याच्याला ज्यावेळेस प्रत्येकाला मिळणारी पदं, त्याची मुदत कधी ना कधी संपणार आहे आणि कधी ना कधी ती जाणार आहेत. परंतु, जोपर्यंत आहे, तोपर्यंत तरी त्या पदाला आपण बांधील राहू. त्याचा खऱ्या अर्थानी आपल्या लोकांना कसा फायदा करून देता येईल. महाराष्ट्राला कसा फायदा करून देता येईल. अशा प्रकारचा माझा कटाक्षानं प्रयत्न असतो. आणि म्हणूनच मग इथलं मेडिकल कॉलेज असेल, इथल्या सैनिक स्कूलला ३०० कोटीचा निधी देण्याचं काम असेल, इथं आता एसपी कार्यालय नवं उभं करण्याचं काम असेल, इथलं नवीन सर्किट हाऊस हे गतीनं पूर्ण करण्याचं काम असेल, यशवंतराव चव्हाण साहेबांच्या जन्मशताब्दीच्या निमित्तानं जिल्हा परिषदेमध्ये एक ऑडेटोरियम पूर्णत्वाला नेण्याचं काम असेल, त्याला अजून १८-१९ कोटी खर्च आहे असं मला आत्ताच

राजकुमार पाटील पुष्पगुच्छ देऊन अजित पवार यांचे स्वागत करताना. शेजारी आमदार मकरंद पाटील व अध्यक्ष सुनील माने.








सहकाऱ्यांनी सांगितलं. त्याच्यासंदर्भामध्ये आणखी इतर वेगवेगळ्या प्रकारे काही पंचायत समितीच्या इमारती, काही ठिकाणी अजून वेगवेगळ्या प्रकारच्या काही इमारती, मधल्या अतिवृष्टीच्या काळामध्ये रस्त्यांची झालेली दयनीय अवस्था, त्याच्याकरता लागणारा निधी, महाबळेश्वरच्यामध्ये देखील आम्ही ठरवलंय, तेही आम्हाला लवकर काम सुरू करायचंय. कारण तिथल्या मेन बाजारपेठेचा खूप चांगल्या प्रकारचा प्लॅन आपण तयार केलेला आहे. आदित्य ठाकरे आणि मकरंद आबांनी सगळ्यांनी बसून खूप चांगला तो प्लॅन केलेला आहे. त्याच्यात आमच्या खासदारसाहेबांनी पण सूचना केलेल्या आहेत.

अशा पद्धतीनं या सगळ्या गोष्टी पूर्णत्वाला नेण्याचा आपला सगळ्यांचा प्रयत्न आहे. आणि हा प्रयत्न करत असताना आपलं स्वत:चं पण प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणी एक चांगलं राष्ट्रवादी भवन असावं अशी इच्छा. त्याच्यामध्ये आपण २००३ला पवार साहेबांच्या आणि आर. आर. पाटलांच्या उपस्थितीमध्ये हा एक दिमाखदार कार्यक्रम केला. आणि त्याच्यानंतरच्या काळामध्ये त्याला जवळपास १९ वर्षे झाली. त्याच्यानंतर महाविकास आघाडीचं सरकार आलं त्यावेळेस इथली जबाबदारी पवार साहेबांनी बाळासाहेब पाटलांवर सोपविली. आणि आम्हाला सगळ्यांना पालकमंत्र्यांना सांगितलं, की आपापल्या जिल्ह्यातलं जी काही कार्यालये असतील ती व्यवस्थितपणे ठेवा. जे बाळासाहेबांनी मनावर घेतलं. ठरवलं. काही स्पर्धा परीक्षेच्या निमित्तानं आपल्या जिल्ह्यातली अनेक मुलं-मुली तिथं अभ्यासिकेमध्ये बसलेली आहेत. त्यांना उत्तम प्रकारची पुस्तकं उपलब्ध करुन देण्याचं काम झालंय. इथनं जवळपास १२०० विद्यार्थी-विद्यार्थीनी बाहेर पडली. त्याच्यातल्या जवळपास १०० विद्यार्थी-विद्यार्थीनींचं सिलेक्शन झालेलं आहे.

मी मघाशी पण पत्रकार मित्रांना सांगितलं, की राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष फक्त राजकारण करत नाही, तर राजकारण कमी करतं वीस टक्क्यांचं आणि ८० टक्के समाजकारण करतं हे या कृतीतनं आपल्याला सिद्ध करता येतं. हेही कार्यालय मधी खराब झालं होतं. भिंत पण पडली होती. ती आरसीसीमध्ये बांधली गेली. आमच्या बाळासाहेबांनी याच्यामध्ये पुढाकार घेतला. पण, बाळासाहेब माझं इतकं बारकाईनं लक्ष असतं. मी आतमध्ये आल्यापासून बघतोय, की कुठं काहीतरी मला चूक सापडतेय का पण, अजून चूकच सापडेना. म्हणजे इतकं चांगल्या पद्धतीनं तुम्ही ते केलेलं आहे. आणि मला विशेष





राजूआबा तुझं कौतुक करायचंय. अभिनंदन करायचंय. इथं आल्यावर मला स्वर्गीय सुधीर धुमाळांची फार प्रकर्षानं आठवण आली. कारण त्या काळामध्ये आम्ही ज्यावेळी कार्यालयामध्ये यायचो त्यावेळी सगळी जबाबदारी सुधीर धुमाळ हे खांद्यावर घ्यायचे आणि बाकीचे सगळे आपण साथ द्यायचो. तसं आता ती त्यांची आठवण आता आपले राजूआबा तिथं चालू ठेवतायंत. त्यांची कुठंही कमतरता भासणार नाही याबद्दलची खबरदारी राजूआबा तुम्ही घेताय. मी तुमचं मनापासून कौतुक करतो. बाळासाहेब तुमचं मनापासून कौतुक करतो, की तुम्ही सगळा पुढाकार घेऊन हा जो काय खर्च आला, त्या खर्चाची जबाबदारी स्वीकारली.

ज्या पक्षामुळं आपल्याला आमदारकी मिळाली, ज्या पक्षानं आपल्याला पालकमंत्रिपद दिलं, ज्या पक्षानी आपल्याला मोठं केलं, त्या पक्षाशी बांधिलकी लक्षामध्ये ठेऊन तुम्ही हे अतिशय उत्तम प्रकारचं नुतनीकरण करून दिलं. त्याच्यात आमचे अनिरूद्ध जोशी, वल्लभ जाधव, विकास





अध्यक्ष सुनील माने सन्मानचिन्ह देऊन अजित पवार यांचे स्वागत करताना, शेजारी बाळासाहेब पाटील,मकरंद पाटील,श्रीनिवास पाटील

बाबर यांनी पण त्यांची त्यांची जबाबदारी खूप चांगल्या प्रकारे पार पाडली. माझ्या आता सर्व तालुक्यातल्या कार्यकर्त्यांनी इथं बसल्यानंतर इथले अध्यक्ष असतील, युवकांचे, महिलाचे, युवतीचे, सेवादलाचे, सगळेच माझे सहकारी असतील, त्यांनी इथं बसून राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या कार्यालयामध्ये लोकांचे प्रश्न चांगल्या पद्धतीनं मार्गी लावण्याच्याकरता प्रयत्न केला पाहिजे. अतिशय चांगल्या पद्धतीनं नुतनीकरण केलेलं आहे. मी तर सांगितलंय, की इथले फोटो काढून घ्या. बारामतीलाही अशाच पद्धतीनं करूया. खरंच चांगलं आहे. माझा स्वभाव आहे, की जे चांगलं आहे ते चांगलंच म्हणायचं आणि जे बेकार असेल ते कुणीही केलं तरी बेकारच म्हणायचं. पण इथं सगळं चांगलंच झालेलं आहे.

अशाच पद्धतीनं प्रत्येक तालुक्याच्या ठिकाणी एवढी मोठी नाही, पण त्या तालुक्याला साजेशी कार्यालय आमच्या भगिनी वर्गाला पण आणि युवकांना, युवतींना किंवा आमच्या महत्त्वाच्या लोकांना पण बसायच्याकरता किंवा नागरिकांना




त्यांच्या अडीअडचणी दूर करण्याच्याकरता उपयोगी पडावी आणि त्याच्याही बाबतीमध्ये पुढाकार घ्यावा. खरं तर जिल्हा परिषदेचे अध्यक्ष, उपाध्यक्ष, विषय समितीचे सभापती तुम्ही एवढं महत्त्वाच्या ठिकाणी काम करता किंवा आमचे बँकेचे चेअरमन, त्यांनी पण आपल्या आपल्या तालुक्याच्या ठिकाणी कार्यालय बांधण्याच्याकरता, काही काही तर राज्याच्या स्तरावरच्या संस्थेचे अध्यक्ष होऊन गेले. त्यांनी पण आपल्या तालुक्याच्या ठिकाणी एखादं तरी कार्यालय, हे करता येतं. जर मनात आणलं तर येतं. कारण मला ज्यावेळी कळलं, की राधाकृष्ण विखे पाटील सगळं सोडून लग्नाला हजर राहिले. अजित पवार नाही, शरद पवार नाही, एवढं कसं काय. तर एवढे संबंध जिव्हाळ्याचे त्यावेळच्या मंत्र्यांचे, त्यावेळच्या अध्यक्षांचे होते हे त्याच्यातनं लक्षात येतं. चांगली गोष्ट आहे. माणसं जोडली पाहिजेत. पण ती आपल्याच पक्षामध्ये कशी राहतील हे पण बघितलं पाहिजे.

एकंदरीत नेहमीच आम्ही नव्या चेहऱ्याला संधी देण्याचा प्रयत्न करत असतो. सिल्व्हर ओकला त्याठिकाणी निर्णय झाला आणि त्याच्यातून नितीनला जिल्हा बँकेची जबाबदारी दिलेली आहे. निश्चितपणे नितीन पाटील ती जबाबदारी पार पाडतील. खूप मोठी स्पर्धा आहे. वेगवेगळ्या प्रकारच्या अडचणी आहेत. समस्या आहेत. त्याच्यातनं मार्ग काढावे लागतील.

कालच्या पुरवणी मागण्यांमध्येदेखील बरचसं आपल्या भागामध्ये म्हणजे महाराष्ट्राला देण्याचा प्रयत्न आम्ही केला. परंतु, राहिलेल्या गोष्टीदेखील येणाऱ्या अर्थसंकल्पामध्ये देण्याचा प्रयत्न आम्ही करू. रामराजे नाईक निंबाळकर, आमचे बाळासाहेब पाटील, आमचे श्रीनिवास पाटील, मकरंद आबा, दीपक चव्हाण, शशिकांत सगळेच जण मिळून सुजीत पाटणकर, प्रभाकर देशमुख सगळ्यांनी मिळून येणाऱ्या जिल्हा परिषद, पंचायत समित्यांमध्ये पण लक्ष दिलं गेलं पाहिजे. कारण, ज्यावेळेस राष्ट्रवादीची स्थापना झाली, त्यावेळेस इथली जिल्हा परिषद आपल्याकडं नव्हती. काँग्रेसचा जिल्हा परिषदेचा अध्यक्ष होता. पण, त्यावेळेस आपण सगळ्यांनी लक्ष घालून नंतर जिल्हा परिषद आपल्या ताब्यामध्ये, मला वाटतं २००२ला घेतली. आणि २००२पासून जिल्हा परिषद पूर्ण बहुमत असणारी जिल्हा परिषद म्हणून आपली इथली ओळख आहे. इथली आणि पुण्याची. या जिल्हा परिषदा सतत राष्ट्रवादीच्या ताब्यात एकतर्फी राहिलेल्या आहेत. २००२ल मला राजे गटाची मदत घ्यावी लागली होती. चार का पाच जागा त्यांच्या होत्या. आणि मग आपण जिल्हा परिषद ताब्यामध्ये घेतली होती. पण त्याच्यानंतर सगळ्यांनीच आपापल्या भागामध्ये चांगल्या जागा निवडून आणल्या.

काही गोष्टी काहींना न पटणाऱ्या जिल्हा बँकेच्या वेळी झाल्या असतील. माझं म्हणणं, की ते झालं गेलं गंगेला मिळालं

असं करून त्या गोष्टी पुन्हा पुन्हा उकरत न काढता आता आपण सगळे मिळून जिल्हा परिषद आणि तालुका पंचायतींच्या मागं लागूया. तसंच नगरपालिका, नगरपंचायती या पण आहेत. आपल्या आता जिल्ह्यामध्ये हा एकमेव जिल्हा असा आहे, की आपल्याकडं महानगरपालिका नाही. तेवढाच अपवाद आपल्याकडं राहिलाय. परंतु, शेवटी पॉप्युलेशन त्या पद्धतीनं वाढत नाही. त्यामुळं महानगरपालिका होऊ शकत नाही. मला वाटतं पाच लाख लोकसंख्या महानगरपालिकेला लागते. पुढं कधी तरी होईलच आपली सातारा महानगरपालिका. पण एकंदरीतच या सगळ्या गोष्टीचा आपण बारकाईनं विचार करू. ज्या ज्या गोष्टी सातारा शहराच्या भल्याच्या असतील त्या त्या करण्याचा प्रयत्न करू.

काही लोकांनी सांगितलं, की काही लोकांच्या हातात गुलाल होता. त्यांना वाटलं, की समोरचा निवडून आलाय म्हणूनच गुलाल आहे. काही म्हणत होते, की बाळासाहेबांनी कराडमध्ये यश मिळवलं होतं, त्याच्याबद्दल गुलाल होता. अशा कुठल्या कुठल्या गोष्टी. येणारा माणूस कुठली गोष्ट कशा पद्धतीनं सांगेल हे आपल्याला सांगता येत नाही. अशा सगळ्या बाबी आहेत. म्हणून माझी विनंती आहे, की आता पवार साहेबांनी पण मधी येऊन त्याच्याबद्दलची बऱ्याचशी या गोष्टीची चर्चा केलेली आहे. त्याच्यामुळं आता त्याच्या फार खोलात जाऊ नका.

आपल्या महाविकास आघाडीच्या सरकारला दोन वर्षे झालेली आहेत. पुढची पण तीन वर्षे आपल्याला चांगल्या पद्धतीनं पूर्णत्वास न्यायची आहेत. त्याच्यातनं अधिक महाविकास आघाडी मजबूत झाली पाहिजे. अशा पद्धतीचं काम आपण सगळेजण मिळून करूया. या जिल्ह्यातील उपेक्षित, दुर्लक्षित, वंचित घटकांच्या सर्वांगिण प्रगतीचा विचार करणारा आणि आपल्या माता-भगिनींना न्याय मिळवून देणारा कार्यकर्ता हा राष्ट्रवादीनं घडवला पाहिजे, अशी अपेक्षादेखील यानिमित्तानं मी व्यक्त करतो आणि एकंदरितच एक छोटेखानी कार्यक्रम आपल्याला घ्यावा लागला. परंतु, करोनाचं संकट दूर झाल्यानंतर पुन्हा आपण मोठे कार्यक्रम त्याठिकाणी घेऊ. मोठे कार्यक्रम काही आपल्याला अवघड नाहीयेत. गांधी मैदानावर पण आपण प्रचंड मोठ्या मोठ्या सभा घेतलेल्या आहेत. म्हणजे साहेब नसताना पण आपण मोठ्या सभा इथं गाजवलेल्या आहेत. हा आपल्या सगळ्यांचा इतिहास आहे. आपण सगळ्यांनी ठरवलं, तर आपण निश्चितपणे चांगल्या प्रकारचं यश मिळवू शकतो. हे पण आपण सगळ्यांनी ध्यानामध्ये घ्या. आणि कुठंही कार्यकर्त्यांनी गाफील राहू नका. एकमेकाच्याबद्दल गैरसमज होऊ देऊ नका. अशा प्रकारची विनंती करतो. पुन्हा आमच्या बाळासाहेबांचं आणि राजू आबाचं मी अभिनंदन करतो. ज्यांनी ज्यांनी याच्यामध्ये लक्ष घातलं. त्याचं सगळ्यांचं मी अभिनंदन करतो.




आपल्या जिल्ह्यामध्ये काही महत्त्वाच्या गोष्टी पूर्णत्वाला नेण्याच्याकरता काही तालुक्याच्या काही सूचना असतील, तर जरूर तुमच्या आमदारांना त्याठिकाणी त्या सूचना करा. जिथं आमदार नसतील एखाद्या तालुक्यामध्ये, तर त्या सूचना तुम्ही पालकमंत्र्यांना करा. पालकमंत्री माझ्यापर्यंत त्या पोहोचवतील आणि मग त्या आपण कशा कृतीत आणता येतील याबद्दलचं काम निश्चितपणे करू. ही ग्वाही मी देतो. हा शब्द मी आपल्या सर्वांना देतो आणि आपल्या सगळ्यांच्या साक्षीनं आज क्रांतिज्योती सावित्रीबाई फुलेंच्या जयंतीच्यादिवशी सातारा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या कार्यालयाचं नुतनीकरण जे झालेलं आहे, त्याचं उद्घाटन झालं असं जाहीर करतो आणि थांबतो. ■■


अभय टिळक

# अपारदर्शक आणि संदिग्ध

‘अपारदर्शक’ आणि ‘संदिग्ध’ या दोन विशेषणांनीच सन २०२२-२३ या वित्तीय वर्षासाठीच्या केंद्रीय अंदाजपत्रकाचे वर्णन करावे लागेल. ही भूमिका कदाचित कोणाला पूर्वग्रहदूषित भासेलही. परंतु तसे अजिबात नाही. केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांच्या अर्थसंकल्पीय भाषणाचा मसुदा नीट डोळ्याखालून घातला तर कोणाही किमान विचारी मनुष्याची प्रतिक्रिया अशीच येईल. ढोबळ मानाने बोलायचे तर, संसदेचे अथवा विधानसभेचे अर्थसंकल्पीय अधिवेशन हे एखाद्या विशाल अशा कॉर्पोरेट कंपनीच्या वार्षिक सर्वसाधारण सभेप्रमाणे गणता येईल. भागधारक हे अशा पब्लिक लिमिटेड कंपनीचे मालक. तर, कंपनीचे अध्यक्ष अथवा व्यवस्थापकीय संचालक हे कंपनीचे कारभारी. कंपनीचा कारभार नेमका कसा चाललेला आहे, आय-व्यय कसा आहे, कंपनीचा ताळेबंद कसा दिसतो, कशा प्रकारची आव्हाने कंपनीच्या पुढ्यात आहेत आणि एकंदरीनेच तुम्ही गुंतवलेल्या भांडवलाचे व्यवस्थापन आम्ही



अर्थसंकल्पाद्वारे उपलब्ध करून दिलेला निधी कार्यक्षमपणे वापरता न येणे ही प्रशासनिक अकार्यक्षमतेचे सूचन घडविणारी बाब म्हणावी लागेल. हे असे कशामुळे घडते आहे अथवा असावे? हे चित्र खरोखरच असे असेल तर, 'मिनिमम् गव्हमेन्ट, मॅक्झिमम् गव्हर्नन्स' या सध्याच्या सरकारच्या दाव्याला वल्गना नाही तर काय म्हणायचे ? केंद्रीय सत्तेची सारी सूत्रे पंतप्रधान कार्यालयामध्ये एकवटली जाण्याचा हा स्वाभाविक व अपरिहार्य परिणाम गणायचा का? की, प्रशासकीय मंजुऱ्यांच्या आड येणारी लालफीतशाही, मंत्रालयांच्या परस्पर कार्यादरम्यानच्या समन्वयाचा अभाव, केंद्र सरकार व राज्य सरकारे यांच्यादरम्यान प्रशासनिक, कायदेविषयक व कार्यप्रणालीसंदर्भात नांदणारा विसंवाद या सगळ्यांचा हा परिपाक गणायचा? या कशाहीबद्दल सरकार अथवा अर्थमंत्री 'ब्र'ही उच्चारत नाहीत याला अ-पारदर्शकता नाही तर अन्य काय नाव देणार ? हे सगळेच अनाकलनीय नाही काय?



संचालक मंडळी व्यवस्थित करतो आहोत याचा पुरावा समजली जाणारी कंपनीची वित्तीय कुंडली आम्ही या सर्वसाधारण सभेमध्ये तुमच्या पुढ्यात सादर करत आहोत, असे कंपनीचे संचालक मंडळ व कारभारी वार्षिक सर्वसाधारण सभेच्या माध्यमातून कंपनीच्या मालकांना सांगत असतात. तसा तपशील वार्षिक अहवालाच्या माध्यमातून प्रकाशित करण्यात येत असल्याने कंपनीचा वार्षिक अहवाल हा यथातथ्य, वास्तव, विश्वासार्ह आणि पर्यायाने प्रामाणिकपणे सादर केलेला असावा, अशी समभागधारकांची माफक व रास्त अपेक्षा असते. वार्षिक सर्वसाधारण सभेचा गाभा आणि अर्थ काही असेल तर तो हाच. याच धर्तीवर, लोकशाही प्रजासत्ताक व्यवस्थेमध्ये सार्वभौम असणाऱ्या जनताजनार्दनाला त्यानेच नियुक्त केलेल्या मंत्रिमंडळाच्या माध्यमातून 'देश' नावाच्या चिरकालिक अस्तित्वाचे वित्तीय व्यवस्थापन कशा प्रकारे करण्यात येते आहे याचा नकाशा व आराखडा सादर करण्याचे माध्यम म्हणजे संसदेचे अथवा विधानसभेचे अधिवेशन. तर, सादर करण्यात येणारा अर्थसंकल्प अथवा अंदाजपत्रक म्हणजे देशाच्या वित्तीय व्यवस्थापनाचा वार्षिक आलेख अथवा विधान. त्यामुळे, देशाच्या अंदाजपत्रकात प्रचलीत अर्थकारणाचे प्रांजळ चित्र अथवा प्रतिबिंब उमटलेले असावे, अशी कोणाचीही सहज अपेक्षा असते. परंतु, अर्थसंकल्पाकडून केली जाणारी अशी किमान अपेक्षाही पूर्ण न करण्याचा जणू चंगच सत्तारूढ पक्षाने बांधला असावा, अशी बळकट शंका माननीय केंद्रीय अर्थमंत्र्यांचे अर्थसंकल्पीय भाषण वाचल्यानंतर बळावते.

फारसे कोणतेही तपशीलच अर्थमंत्र्यांच्या भाषणामध्ये आपल्याला सापडत नाहीत. सरकार असे करू इच्छिते, तसे करण्याचा सरकारचा इरादा आहे, अमूक एक अभ्यास करण्यात येईल, तमूक एका बाबीसंदर्भात अहवाल तयार करण्यासाठी तज्ज्ञांची



समिती नेमण्यात येणार आहे... अशा प्रकारचे मोघम निर्देशच बहुसंख्य दिसतात. संकल्पित प्रकल्पांसाठी, मग, अंदाजपत्रकात किती वित्तीय तरतूद करण्यात आलेली आहे अथवा प्रकल्पांना एकंदर किती गुंतवणूक लागणार आहे यांबद्दल पुढे चकार शब्द दिसत नाही. नियोजित प्रकल्पांसाठी सरकार निधी उभा करेल, भांडवल उभारणीसाठी नाविन्यपूर्ण उपायांचा अवलंब करण्यात येईल... अशा संदिग्ध वाक्यांचा आढळ ठायी ठायी होत राहतो. एकंदर कलच तपशील उघड न करण्याकडे अधिक दिसतो. ही मानसिकता सूचन घडवते कोणत्याही प्रकारच्या चिकित्सेपासून लांब पळण्याची. मुदलात, अर्थसंकल्पीय भाषणामध्ये विपुल प्रमाणात आकडेवारी सादर केली, आधीच्या वर्षांच्या संदर्भातील सांख्यिकी पुरवली, योजनांचे विस्तृत विवरण मांडले तर समाजातील चिकित्सक मग चिरफाड करतात. माध्यमांमधून चर्चांची झड लागते, सरकारच्या अर्थविषयक संकल्पांचे साधकबाधक विश्लेषण होत राहते. या सगळ्यांच बौद्धिक झटापटीचा सत्ताधारी पक्षाला आणि मुख्य म्हणजे पक्षाच्या व सरकारच्या प्रधान धुरिणाला मनस्वी तिटकारा आणि विटाळ वाटतो. हा तर अतिशय मोठा विरोधाभासच मानायला हवा. ज्या नेतृत्वाची जडणघडण गंभीर बौद्धिकांच्या शिबिरांद्वारे घडत आलेली आहे अशा नेतृत्वालाच कोणत्याही प्रकारच्या बौद्धिक चिकित्सेचे वावडे वाटावे याचा विस्मय वाटल्याखेरीज राहात नाही. अलीकडील काळात उद्धार होत नसला तरी, भारतीय जनता पक्षाच्या संदर्भात एके काळी, पार्टी विथ अ डिफरन्स असे जे म्हटले जात असे त्याचाही अर्थ बहुधा हाच असावा!






विद्यमानातील आव्हाने दारूण व जटिल असली की त्यांच्या उहापोहापेक्षा दुरच्या भविष्यातील संकल्प हवेत मांडून लोकमानस भविष्याच्या चिंतनात गुंतवून अथवा भुलून ठेवायचे, ही कमालीची धूर्त खेळी बेरकी राजकारणाकडून हुकूमी



खेळली जाते. गेली दोन वर्षे अर्थकारणाचे हातपाय जखडून टाकणारी टाळेबंदी, त्यापायी उद्भवलेली दुर्धर बेरोजगारी, डोके वर काढत असलेली महागाई, कच्च्या खनिज तेलाच्या आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत तेलाचे चढे असलेले बाजारभाव, देशी अर्थव्यवस्थेतील महागाईस त्यांमुळे होऊ घातलेला संभाव्य इंधनपुरवठा, रोजगाराची हानी झाल्याने खुरटलेली क्रयशक्ती आणि परिणामी खंगलेला उपभोग व मागणी, निरुत्साही खासगी कॉर्पोरेट विश्व...अशी देशी अर्थव्यवस्थेच्या पुढ्यातील सध्याच्या संकटांची यादी चांगली लांबलचक आणि तितकीच भरगच्च असताना त्यांना थेट भिडण्याऐवजी अर्थसंकल्पीय भाषणामध्ये अर्थमंत्र्यांनी आख्यान लावले ते 'अमृतकाला'चे. ही तर निव्वळ धूळफेक होय. पाव शतकानंतर नेमके देशाचे अर्थचित्र कसे दिसणार आहे, हे छातीठोकपणे सांगण्याच्या परिस्थितीत आज कोणीही नाही. अगदी, २०२० सालातील मार्च महिना उजडेपर्यंत 'कोविड-१९' सारख्या महामारीपायी पुढील दोन वर्षे अर्थव्यवस्थेची कशी दाणादाण उडणार आहे, याची सुतरामदेखील कल्पना कोणाला नव्हती. कोणत्याही प्रकारच्या अतिदीर्घकालीन योजना-कल्पना-नियोजनातील वैय्यर्थच जणू एक प्रकारे या जागतिक संकटाने सगळ्यांच्या पुढ्यात दाणदिशी प्रगट केले. मात्र, कोणत्याही पूर्वानुभवावरून काहीही शिकायचेच नाही, असे खंबीर व्रतच जर सत्ताधीशांनी घेतलेले असेल, तर कोणी कोणाला आणि काय सांगावे हाही एक प्रश्नच.

केंद्रीय अर्थसंकल्पाचे एकंदर रंगरूप सरकारच्या नेमक्या त्याच हेक्याचे दर्शन घडवते. सरकारी खर्चाच्या भरभक्कम इंजेक्शनच्या माध्यमातून अर्थकारणाच्या पुनरुज्जीवनाला गती पुरवायची, ही सरकारची धोरणदिशा या अर्थसंकल्पाच्या केंद्रस्थानी दिसते. चालू वित्तीय वर्षासाठी सरकारच्या भांडवली खर्चाखातर केलेल्या अर्थसंकल्पीय तरतुदीमध्ये २०२१-२२ या वित्तीय वर्षाच्या तुलनेत तब्बल ३५.३ टक्क्यांची वाढ सुचवत अर्थमंत्र्यांनी त्या धोरणदिशेचे व्याकरणही मांडले. २०२१-२२ या वित्तीय वर्षामध्ये भांडवली खर्चाखातर ५ लाख ५४ हजार कोटी रुपयांची तरतूद करण्यात आलेली होती. तर, २०२२-२३ या वित्तीय वर्षासाठीच्या या अंदाजपत्रकात ७ लाख ५० हजार कोटी रुपयांची तरतूद करण्यात आलेली आहे. वरकरणी ही धोरणदिशा उत्तमच आहे. किंबहुना, खासगी कॉर्पोरेट विश्वाकडून नवीन गुंतवणूक भारतीय अर्थव्यवस्थेमध्ये घडून येण्याच्या शक्यता सद्यःस्थितीत रोडावलेल्या असल्याने अर्थव्यवस्थेत जान फूंकण्यासाठी सरकारलाच खर्चाकडे हात ओणवा करावा लागेल, यात वाद नाही. त्यांत एक अव्वल अशी अर्थशास्त्रीय तर्कनिष्ठताही आहे. भांडवली खर्चामध्ये वाढ घडून येण्याने रस्ते, महामार्ग, बंदरे, रेल्वे यांसारख्या पायाभूत



सेवासुविधांच्या निर्मितीद्वारे अर्थव्यवस्थेत उत्पादक स्वरूपाची मालमत्ता निर्माण होण्याबरोबरच अर्थव्यवस्थेच्या एकंदरीत उत्पादकतेमध्ये भर पडते यांबाबतही दुमत नाही. शिवाय, अशा महाकाय प्रकल्पांच्या अंमलबजावणीद्वारे मोठ्या प्रमाणावर सर्वस्तरीय रोजगारनिर्मितीला चालना मिळून क्रयशक्तीची झिरपण घडून येण्याद्वारे देशांतर्गत मागणीलाही ऊब मिळते. परिणामी, खासगी कॉर्पोरेट विश्वालाही गुंतवणुकीस चालना देण्याबाबत हुरूप येतो. त्यांमुळे, भांडवली खर्चात सणसणीत वाढ घडवून आणण्याच्या सरकारच्या या मानसिकतेचे सर्वत्र कौतुक झाले व त्यांत काही चुकीचेही नाही. परंतु, यांतील




गोम आहे ती निराळीच.

सरकारच्या ठायी अनुभवास येणाऱ्या अपारदर्शकतेचे दर्शन घडते ते नेमके इथेच. सन २०२१-२२ या वित्तीय वर्षासाठीच्या अंदाजपत्रकात सरकारच्या एकंदर खर्चाबाबत ३४ लाख ८३ हजार कोटींचा अंदाज वर्तविण्यात आलेला होता. आता, सरकारी खर्चाबाबतच्या सुधारित अंदाजानुसार ही रक्कम ३७ लाख ७० हजार कोटींवर जाईल, असे सांगत अर्थमंत्र्यांनी वित्तीय तुटीमधील वाढीचे सूचन घडवले. परंतु, सन २०२१-२२ या वित्तीय वर्षामध्ये भांडवली खर्चाखातर जी रक्कम अंदाजपत्रकात नमूद केलेली होती तिचा सुधारित अंदाज काही सीतारामन यांनी त्यांच्या अर्थसंकल्पीय भाषणात मांडला नाही. गंमत आहे ती कदाचित इथेच. अर्थसंकल्प सादर होण्यापूर्वी आपल्या देशातील एका अग्रगण्य आर्थिक दैनिकामध्ये एक मोठे रोचक वृत्त प्रकाशित झाले होते. २०२१-२२ या वित्तीय वर्षासाठीचा अर्थसंकल्प गेल्या कॅलेंडर वर्षात मांडत असताना केंद्रीय अर्थमंत्र्यांनी केंद्र सरकारच्या विविध विभागांसाठी जी आर्थिक तरतूद मंजूर केलेली होती तिच्यापैकी जेमतेम ४०-४२ टक्के रक्कमच काय ती १ एप्रिल २०२१ ते ३१ डिसेंबर २०२१ या नऊ महिन्यांदरम्यान प्रत्यक्षात खर्च झालेली असल्याचे वास्तव त्या वृत्तामध्ये मांडण्यात आलेले होते. म्हणजे, केंद्र सरकारच्या विविध खात्यांनी त्यांना मंजूर झालेल्या अर्थसंकल्पीय निधीपैकी जवळपास ६० टक्के निधी २०२१-२२ या वित्तीय वर्षाच्या पहिल्या नऊ महिन्यांमध्ये वापरलेलाच नव्हता अथवा त्यांना तो वापरता आलेला नव्हता. हा भूतकाळ इतका ताजा असताना आता, २०२२-२३ या वर्षात भांडवली खर्चाखातर ३५.३ टक्के अधिक निधीची तरतूद करून सरकार कोणाला व कशासाठी फसवते आहे ?

हा प्रश्न खरोखरच चिंतनीय आणि चिंताजनक होय. अर्थसंकल्पाद्वारे उपलब्ध करून दिलेला निधी कार्यक्षमपणे वापरता न येणे ही प्रशासनिक अकार्यक्षमतेचे सूचन घडविणारी बाब म्हणावी लागेल. हे असे कशामुळे घडते आहे अथवा असावे ? हे चित्र खरोखरच असे असेल तर, 'मिनिमम् गव्हर्मेन्ट, मॅक्झिमम् गव्हर्नन्स' या सध्याच्या सरकारच्या दाव्याला वल्गना नाही तर काय म्हणायचे ? केंद्रीय सत्तेची सारी सूत्रे पंतप्रधान कार्यालयामध्ये एकवटली जाण्याचा हा स्वाभाविक व अपरिहार्य परिणाम गणायचा का ? की, प्रशासकीय मंजुऱ्यांच्या आड येणारी लालफीतशाही, मंत्रालयांच्या परस्पर कार्यादरम्यानच्या समन्वयाचा अभाव, केंद्र सरकार व राज्य सरकारे यांच्यादरम्यान प्रशासनिक, कायदेविषयक व कार्यप्रणालीसंदर्भात नांदणारा विसंवाद या सगळ्यांचा हा परिपाक गणायचा ? या कशाहीबद्दल सरकार अथवा अर्थमंत्री 'ब्रही उच्चारत नाहीत याला अ-पारदर्शकता नाही तर अन्य काय नाव देणार ? हे सगळेच अनाकलनीय नाही काय ?

केंद्रीय अर्थमंत्र्यांनी मांडलेल्या सन २०२२-२३

या वित्तीय वर्षासाठीच्या अंदाजपत्रकाकडे या सगळ्या पार्श्वभूमीवर बघितले की भीती वाटते. त्याला कारण आहे. ते असे की, गेल्या दोन वर्षांत पूर्णपणे विस्कटून गेलेली भारतीय अर्थव्यवस्थेची घडी पूर्ववत बसविण्यासाठी या अर्थसंकल्पाद्वारे सरकारी खर्चावर असलेली धोरणात्मक मदार अर्थमंत्र्यांनी स्पष्ट केलेली आहे. आता, भांडवली खर्चाखातर प्रचंड रक्कमेची तरतूद त्या दृष्टीने करूनदेखीलही प्रत्यक्षात विविध मंत्रालयांनी पुरेशी कार्यक्षमता व उपक्रमशीलता दाखवलीच नाही तर उपलब्ध करून देण्यात आलेला पैसा पुरेपूर वापरला न जाण्याचाच धोका अधिक. तसे खरोखरच दुर्दैवाने झाले तर, अर्थव्यवस्थेत रोजगारनिर्मिती, क्रयशक्तीची झिरपण आणि मागणीला उभारी यांपैकी काहीच शक्यतेच्या टप्प्यात येणार नाही. परिणामी, अर्थव्यवस्थेचे पुनरुज्जीवन अधिकच दुर्धर होऊन बसेल. त्यांमुळे, भांडवली खर्चाच्या वाढीव तरतुदीस प्रशासनिक कार्यक्षमतेची जोड दक्षपणे पुरविणे अनिवार्य ठरते. इथे, खरा प्रश्न आहे तो सरकारमधील उच्चपदस्थ नेतृत्वाच्या मानसिकतेचा. कारण, सत्तेच्या अतिरिक्त केंद्रीकरणापायी निर्णयप्रक्रियेची गती मंदावते. अर्थात, इथे आणखीही एका बाबीचा विचार महत्वाचा ठरतो. तो असा की, दोन वर्षे जायबंदी झालेल्या भारतीय अर्थव्यवस्थेमध्ये एकदम एका वर्षात एवढी थोरली भांडवली गुंतवणूक रिचविण्याची क्षमता खरोखर निर्माण झालेली आहे का, याचा काही अदमास घेणे अथवा चाचपणी करणे सरकार करते आहे अथवा नाही हा. सरकारने तसे काही केले असावे, असे निदान गृहीत तरी धरावयास हवे. कारण, भांडवली खर्चाच्या या मुद्याला आणखी एक पैलू आहे. तो असा की, देशभरातील राज्य सरकारे त्यांच्या त्यांच्या कार्यक्षेत्रामध्ये जो भांडवली खर्च करतात त्यांपोटी केंद्र सरकार राज्यांना काही अनुदाने देत असते. अशा अनुदानांची रक्कमही भांडवली खर्चाच्या प्रस्तावित साडेसात लाख कोटी रुपयांमध्ये मिळवली तर, २०२२-२३ या वित्तीय वर्षामध्ये भांडवली खर्चापायी १० लाख ६८ हजार कोटी रुपये केंद्र सरकार व राज्य सरकारे एकत्रितरीत्या खर्च करणे अपेक्षित आहे, असा अर्थ निष्पन्न होतो. मुळातच, दोन वर्षे हातपाय बांधून पडलेल्या भारतीय अर्थव्यवस्थेमध्ये एकदम इतका निधी पचवण्याची ताकद आज निर्माण झालेली आहे किंवा नाही, अशी आशंका नक्कीच वाटते.

हे केवळ मग इथेच थांबत नाही. समजा, केंद्र सरकारने तसेच राज्य सरकारने तशी उपक्रमशीलता प्रगट केलीच तर



आणखीही एक धोका संभवतोच. तो म्हणजे संभाव्य भाववाढीचा. मोठ्या प्रमाणावर ज्या वेळी अर्थव्यवस्थेत गुंतवणूक होते त्यांतून रोजगारनिर्मितीद्वारे क्रयशक्तीची झिरपणही गतिमान बनते. स्वाभाविकपणेच, मग, बाजारपेठीय मागणी मान धरायला लागते. ज्या गतीने व ज्या पद्धतीने मागणीमध्ये वाढ घडते तितक्या लवचीकपणे पुरवठ्याची






चक्रे फिरतील याची शाश्वती व्यवहारात नसतेच. परिणामी, मागणी आणि पुरवठ्याचे समीकरण व्यस्त बनून बाजारपेठेमध्ये महागाईचा माहौल नांदायला सुरुवात होते. आजच, भारतीय अर्थव्यवस्थेमध्ये महागाईचा तेवर जाणवायला लागला असल्याबद्दल रिझर्व्ह बँक सावधगिरीचा सूर लावतेच आहे. भरीस भर म्हणून की काय, कच्च्या खनिज तेलाच्या आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत तेलाचे दर बॅरलला ९० डॉलरपर्यंत चढलेले आहेत. तेल तसेच तेलजन्य जिनसांना भारतीय बाजारपेठेत जेवढी वार्षिक मागणी आहे तिच्यापैकी ८० टक्के मागणी आयात तेलाद्वारे भागवली जाते. त्यामुळे, कच्च्या खनिज तेलाचे तापणारे बाजारभाव हा देशी महागाईला इंधनपुरवठा करणारा एक महत्त्वाचा घटक शाबीत होतो. तिसरीकडे, २०२२-२३ या वित्तीय वर्षामध्ये भारतीय अर्थव्यवस्था वास्तवात सरासरी नऊ टक्के दराने आगेकूच करील, असा जो आशावाद अर्थसंकल्पपूर्व आर्थिक पाहणी अहवालामध्ये व्यक्त करण्यात आलेला आहे त्यामागे, तेलाचे बाजारभाव प्रति बॅरलमागे ९० डॉलरपेक्षा कमी राहतील असे एक गृहीतक मांडण्यात आलेले आहे. अशा सगळ्या संभाव्य चित्राच्या पार्श्वपटावर, महागाईवर नियंत्रण राखण्याचे एक कडवे आव्हान येत्या काळात उभे ठाकू शकते याचे भान जागते राखणे अगत्याचे ठरते.

संभाव्य महागाईला हातभार लावणारा दुसरा महत्वाचा घटक म्हणजे वित्तीय तूट. २०२१-२२ या वित्तीय वर्षामध्ये वित्तीय तुटीचे देशाच्या ठोकळ उत्पादिताशी असलेले प्रमाण ६.८ टक्के इतके राहील, असा अंदाज वर्तविण्यात आलेला होता. आता, सुधारित अंदाजानुसार हे प्रमाण ६.९ टक्के इतके राहील, असे अर्थमंत्र्यांनी त्यांच्या भाषणादरम्यान कथन केले. त्या मानाने सुधारित अंदाजानुसार वित्तीय तूट फारशी वाढलेली नाही यांबद्दल त्यांनी सरकारची व पर्यायाने स्वतःची पाठही थोपटून घेतली. इथेही पुन्हा एक फसवा चकवा आहेच. सन २०२१-२२ या वित्तीय वर्षादरम्यान केंद्र सरकारच्या विविध खात्यांनी त्यांना मंजूर रकमांच्या केवळ ४०-४२ टक्के खर्च करूनदेखील वित्तीय तूट ०.१० टक्क्यांनी वाढलेली आहे. मग, खरोखरच सगळ्या खात्यांनी अंग झटकून झडझडून कामे करून खर्चाची प्रत्यक्षातील मात्रा वाढवली असती तर २०२१-२२ या वित्तीय वर्षात वित्तीय तुटीचे प्रमाण किती वाढले असते, याची केवळ कल्पनाच केलेली बरी !

अशा खूप गंमती अर्थमंत्र्यांच्या अर्थसंकल्पीय भाषणात आढळतात. सरकारच्या ठायी असणारा प्रामाणिक पारदर्शकतेचा अभाव काय तो या सगळ्यांतून ठसठशीतपणे अधोरेखित होत राहतो, एवढे मात्र खरे.

■■

## महाराष्ट्रावरील अन्याय दूर करण्यासाठी सर्वपक्षीय खासदारांनी प्रयत्न करावेत



# महाराष्ट्रावर अन्यायाची केंद्र सरकारची परंपरा यंदाच्या अर्थसंकल्पातही कायम

### उपमुख्यमंत्री अजित पवार यांची केंद्रीय अर्थसंकल्पावर टीका

मुंबई, दि. १ फेब्रुवारी – देशाला कररुपाने सर्वाधिक महसूल देणाऱ्या महाराष्ट्रावर अन्याय करण्याची परंपरा केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी या अर्थसंकल्पातही कायम राखली आहे. केंद्रसरकारने चालू आर्थिक वर्षात एकूण २ लाख २० हजार कोटींचा एकूण केंद्रीय जीएसटी वसूल केला. त्यातले तब्बल ४८ हजार कोटी महाराष्ट्रातून वसूल करण्यात आले. या केंद्रीय जीएसटीच्या बदल्यात महाराष्ट्राला अवघे साडेपाच हजार कोटी रुपये परत मिळाले. निधीवाटपातल्या या अन्यायाचे प्रतिबिंब यंदाच्या अर्थसंकल्पातही स्पष्टपणे दिसत असून अर्थसंकल्पातून महाराष्ट्राच्या वाट्याला काय आले ते शोधूनही सापडत नाही, अशी जोरदार टीका उपमुख्यमंत्री आणि राज्याचे अर्थमंत्री अजित पवार यांनी केली.

दरम्यान केंद्रीय अर्थसंकल्पात महाराष्ट्रावर झालेला अन्याय दूर करण्यासाठी सर्वपक्षीय खासदारांनी केंद्रीय अर्थमंत्र्यांना भेटून प्रयत्न करावेत, असे आवाहनही उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केले.

केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी संसदेत सादर केलेल्या अर्थसंकल्पावर प्रतिक्रिया देताना उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी, यापूर्वीच्या अर्थसंकल्पाप्रमाणे यंदाचा

अर्थसंकल्पही 'अर्थहीन' आहे. दरवर्षी २ कोटी नोकऱ्या देण्याचे आश्वासन पूर्णपणे फसल्यानंतर यंदा ६० लाख नोकऱ्यांचे नवे गाजर दाखवण्यात आले आहे. 'एलआयसी'च्या आयपीओची घोषणा ही नफ्यातील शासकीय कंपनीच्या खासगीकरणाच्या दिशेने टाकलेले पाऊल आहे. हा अर्थसंकल्प पुढच्या २५ वर्षांच्या विकासाची ब्ल्यूप्रिन्ट असल्याचा दावा निरर्थक असून निवडणूका असलेल्या पाच राज्यामधल्या जनतेची मनधरणी करण्याचा अयशस्वी प्रयत्न अर्थसंकल्पात करण्यात आला आहे असेही अजित पवार म्हणाले.

संरक्षणक्षेत्राला आत्मनिर्भर करण्याची घोषणा करणाऱ्या केंद्रीय अर्थमंत्र्यांनी गेल्या आठ वर्षात या दिशेने केंद्रसरकारने काय केले याचे उत्तर आता तरी द्यावे. 'मेक इन् इंडिया', 'आत्मनिर्भर भारत' या घोषणांप्रमाणे यंदाच्या अर्थसंकल्पातील घोषणाही हवेत विरुन जातील, असं दिसते असा टोलाही अजित पवार यांनी लगावला. महागाईवाढ कमी करण्यासाठी आणि रोजगारवाढीसाठी या अर्थसंकल्पात कोणतीही ठोस घोषणा नाही. कॉर्पोरेट टॅक्स १८ टक्क्यांवरुन १५ टक्के केला. मात्र, प्राप्तिकराची मर्यादा वाढवणे आणि कराचा दर कमी करण्यासंदर्भात कोणतीही घोषणा नसल्याने मध्यमवर्गीय नोकरदारांची, सामान्य करदात्यांची पुन्हा एकदा निराशा झाली आहे. अर्थसंकल्पात मोबाईल आणि इलेक्ट्रॉनिक्स वस्तू स्वस्त करण्याची घोषणा झाली. हिऱ्यांचे दागिने स्वस्त झाले. पण, पेट्रोल, डिझेल, स्वयंपाकाचा गॅस या जीवनावश्यक वस्तूंवरील कर कमी करायला केंद्रसरकार सोयीस्कर विसरले. यातून त्यांचा प्राधान्यक्रम दिसतो. गरीबांना दिल्या जाणाऱ्या अन्नधान्यावरील तसेच शेतकऱ्यांच्या खतावरील अनुदानाची रक्कम कमी करण्याचा निर्णय अन्यायकारक आहे. गरीब, वंचित घटकांना, शेतकऱ्यांना याचा फटका बसणार आहे असेही अजित पवार म्हणाले.




सध्याचे केंद्रातले सरकार हे प्रसिद्धीवर चालते, हे पुन्हा एकदा स्पष्ट झाले आहे. केंद्रसरकारच्या एका कार्यक्रमासाठी ६०-६५ कॅमेऱ्यांचा सेटअप लावला जात असल्याचे आपण बघितले आहे. या पार्श्वभूमीवर कॅमेऱ्याच्या लेन्सवरील कर कमी करण्याचा केंद्रीय अर्थमंत्र्यांचा निर्णय संयुक्तिक वाटतो, असा टोलाही उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी लगावला.

शेतकऱ्यांकडून थेट धान्यखरेदीसाठी नवीन केंद्र उभारण्याची घोषणा करताना सध्याच्या केंद्राच्या बळकटीकरणासाठी काय करणार, याबाबतही केंद्रीय अर्थमंत्र्यांनी सांगितलं पाहिजे, असंही उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले. केंद्रीय अर्थसंकल्पावर अधिक प्रतिक्रिया देताना उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी यंदाच्या अर्थसंकल्पातील घोषणा चालू वर्षातच नाही तर पुढच्या तीन वर्षात तरी मार्गी लागतील का, याबाबत शंका व्यक्त केली आहे. अर्थसंकल्पात सर्वसामान्यांच्या प्रश्नांकडे आणि सर्वसाधारण बाबींकडे दुर्लक्ष करण्यात आले आहे. आवास योजनेसाठी ४८ हजार कोटींची तरतूद अपूरी आहे. अहमदाबादला 'गिफ्ट सिटी'ची गिफ्ट किती वर्ष सुरु राहणार आणि केव्हा संपणार हे समजून येत नाही. अर्थसंकल्पात किमान आधारभूत किंमतीप्रमाणे शेतकऱ्यांना पैसे त्यांच्या खात्यात जमा केले जातील या बाबींव्यतिरिक्त शेतकऱ्यांसाठी कोणत्याही सवलती देण्यात आल्या नाहीत. वंचित घटकांसाठी अर्थसंकल्पात तरतूद नाही. व्हर्च्युअल डिजिटल अॅसेट म्हणजे क्रिप्टो करन्सीवर ३० टक्के कर आकारण्यात आल्याने देशाची आर्थिक राजधानी मुंबईतील आर्थिक उद्योगाला फटका बसणार आहे असेही अजित पवार म्हणाले. राज्यांना भांडवली खर्चासाठी देण्यात येणाऱ्या व्याजमुक्त ५० वर्षाच्या कर्जामध्ये केंद्रसरकारने २०२१ - २२ या आर्थिक वर्षासाठी अर्थसंकल्पीय तरतूद १० हजार कोटींवरुन १५ हजार कोटी करण्याच्या, तसेच पुढील वर्षासाठी ही तरतूद १ लाख कोटी करण्याच्या केंद्राच्या निर्णयाचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी स्वागत केले. हे कर्जवाटप करताना अनावश्यक जाचक अटी लावू नये, अन्यथा राज्यांना याचा फायदा मिळणार नाही, असे निरीक्षणही उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी नोंदवले आहे. अर्थसंकल्प सादर करताना केंद्रीय अर्थमंत्र्यांनी जानेवारी २०२२ मध्ये जीएसटीची वसूली सर्वोच्च झाली असल्याबद्दल आनंद व्यक्त केला. याचा फायदा राज्यांना देण्याबाबत अर्थसंकल्पात कोणतीही घोषणा नाही. वस्तू व सेवाकराची वसूली वाढल्यामुळे राज्यांचा केंद्रीय करातील हिस्सा वाढविणे आवश्यक आहे. वस्तू व सेवाकराच्या वसुलीतील नुकसान भरपाई राज्यांना मिळण्यास, पुढील ५ वर्षे मुदतवाढ देण्याची विनंती राज्यांनी केंद्रशासनाकडे केली आहे. त्याबाबत अर्थसंकल्पात कोणतीही घोषणा करण्यात आलेली नाही, यानेही राज्यांची निराशा झालेली आहे. राज्याची वस्तू व सेवाकर नुकसान भरपाईची थकबाकी राज्याला त्वरीत मिळावी, अशी अपेक्षा उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी व्यक्त केली.

■■

# कष्ट व अभ्यासाची तयारी असल्यास यश मिळते

## शरद पवार



**देशाचे नेते आदरणीय खासदार शरदचंद्र पवार साहेब यांच्या देदिप्यमान कारकिर्दीला सलाम करण्यासाठी यशवंतराव चव्हाण सेंटर, मुंबईच्यावतीने गुणवंतांना शरद पवार इन्स्पायर फेलोशिप (ॲग्रीकल्चर) प्रदान करण्यात आली. यानिमित्ताने बारामती येथे ॲग्रीकल्चरल डेव्हलपमेंट ट्रस्ट व कृषी विज्ञान केंद्र यांच्या सहकार्याने आयोजित २१ दिवसांच्या बूटकॅम्पचा समारोप १९ जानेवारी २०२२ रोजी झाला. या कार्यक्रमात शरद पवार यांनी केलेले हे भाषण.**



सन्माननीय व्यासपीठ आणि गेले २१ दिवस ज्या तरूण मित्रांनी वास्तव्य केलं आणि विविध विषयांवर जाणकारांचे विचार ऐकून घेतले आणि पुढं काहीतरी करण्याच्यासंबंधीचा मनामध्ये संकल्प केला असा एक आगळावेगळा कार्यक्रम हा याठिकाणी आपण आयोजित केला होता. फेलोशिप आणि त्या फेलोशिपच्यासाठी तुम्हा सगळ्यांची निवड झाली. निवडीच्यानंतर जो कार्यक्रम आखला त्याच्यामध्ये अनेक जाणकारांना याठिकाणी निमंत्रित केलं आणि त्यांचे विचार, त्यांचे अनुभव तुमच्यापुढं ठेवण्याच्याबद्दलची काळजी घेतली. त्याच्यातून एक आनंदाची गोष्ट आहे, की शेवटी तुम्ही सगळेजण त्याच्याशी सहमत झालात. त्या कार्यक्रमामधून तुमचा आत्मविश्वास वाढला आणि ज्या विषयाच्यामध्ये आपण लक्ष केंद्रीत करायचं ठरवलं, त्या विषयाच्यामध्ये परत गेल्याच्यानंतर पूर्ण शक्तीनं, ताकदीनं, सहकार्याने इतरांच्या पुढं जायचं आणि त्या क्षेत्रामध्ये यश संपादन करायचं या निष्कर्षाशी तुम्ही आलात. म्हणून खरं म्हटलं तर तुम्हा सगळ्यांचं अभिनंदन केलं पाहिजे.

समस्या असतात. आत्ताच सांगितलं राज्याच्या उपमुख्यमंत्र्यांनी, संकटं किती येतात आणि त्या संकटांना तोंड द्यायचं म्हटल्याच्यानंतर सगळ्यात जास्त यातना किंवा त्रास हा विशेषत: शेती व्यवसायाला होतो आणि त्यामुळं साहजिकच आहे, त्या सगळ्याच्यासंबंधीची मानसिक तयारी आपली सगळ्यांची असली पाहिजे. हा देश शेतीप्रधान म्हणून ओळखला जातो. संबंध देशामध्ये जेव्हा स्वातंत्र्य मिळालं, तेव्हा ८० टक्के लोक शेतीमध्ये होते. २० टक्के लोक अन्य क्षेत्रात होते. आज जर बघितलं, तर साधारणत: ५८ ते ६१ टक्के लोक या देशाच्या लोकसंख्येतील आज शेतीमध्ये आहेत. पण तुम्ही लक्षामध्ये घ्या, की ४७ साली ज्यावेळी स्वातंत्र्य मिळालं तेव्हा देशाची लोकसंख्या ३५ कोटी होती आणि ३५ कोटीच्या ७० टक्के लोक त्यावेळी शेतीत होते. आणि आज देशाची लोकसंख्या ११५ कोटीच्यापुढं गेली आणि त्याच्या ५८ टक्के किंवा ६० टक्के लोक शेतीमध्ये आहेत. याचा अर्थ शेतीवरचा बोजा हा खूप वाढलेला आहे. लोकसंख्या शेतीवर अवलंबून राहणारी टक्केवारी ही वाढलेली आहे. पण, शेती वाढली का? जमीन वाढली का? उलटं जमीन कमी झाली.

मला आठवतंय, की मुंबई शहरामध्ये वाढ करायचा निर्णय घेतला त्यावेळच्या राज्यकर्त्यांनी आणि नवी मुंबई करायची ठरली. त्यावेळेला नुकताच मी सरकारमध्ये होतो. नवी मुंबई करायची ठरल्याच्यानंतर नव्या मुंबईच्यासाठी अक्षरश: काही हजार हेक्टरच्यापेक्षा जास्त जमीन ॲक्वायर करायला लागली आणि ती सगळी शेतीची जमीन होती. एका शहराच्या वाढीसाठी शेतीची जमीन कमी झाली. या देशामध्ये कारखानदारी वाढवतोय आपण, जमीन ॲक्वायर करतोय ती शेतीची जमीन असते. हे रस्ते मोठे करायचे यासाठी आपण अनेक निर्णय घेतो. यासाठी शेतीची जमीन ॲक्वायर करतो. पाण्याची सोय करायची म्हणून धरणे बांधावी लागतात. यासाठी शेतीची जमीन ॲक्वायर करतो. याचा अर्थ शेतीची जमीन कमी होतेय आणि आता शेतीवरचा बोजा वाढत आहे. आणि म्हणून हा शेतीचा बोजा कमी करण्यासाठी जीवनाच्या वेगवेगळ्या क्षेत्रामध्ये जिथं आपण काहीतरी करू शकू अशी







जी क्षेत्रं असतात, त्यासंबंधीचा आस्थेपूर्वक अभ्यास करून जाण्याची आणि कष्ट करण्याची तयारी केली, तर या सगळ्या संकटाला आपण तोंड देऊ शकतो. आणि त्यादृष्टीनं उद्योजकता यासंबंधीचा व्यासंग हा वाढवला पाहिजे.

तुम्ही याठिकाणी २१ दिवस आल्याच्यानंतर तुमचा सबंध कार्यक्रम बघितला, वक्ते बघितले, माझी खात्री आहे, की तुम्हाला त्यामधून कॉन्फिडन्स आला पाहिजे. संकटे असतात, परिस्थिती अडचणीची असते, पण मात करण्याचं ठरवल्याच्यानंतर आपण त्याच्यावर मात करू शकतो. आज मला आनंद आहे, की इथं व्यासपीठावर विजय शिर्के बसलेत. विजय शिर्के हे कंस्ट्रक्शनच्या व्यवसायात आहेत. त्यांचा संबंध परिवार हे एकमेव उदाहरण आहे तुम्हा सगळ्यांना एक प्रकारचं इन्स्पायर करायला. त्यांचं गाव, आपण महाबळेश्वरला जातो वाईवरनं, त्या रस्त्यावर एक लहानसं गाव आहे, त्या गावाचं नाव पसरणी आणि त्या पसरणी गावामध्ये त्यांची दोन ते तीन एकर जमीन होती वडिलांची. पण, काहीतरी करायची जिद्द, चिकाटी, कष्टानं इंजिनिअर झाले. छोटे-मोठे प्रकल्प हातामध्ये घ्यायला सुरूवात केली. त्यासाठी अफाट कष्ट केले. त्यांची पुढची पिढी आज त्याच क्षेत्रामध्ये मोठ्या प्रमाणावर कष्ट करतेय आणि त्याचा परिणाम आज या देशातल्या कंस्ट्रक्शन इंडस्ट्री किंवा प्रकल्प बांधणीच्या कार्यक्रमामध्ये त्यांच्या कंपनीचं नाव हे अतिशय महत्त्वाचं झालंय.


मी दिल्लीमध्ये बऱ्याचदा राहतो पार्लमेंटचा मेंबर म्हणून आणि विमानतळावर जाताना त्याच्या आजूबाजूला हजारो घरं हे बांधायचं काम चालू आहे. ती घरं बांधली कुणी असतील, तर ती शिर्केंच्या कंपनीनं. दिल्लीमध्ये त्यांनी आत्ता साठ हजार घरं बांधली. साठ हजार घरं देशाच्या राजधानीमध्ये, ज्यांच्याकडं पहिल्या पिढीमध्ये दोन एकर जमीन होती, त्या कुटुंबातल्या व्यक्तींनी बांधलेली आहेत. महाराष्ट्रात आणि अन्य राज्यातही घरांची त्यांनी बांधलेली संख्या बघितली तर चार एक लाखाच्या पुढे आहेत. याचा अर्थ काय? याचा अर्थ, पार्श्वभूमी नसेल, पण कष्ट करण्याची तयारी आहे, अभ्यास करण्याची तयारी आहे, जगामध्ये कुठेही जाण्याची तयारी आहे आणि या सगळ्यातून यश मिळवायचंच या प्रकारची जिद्द आणि त्याच्यामुळं आज ते इथपर्यंत येऊन पोहोचलेत.

मी तर नेहमीच सांगतो तरूणांना, की तुम्ही वाचन करा. पण दोन पुस्तकं वाचता आली तर अवश्य वाचा. एक वालचंद हिराचंद, ज्यांनी शून्यातून उद्योग सुरू केले. वालचंदनगर माहितीच असेल. वालचंद हे सोलापूरचे एक लहान व्यापारी. नंतर त्यांनी कापडाचा व्यवसाय सुरू केला. शेती घेतली. ऊस लावायला लागले. त्या काळात खंडाच्या जमिनी मिळायच्या. त्या खंडाच्या जमिनीचं क्षेत्र वाढवत गेले. त्या







ऊसाला कारखानदारी पाहिजे म्हणून साखर कारखाना काढायचा निकाल घेतला. त्यासाठी जे काय कष्ट करावे लागले ते करून कारखाना काढला. नंतरच्या काळामध्ये कारखाने तयार करण्याच्यासाठी लागणारी मशिनरीज् ती आपण करावी असं वाटलं. त्याच्यात लक्ष घातलं. जर्मनीतल्या एका कंपनीची कोलॅबोरेशन केलं आणि साखर कारखाने तयार करण्याचा कारखाना काढला. तिथेच थांबले नाहीत. त्यांच्या मनामध्ये आलं, की शेतीला पाण्याची व्यवस्था करायला दोन गोष्टींची गरज आहे, धरणांची आणि पाईपची. आणि म्हणून त्याच्या दोन कंपन्या काढल्या. एक हिंदुस्थान कंस्ट्रक्शन धरणं बांधणारी आणि दुसरी पाईप तयार करणारी. या क्षेत्रात गेले. त्याच्यानंतर त्यांना असं वाटलं, की आपण ॲटोमोबाईलमध्ये का जाऊ नये. आणि मग टेक्नॉलॉजी मिळवली आणि फियाट गाडीची निर्मिती ही त्यांनी सुरू केली आणि ॲटोमोबाईलच्या क्षेत्रामध्ये गेले. तो विचार करत असताना असं वाटलं, की आपण या क्षेत्रामध्ये गेलो, विमानाच्या निर्मितीमध्ये का जायचं नाही. त्याचं ज्ञान मिळवलं आणि हिंदुस्थान एरोनॅटिक्स नावाची कंपनी बंगळूरला काढली. आणि या देशाला लागणारी, विशेषत: लष्कराला लागणारी विमानं ही त्याठिकाणी तयार करायला लागले. सुरूवात कुठून केली, सोलापूरचा कापड दुकानदार आणि गेले कुठपर्यंत, विमानाची निर्मिती करण्यापर्यंत. फार मोठी पार्श्वभूमी आहे. सांपत्तीक स्थिती नव्हती. पण, जिद्द होती, अभ्यासू प्रवृत्ती होती. बरोबर लोकांना घेऊन टीम तयार करण्याची आणि त्या टीमला इन्स्पायर करायचं या प्रकारचा दृष्टीकोन होता. अपार कष्टाची तयारी होती आणि त्यामुळं आज ते नाव किंवा तो परिवार वेगवेगळ्या क्षेत्रामध्ये यशस्वी झाला. आणि म्हणून त्यांचं जे चरित्र आहे, ते चरित्र नव्या पिढीतल्या तरूणांनी वाचलं पाहिजे.

आणि ज्याचा उल्लेख मी शिर्के साहेबांचा केला, त्यांच्याही वडिलांचं चरित्र आहे क्रूसेड नावाचं, ते किंवा त्याचं अनुवादित पुस्तक मिळालं तर अवश्य वाचा. कारण, शून्यातून कुठून कुठं जाऊ शकता याच्यासंबंधीचं अतिशय उत्तम उदाहरण आहे. मघाशी सांगितलं, की त्यांच्या कंपनीनं चार लाख घरं बांधली. दिल्लीमध्ये साठ हजार घरं बांधली. आत्ता अजून चालू आहेत आणि हे काम अखंड चालू आहे. ही दुसरी पिढी काम करतेय. म्हणजे पहिल्या पिढीने कष्ट केले, आदर्श दाखवला, उभं केलं आणि दुसऱ्या पिढीनं त्याच्यात सातत्य ठेवलं आणि विस्तार केला. कधी कधी मला गंमत वाटते.

त्यांचे एक बंधू आहेत विजयचे. त्यांचं नाव प्रताप शिर्के. ते असतात लंडनला. मी परदेशात तिकडं गेलो, तर आम्ही बराच वेळ एकत्र असतो. गप्पा मारत असतो. काही नवीन पाहात असतो. प्रताप शिर्के हे पुण्याच्या इंजिनिअरिंग कॉलेजमधून इंजिनिअर झाले आणि त्यावेळेला कंपनीला कामच नव्हतं. आता कामंच जिथं मिळत नाहीत म्हटल्यावर नोकरी करायची की काय करायचं. कुणीतरी सांगितलं त्यावेळेला म्हणजे ही गोष्ट जुनी आहे, सुमारे ४० वर्षापूर्वीची, त्यावेळेला गल्फमध्ये नुकताच ऑईलचा शोध लागून सुव्यवस्था यायला लागली होती. दुमान हे गाव आज जसं आहे, किंवा देश आहे तसा नव्हता. वाळवंटच होतं. तर तिथं घराची कामं निघालीत असं कळलं म्हणून हे प्रताप तिथं गेले दुमानला. तिथं राजा शेख नावाचा, सगळे अधिकार त्यांच्या हातामध्ये असतात. काम पाहिजे असेल तर शेखच्याकडनंच मिळेल. आता शेखची आणि यांची ओळख नाही, काय करायचं, कसं करायचं. प्रतापनी उद्योग काय केला. शेख सकाळी ९ वाजता त्यांच्या पॅलेसमधून बाहेर निघायचे, हे पॅलेसच्या बाहेर जाऊन बसायचे. एक दिवस झाला, दोन दिवस झाले, तीन दिवस झाले, चार दिवस झाले. शेखची गाडी जायची. पाचव्या दिवशी शेखला काय वाटलं, त्यांनी गाडी थांबवली. हा माणूस गेले काही दिवस इथं का बसतोय. कोण आहे. गाडी थांबवली आणि त्यांना बोलवलं. विचारलं. त्यांनी सांगितलं, की मी भारतातनं आलोय. मला बांधकामाचं काम पाहिजे. ठीक आहे म्हणाले, तु चार पाच घरं बांधून दाखव. त्यांनी सांगितलं, की एवढ्यासाठी मला भारतातनं कामगार आणणं, साहित्य आणणं शक्य होणार नाही. मला मोठी ऑर्डर पाहिजे. मग ऑर्डर मोठी झाली. शेखना त्यांचं मोठं कौतुक वाटलं. त्यांना एक जिज्ञासा होती, की हा तरूण नक्की काय करतोय आणि म्हणून एक दोन महिने झाले, की शेख प्रताप शिर्केना घेऊन ती घरं कशी बांधलीत हे बघायला जायचे. आणि ते काम चांगलं झाल्याच्यानंतर मग सुरूवातीला काही पाच-दहा घरं बांधायला दिली. दुसऱ्या वेळेला पाचच्या ठिकाणी पंचवीस दिली, नंतर पन्नास दिली, शंभर दिली आणि नंतर काही हजार दिली. दुमानमध्ये हजारो घरं बांधली आणि संबंध तिथलं चित्र बदलण्याच्यासाठी भारतीयांनी कष्ट केले आणि त्या कष्टकऱ्यांच्यामध्ये शिर्केंच्या कुटुंबातलीसुद्धा एक व्यक्ती होती आणि शून्यातनं.



मी ही उदाहरण तुम्हाला एवढ्यासाठी सांगतोय, की कष्ट करण्याची तयारी आणि दर्जाच्यासंबंधी तडजोड करायची नाही या प्रकारचं सूत्र या दोन गोष्टी घेऊन तुम्ही पुढं गेलात तर आयुष्यामध्ये नक्की यशस्वी होऊ शकता. मला आनंद आहे, हा एक उपक्रम याठिकाणी सुरू केलांय, आणि या उपक्रमाच्या माध्यमातून २१ दिवसांमध्ये तुम्हा सर्वांना काहीना काहीतरी करण्याच्यासंबंधीची प्रेरणा मिळाली. मी बघितलं तुम्हा सगळ्यांच्याकडं, तुमची बॅकग्राऊंड आणि तुम्हाला काय करायचंय, मला आनंद आहे, की तुमचा प्रत्येक विषय तुम्ही जो निवडतांय हा ज्या आव्हानांना देशाला तोंड द्यावं लागणार आहे, त्या आव्हानाला सोल्यूशन देण्याची कुवत निर्माण होईल असं व्यक्तिमत्व तुमचं तयार होईल हा विचार तुम्ही करतांय. ही अत्यंत जमेची बाजू आहे. आणि म्हणून त्याच्याशी एकरूप व्हा. माझी खात्री आहे, की त्या कामासाठी तुम्ही यशस्वी व्हाल आणि जीवनात तुम्ही यशस्वी झाल्याचं समाधान पुढच्या पिढीला मिळेल.

आता हा २१ दिवसाचा कोर्स तुम्ही याठिकाणी केलांत, तुम्ही स्वत:चं जे उभं करायचंय, ते उभं करा. पण आपलं उभं केल्याच्यानंतर आपण एक पाच-दहा तरी उद्योजक तयार करायला हातभार लावा. त्यांना इन्स्पायर करा. प्रोत्साहित करा आणि ज्या संस्थेत तुम्ही आज सहभाग केलात, या संस्थेलासुद्धा तुमच्या ज्ञानाचा, तुमच्या कष्टाचा आणि तुमच्या अनुभवाचा उपयोग या संस्थेलासुद्धा होईल आणि त्यामुळं तुमचं जे नातं याठिकाणी जुळलंय, त्याच्यामध्ये एक प्रकारचं सातत्य आपण ठेऊया. दोन्ही बाजूंनी ही आमची सगळी टीम याठिकाणी तुमचं हे सगळं अर्जित करण्याच्यासाठी कष्ट केलेत. त्यासाठी मी आमच्या सगळ्या सहकाऱ्यांना धन्यवाद तर देतोच. पण तुम्ही अतिशय चिकाटीनं याठिकाणी हा २१ दिवसांचा कार्यक्रम पूर्ण केलात, त्याबद्दल तुम्हा सगळ्यांचं याठिकाणी अभिनंदन करतो आणि माझे दोन शब्द संपवतो.


■■



# कृषीमध्ये नॉलेज इनपूट वाढवल्यास भविष्य उज्ज्वल

**विवेक सावंत यांचे विचार**

आज मला बारामतीमध्ये आल्यानंतर २१ वर्षापूर्वीच्या एका हृदय प्रसंगाची आठवण झाली. इथे २१ वर्षापूर्वी एक जगप्रसिद्ध शास्त्रज्ञ पवार साहेबांच्या निमंत्रणावरून आले होते. त्यांचं नाव होतं, प्रोफेसर निकोलस नेग्रोपोंटे. निकोलस नेग्रोपोंटे हे आमच्या कम्प्युटिंगच्या क्षेत्रामधलं एवढं उच्च शिखर आहे, की आम्ही कधी त्यांना भेटू शकू असं आम्हाला कधीच वाटलं नव्हतं. आम्ही त्यांचे ग्रंथ वाचत होतो. परंतु, पवार साहेबांच्या निमंत्रणावरून ते इथे आले होते. त्यावेळी ते मीडिया सेलचे प्रमुख होते आणि जग बदलणाऱ्या अनेक संकल्पना त्यांनी मांडल्या होत्या. त्यांचं जे व्याख्यान झालं, त्याच्यातला जो संदेश होता, तो २१ वर्षानंतरही अधिक उपयुक्त, अधिक प्रभावी असा ठरलेला आहे. आणि तो संदेश होता, त्यांच्या भाषणाची थीम म्हणता येईल, ती अशी होती, की ॲटम्स वर्सेस बीट. म्हणजे आता तुम्ही अणूकडून संगणकाकडे जायला सुरूवात करा. अशा प्रकारचं त्यांचं भाषण होतं.




याचा अर्थ असा, की मटेरियल इनपूट जिथं जिथं लागतं, एनर्जी इनपूट जिथं लागतं, फायनान्सियल कॅपिटल इनपूट जिथं लागतं, किंवा डम्ब लेबर इनपूट ऑल शूल्ड बी रिप्लेस बाय नॉलेज इनपूट. म्हणजे बीट्स हे नॉलेजचं प्रतिक आहे. कारण, नॉलेज हे ॲबस्ट्रॅक्ट असतं आणि ते तुम्ही बीट्समधून रिप्रेझेंट करता. ९० पर्सेंट ऑफ नॉलेज ऑफ डिजिटली बॉंड, डिजिटली डिस्ट्रिब्यूटेड, डिजिटली ॲप्लायडेड. त्याच्यामुळे आता एक वर्ल्ड डिजिटल ऑर्डर तयार होतेय आणि तुम्ही सर्वजण आता त्या वर्ल्ड डिजिटल ऑर्डरमध्ये जाताहात. त्याच्यामुळं तुम्ही कृषी क्षेत्रामध्ये जेवढं नॉलेज इनपूट वाढवाल तेवढं तुमचं भविष्य उज्ज्वल असेल. मटेरियल इनपूट, एनर्जी इनपूट, फायनान्सियल कॅपिटल इनपूट आणि डम्ब लेबर इनपूट यांना रिप्लेस करणारं जे नवं नॉलेज इनपूट आहे, ते आता या दशकाची दिशा आहे.

दुसरी दिशा जी आहे, ज्याच्यानं तुम्ही यशस्वी होऊ शकाल, ती म्हणजे क्लायमेंट रिॲलिझम. क्लायमेट चेंज होतोय आणि त्याच्यानी सगळी क्षेत्रं बदलतायंत. मग ते कृषीचं असेल किंवा अजितदादा आपल्याला टेलिव्हिजनवर दिसतात, अनेक डिझास्टर्स आलेली असतात आणि त्यावेळी धीरोदत्तपणे त्याला सामोरे जात असतात, असं आपण टेलिव्हिजनवर बघत असतो. ते क्षेत्र असो, कुठलंही क्षेत्र असो, ते क्लायमेट चेंजपासून आता दूर राहू शकत नाही. क्लायमेट रेझीस्टंट ॲग्रीकल्चर आणि क्लायमेट रिॲलिझम हा तुमच्या पिढीचा एक परवलीचा शब्द असणार आहे.


जसं स्वामीनाथन यांनी एक चतु:सूत्री आपल्याला दिलेली आहे आणि तीसुद्धा आपण सतत, आता बूटकॅम्प संपलेला आहे, आणि आपण प्रत्यक्ष जीवनामध्ये प्रवेश करणार आहात. त्यावेळी त्या चतु:सूत्रीचा आपल्याला खूप उपयोग होईल. जसं स्वामीनाथन यांनी कृषीविषयी चतु:सूत्री देताना म्हटलंय, की पहिली गोष्टी जी आहे ती उत्पादकता म्हणजे प्रोडक्टिव्हिटी, दुसरी जी आहे ती गुणवत्ता म्हणजे क्वालिटी, तिसरी आहे धनवत्ता म्हणजे प्रॉफिबिलिटी आणि चौथी आहे संजिवकता म्हणजे सस्टेनबिलिटी. या चार गोष्टी इतक्या मजेशीर आहेत, की त्या चार दिशांनी ओढतात आपल्याला. जर तुम्ही प्रॉफिबिलिटीच्या मागे लागलात, तर कधी कधी सस्टेनबिलिटीचा बळी जाऊ शकतो. सस्टेनबिलिटीच्या मागे लागलात तर इमिजेट प्रॉफिबिलिटीमध्ये अडचण येऊ शकते. किंवा जर तुम्ही क्वालिटीच्या मागे लागलात, तर काही जणांना प्रोडक्टिव्हिटीमध्ये अडचण येऊ शकते. या चारही सायबरटेनिसली इक्वेशन, जसं तुम्ही शाळेमध्ये एक सामायिक समीकरण शिकलात, तसं ते चारही सायबरटेनिसली इक्वेशन्स आपल्याला सॉल्व करावी लागतात.

पहिल्या दिवशी तुमच्याशी बोलताना मी तुम्हाला तुमचे जे महत्त्वाचे दोन बिंदू आहेत, ते सांगितले होते. एक शेतकरी आणि दुसरे ग्राहक. शेतकऱ्यांना कुठल्या आठ गोष्टी हव्या आहेत या मी तुम्हाला सांगायचा प्रयत्न केला आणि ग्राहकांना जगातल्या कुठल्या चार गोष्टी हव्या आहेत त्या सांगायचा प्रयत्न केला. त्या करत असताना आपल्याला इथे एक इनोव्हेटर होण्याची कल्पना मांडली गेली आहे. तर इनोव्हेशन फक्त कृषीमधलं करून आपण यशस्वी होत नाही. आम्हीसुद्धा एक बिझनेस करतो, इनोव्हेशन करतो. तर पाच इनोव्हेशन्स एकावेळी करावी लागतात. एक

इनोव्हेशन जे आहे ते निश्चितपणे कृषीतलंच असलं पाहिजे. त्याच्याशिवाय त्याला अर्थ नाही. दुसरं इनोव्हेशन त्याला जोड देणाऱ्या टेक्नॉलॉजीमधलं असलं पाहिजे. म्हणजे टेक्नॉलॉजी इनोव्हेशन. तिसरं पॅरलल म्हणजे सायबरटेनिसली बिझनेस इनोव्हेशन. चौथं पार्टनर इनोव्हेशन. म्हणजे पार्टनर्स जे असतात, त्यांची अंत:करणे सांभाळली पाहिजेत. बुद्धांचा विचार आत्ता राजेंद्र पवार यांनी सांगितला. संघम् शरणम् गच्छामी हे बुद्धांनी सांगितलेलं आहे. आपली जी संघटना आहे तिला शरण जावं लागतं. आपल्याबरोबरचे जे पार्टनर्स आहेत, त्यांना शरण जावं लागतं. त्यांचं अंत:करण जिंकावं लागतं. त्याच्यामध्ये इनोव्हेशन्स करावी लागतात. आणि पाचवं जे आहे ते सोशल अकाऊंटिबिलिटी इनोव्हेशन. तुम्ही कितीही ग्रेट व्हा, पण जर तुम्ही सामाजिक उत्तरदायित्वामध्ये काही इनोव्हेशन केलं नाही, तर तुमचं बेसिक टेक्निक इनोव्हेशन किंवा टेक्नॉलॉजीकल किंवा तुमचं प्रोडक्ट इनोव्हेशन यशस्वी होत नाही. कारण शेवटी त्या समाजातच ते इनोव्हेशन पिकअप होणार असतं. त्याच्यामुळे पाचही गोष्टी एकाचवेळी कराव्या लागतात. जशी स्वामीनाथन सरांची चतु:सूत्री आहे, तसं हे तुमच्या इनोव्हेशन्सचे पंचप्राण आहेत.

आज आता इथून परत जाताना उद्यापासून कसं शिकायचं. फेलोशिप आणि ग्रॅज्युएशन याच्यात फरक काय. म्हणजे आपला जो सगळा वेळ ग्रॅज्युएशनपर्यंत जातो, ते बुकात डोकं आणि डोक्यात बुक एवढाच असतो. तसं बुकं म्हणजे आता गूगल, टेकटॉक्स, यू-ट्यूब वगैरे वगैरे. तर फेलोशिपचा काळ जो आहे, तो बुकात डोकं आणि डोक्यात बुकं घालण्याचा नक्कीच नाही. तर आता ज्ञान जे मिळवायचंय आपल्याला, ते ज्ञान मिळवण्याचा मार्ग काय. व्हॉट इज द मीडियम ॲक्वेजिशन ऑफ द नॉलेज. इथे बसलेली जी सगळी प्रस्थापित माणसं आहेत, त्यांनी ज्ञान कसं मिळवलंय, तर ज्ञान हे पुस्तकात वाचून मिळत नाही. पुस्तकात माहिती मिळते. म्हणजे काय, तर तुम्ही पोहायचं पुस्तक वाचलं आणि नंतर उडी मारली तर नक्की मराल. त्याच्यामुळं ज्ञान मिळवण्याचं माध्यम हे उत्पादक आणि सामाजिकदृष्ट्या उपयुक्त काम हेच फक्त ज्ञान मिळवण्याचं एकमेव माध्यम आहे. कुणाला अंतर्ज्ञानाने काही ज्ञान होत असेल तर मला त्याची माहिती नाही. पण सोशली यूजफूल अँड प्रोडक्टिव्ह वर्क ही महात्मा गांधींनी जगाला दिलेली सर्वात मोठी देणगी आहे. त्यांचं सत्याग्रह वगैरे गोष्टीच लोकांना माहिती असतात. पण त्यांची ज्ञानी तालिम लोकांना माहित नसते. पण अमेरिकेमध्ये याच्यावर एवढं संशोधन आता होतंय, की व्हॉट इज द मीडियम ऑफ ॲक्काजिशन नॉलेज.

कारण, एका बाजूनी आर्टिफिशियल इंटेलिजन्स डेव्हलप होतोय. अशा परिस्थितीत ज्ञान मिळवण्याचं माध्यम काय याच्यावर संशोधन होतंय. तुम्ही प्रत्यक्ष ज्या शेतकऱ्यांना जे हवं आहे, त्यांच्याबरोबर काम करता. त्यांच्याकडून बऱ्याच गोष्टी समजून घेता. मगच तुम्ही त्याच्यावर विचार करता, रिफ्लेक्शन करता. आणि त्याच्यामुळे आपली जी लर्निंग सायकल आहे, ती पण अतिशय महत्त्वाची आहे. दॅट्स बिगीन विथ ॲक्शन, ॲक्शन अँड ॲक्शन. आपल्या शरद पवार



फेलोशिपचं बोधवाक्य आहे, की इन्स्पिरेशन टू एक्स्पिरियन्स. जे जे जगामध्ये एक्सलंट लोकं आहेत, किंवा जगामध्ये ज्या ज्या एक्सलंट कंपन्या आहेत, त्यांचं सर्वात वैशिष्ट्य म्हणजे त्यांचा प्रत्येक व्यक्ती हा ॲक्शन ओरिएंटेड असतो. मग ॲक्शन फॉलोअड बाय रिफ्लेक्शन, म्हणजे संध्याकाळी चिंतन केलं पाहिजे, की आज मी हे काम केलं. त्याच्यातनं मला ज्ञान काय मिळालं. रिफ्लेक्टिव्ह प्रॅक्टिसेस व्हेरी इम्पॉरटंट. आणि त्याच्यानंतर मग फ्रॉम ॲक्शन टू रिफ्लेक्शन अँड फ्रॉम रिफ्लेक्शन टू कनक्लुजन्स, निष्कर्ष की उद्या काय करायला पाहिजे. गोईंग टू प्रॅग्मॅटिक प्लॅनिंग. प्रग्मॅटिक प्लॅनिंग बॅक टू न्यू ॲक्शन्स. हे जे सर्कल आहे, ते आपल्याला उद्यापासून निश्चितपणे आपल्यामध्ये आत्मसात करायचंय. फॉलो करायचंय आणि मग त्याचे रिझल्टस् हे तुम्हाला मिळतील.



याविषयी एकच सांगतो, की लीडर्स आर हॅपी व्हाईल डुईंग समथिंग, फॉलोअर्स आर हॅपी अफ्टर इट इज हॅपन डन. म्हणजे घरामध्ये आपली आई असते, ती पोळ्या करताना तिला आनंद होत असतो, जी मोलकरीण असते तिला पोळ्या करून झाल्यावर आनंद होत असतो. याच्यामुळे आपण ज्यावेळी शेतीमधलं काहीतरी काम करू त्यावेळेला आपल्याला आनंद होत असला, तर आपण लीडर होण्याची शक्यता आहे. आणि दुसरी गोष्ट म्हणजे लीडर्स टेक रिस्पॉन्सिबिलिटी. लीडर्स जबाबदारी घेतात. नुसती बघ्याची भूमिका घेत नाहीत, टीकाकाराची भूमिका घेत नाहीत. रिस्पॉन्सिबिलिटी घेतात. रिस्पॉन्सिबिलिटी याचा अर्थ रिस्पॉन्स ॲबिलिटी, की बाह्यसंवेदना येत असतात आणि त्याला अनेक प्रतिसाद तुम्ही देऊ शकता. प्रत्येकाचे वेगळे प्रतिसाद असू शकतात. पण त्याच्यातल्या योग्य प्रतिसादाची निवड करण्याची क्षमता आणि त्या निवडीच्या स्वातंत्र्याचा विकास ही लीडरची वैशिष्ट्यं असतात. आणि त्याच्यामुळे आहे त्या परिस्थितीमध्ये माझ्या मनात जे प्रतिसाद येतात, त्याच्यातला योग्य प्रतिसाद कुठला आणि तो मी कसा देणार याची ॲबिलिटी म्हणजे रिस्पॉन्सिबिलिटी. आणि त्याच्यानी खरा आपला हा प्रोजेक्ट पुढे जाईल.

तुम्ही पहिल्याच बॅचचे विद्यार्थी आहात. तुमच्यावर खूप जबाबदारी आहे. तुम्हाला खूप प्रकारचं स्वातंत्र्य दिलं गेलेलं आहे. आता तुम्ही जबाबदारी पण घेतली पाहिजे. व्हिक्टर फ्रँकेल अमेरिकेविषयी नेहमी म्हणतात, आमच्याकडे स्टॅच्यू ऑफ लिबर्टी आहे. पण, आमच्याकडे स्टॅच्यू ऑफ रिस्पॉन्सिबिलिटी नाही. त्याच्यामुळं आपल्याकडं खूप स्वातंत्र्य तुम्हा निरनिराळे २१ दिवस दिलं गेलं. आता तुमची टर्न आहे ती लिबर्टी आणि त्याच्यामुळे उद्यापासूनचा तुमचा जो प्रवास आहे. खूप जबाबदारी तुमच्यावर आहे. कारण, तुम्ही शरद पवार फेलोशिप याचं एक संस्थात्मक स्वरूप निर्माण होणं, म्हणजे रॉयल सोसायटी जशी आहे, न्यूटनपासून त्याच्यामध्ये फेलो आहेत आणि ते पुढच्या पिढीला एक आदर्श असतात. डॉ. माशेलकर नेहमी सांगतात, की मी रॉयल सोसायटीचा फेलो झालो आणि त्या पुस्तकात साईन करताना माझ्या मनात आलं, की बापरे, याच्यात न्यूटनची सही आहे. तसं तुमच्याविषयी पुढच्या बॅचेस्‌नी म्हटलं पाहिजे, की माय गॉड यांची सही आहे याच्यात. ही फेलोशिप मला मिळत असताना माझ्यावर केवढी जबाबदारी आहे, ती त्यांच्यापर्यंत पोहोचली पाहिजे आणि त्याच्यातून आपल्या शेतकऱ्यांच्या आणि आपल्या ग्राहकांच्या ज्या ॲस्पिरेशन्स आहेत, त्या परिपूर्ण करण्यासाठी आपण कटिबद्ध झालं पाहिजे.

मला आज सुप्रियाताईंनी, नलावडे या सगळ्यांनी इथं बोलवलं, त्याच्याबद्दल मी कृतज्ञता व्यक्त करतो आणि सर्व सन्माननीय व्यक्तींचं आभार मानतो. तुम्हीही शांतचित्तानं माझे विचार ऐकून घेतलेत आणि तुमच्या चिकाटीचं प्रदर्शन केलंत त्याच्यबद्दल तुमचंही आभार मानतो. धन्यवाद!

■■





# तरुणांच्या नवीन संकल्पनांचा उपयोग

माझ्या आधीच्या बऱ्याचशा मान्यवरांनी खूप काही सांगितलं आहे. बूटकॅम्प म्हणजे नाविन्यपूर्ण संकल्पना घेऊन येणाऱ्या प्रशिक्षणार्थींचं कौन्सिलिंग, मार्गदर्शन आणि भविष्यात उद्योजक बनण्याच्याकरता साधारण सहाय्य शिबिर असे स्वरुप आहे. ही नवी कल्पना सुप्रियानी पुढे आणली. आणि आपल्या सगळ्यांच्यासमोर जी काही आव्हानं आहेत, ती आव्हानं पेलण्याची ताकद ही आमच्या नवीन पिढीमध्ये असली पाहिजे. पण, ते फक्त भाषणामध्ये सांगून नाही, तर त्याच्यामध्ये काही त्यांना तयार केलं गेलं पाहिजे, त्यांना मार्गदर्शन केलं गेलं पाहिजे. हाच याच्यामागचा खरा दृष्टीकोन आहे.

त्यामध्ये समाजहितासाठी काम करत असताना समाजाचे नियम, कायदे त्याठिकाणी पाळणं हा सर्वात पहिला आपला सगळ्यांचा धर्म आहे. आणि करोनासंदर्भातल्या नियमांचं पालन करून आजचा हा जो आटोपशीर कार्यक्रम आयोजित केल्याबद्दल मी चव्हाण प्रतिष्ठानचा, कारण, करोनाचं सावट आजही आपल्या सगळ्यांच्यासमोर आहे. ते दूर करण्याच्याकरता प्रत्येकजण आपल्या आपल्या स्तरावर प्रयत्न करतोय. परंतु, त्याच्यात तुम्ही-आम्ही कुठं कमी पडता कामा नये, अशा प्रकारचीदेखील सूचना मी आपल्या सगळ्यांना करतो.

आधुनिक महाराष्ट्राच्या विकासाचा पाया ज्यांनी रचला आणि आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार म्हणून ज्यांचा गौरव नेहमीच होत असतो, ते राज्याचे पहिले मुख्यमंत्री स्वर्गीय




# व्यापक समाजहितासाठी व्हावा

अजित पवार

यशवंतराव चव्हाण साहेबांच्या नावानं काम करत असलेल्या चव्हाण प्रतिष्ठानच्या माध्यमातून हा कार्यक्रम होतोय. राज्यातच नव्हे; तर देशाच्या कृषी, उद्योग, सहकार, साहित्य, कला, क्रीडा, संस्कृती, संरक्षण अशा अनेक क्षेत्रांमध्ये भरीव योगदान देणाऱ्या आदरणीय पवार साहेबांच्या नावानी शेती, साहित्य, शिक्षण क्षेत्रातल्या युवकांच्यासाठी आपण इन्स्पायर फेलोशीप कार्यक्रम त्याठिकाणी राबवतोय. स्वर्गिय चव्हाण साहेबांचं आणि आदरणीय पवार साहेबांचं, या दोघांची नावं या कार्यक्रमाशी जोडलेली असल्यानं हा कार्यक्रम अतिशय यशस्वी होण्याची फार मोठी जबाबदारी ही आपल्यावर आहे आणि हा कार्यक्रम यशस्वी करणं म्हणजे केवळ औपचारिकता पार पडणं असं अजिबात कारण नाही.

या फेलोशीपच्या कार्यक्रमातून वेगळ्या पद्धतीनं विचार करणारे तरूण हे पुढं आले पाहिजेत, त्यांच्या माध्यमातून शेतीला, शेतीपूरक उद्योगांना, समाजाला उपयोगी ठरतील अशा नवीन संकल्पना पुढं आल्या पाहिजेत. त्या संकल्पनांना मूर्त स्वरूप मिळालं पाहिजे. या संकल्पनांचा उपयोग समाजाच्या व्यापक हितासाठी झाला पाहिजे. महत्त्वाचं म्हणजे, या प्रयत्नांमध्ये सातत्य राहिलं पाहिजे. ही व्यवस्था कायम टिकली पाहिजे. त्याच्यामध्ये तुम्ही सर्वजण काम करत असताना कदाचित तुम्हाला पुढच्या काळामध्ये काही सरकारची पण मदत लागेल. सुदैवानं उद्धव ठाकरे साहेबांच्या नेतृत्वाखाली आम्ही सगळेजणं सरकारमध्ये काम करतो आणि अशा चांगल्या कामामध्ये जर आम्हा लोकांची कुठं मदत

लागली तर केव्हाही आम्ही ती सर्वतोपरी सहकार्य आणि मदत करायला तयार आहोत. हा विश्वास पण मी आपल्या सगळ्यांना यानिमित्तानं देतो.

आपल्या सगळ्यांना माहिती आहे, की गेल्या अनेक वर्षांपासून आपण नुसतं वाचतोय, ऐकतोय आणि ग्लोबल वार्मिंगचं संकट थेट तुमच्या-माझ्या दारापर्यंत आलेलं आहे. आपण सगळेजण बघतोय, आपल्याकडचा प्रत्येक ऋतू जवळपास महिना-दीड महिना पुढं सरकलेला आहे. आणि यावर्षी आपण दिवाळी थंडीशिवाय साजरी केली आणि ऐन जानेवारीच्या मध्यावर राज्यात अनेक ठिकाणी प्रचंड थंडी पडलेली आपण पाहिलेली आहे. या थंडीमुळं महाबळेश्वरमध्ये दवबिंदू गोठतायंत, तिकडं विदर्भात मात्र पाऊस सुरू आहे. मुंबईमध्ये परिस्थिती वेगळी आहे. तिथं तिसरं गुलाब नावानी आलं. आणि त्याच्यामुळं तुमच्या-माझ्या संपूर्ण समुद्र किनारपट्टीला, कोकणच्या किनाऱ्याला याचा खूप मोठा फटका बसला. तिथं वाढता धोका आहे. आम्ही साधारण माहिती घेतली, तर पाच वर्षामध्ये चारवेळेला ही चक्रीवादळं त्याठिकाणी आलेली आहेत. आणि आता हे सततच होणार हे गृहित धरून आम्ही त्याच्यासंदर्भातली काही पावलं उचलण्याचा प्रयत्न करतोय. कारण, हा ग्लोबल वार्मिंगचा परिणाम नैसर्गिक संकटाचा पहिला फटका सगळ्यात जास्त कुणाला बसत असेल तर तो तुमच्या-माझ्या शेतीला बसतो. तुमच्या-माझ्या शेतकऱ्याला बसतो आणि त्याच्यामुळं शेतकऱ्याचं पूर्णपणानं नियोजन हे बिघडून जातंय. आपल्यापैकी अनेकांनी हे बघितलंय.

गेल्या दीड वर्षापूर्वी साधारण २०२०मध्ये टोळधाडीचं



काही ठिकाणी एसी सुरू आहेत. अशा प्रकारचं हे काम करावं लागतं. ग्लोबल वार्मिंग, ग्लोबल वार्मिंग म्हणजे काय? तर हे सगळं आपण उघड्या डोळयांनी पाहतोय आणि राज्यातल्या तीन विभागांत एकाचवेळी पावसाळा काही ठिकाणी चालू आहे, काही ठिकाणी हिवाळाही चालू आहे, काही ठिकाणी थोडासा उन्हाळाही चालू आहे. हे तिन्ही ऋतू बघायला मिळतायंत. निसर्गाचं चक्र पूर्णपणे बदलून गेलंय. बिघडून गेलंय. याचाही विचार शेतकऱ्यांनी, तरूणांनी आणि विशेषत: नव्या संशोधकांनी केला पाहिजे. यावर उपाययोजनादेखील केली पाहिजे.

तुम्ही पाहिलं, मधल्या काळामध्ये निसर्गच्या नावानं एक चक्रीवादळ आलं. नंतर तोक्तेच्या नावानी आलं. नंतर एक मोठं संकट आपल्यावर आलेलं होतं. पाकिस्तानमधून टोळधाड भारतात आली आणि त्या टोळधाडीचा राजस्थान, उत्तर प्रदेश, मध्य प्रदेशमध्ये शेतीचं प्रचंड असं नुकसान झालं. ती टोळधाड मध्य प्रदेशातून सीमेलगतच्या मोशी, वरूड, मेळघाटपर्यंत शिरली. म्हणजे महाराष्ट्राच्या या परिसरामध्ये. आपल्या कृषी विभागानं वेळीच उपाययोजना केल्यामुळं या टोळधाडीला संपूर्ण राज्यात शिरकाव करता आला नाही. परंतु, अशा घटनांच्याकडंदेखील आपण गांभीर्यानी पाहिलं पाहिजे. पिकावर येणारा तांबोरा, पांढरा मावा, तेल्या, करपा या रोगांमुळं दरवर्षी मोठ्या प्रमाणावर आपल्या शेतकऱ्यांच्या पिकाचं नुकसान होतंय. फळबागांचं नुकसान होतंय. वारंवार येणाऱ्या या रोगांवर नियंत्रण आणण्यासाठी आपल्याला

प्रयत्न करावे लागतील. नवसंशोधन त्याठिकाणी विकसित करावं लागेल आणि या शिबिरातल्या अनेक तरूणांनी सेंद्रीय पेस्टीसीड, आर्टिफिशियल इंटेलिजन्स, फवारणी अशा संकल्पना पुढे आणलेल्या आहेत. या संकल्पनांवरदेखील अधिक काम करून या प्रश्नांवर प्रभावी उपाय शोधला गेला पाहिजे.

आपण पाहातांय, शेतीच्या बरोबरीनं कोंबडी पालन असेल, शेळी पालन असेल, वराह पालन असेल, मत्स्य शेतीसारख्या विषयावर संशोधन, अभ्यास झाला पाहिजे. ॲग्रीकल्चर ट्रस्ट आणि सेंटर ऑफ एक्सलन्स त्यादृष्टीनं एक महत्त्वाची जबाबदारी पार पाडतंय. परंतु, या गोष्टीलादेखील आपण तितकंच महत्त्व त्याठिकाणी दिलं पाहिजे. आपल्या इथं उत्पादित होणारं अन्न-धान्य, फळ-भाजीपाला हा रसायनमुक्त





असला पाहिजे, याकडं आपल्याला अधिकचं लक्ष द्यावं लागणार आहे. त्यासाठी अधिक उत्पादन देणाऱ्या पिकांच्या वाणाचं संशोधन आणि रसायनमुक्त ऑर्गनिक खतं, सेंद्रीय औषधांची निर्मिती करावी लागणार आहे. शेतकऱ्यांचं उत्पादन वाढवण्याकरता ऑर्गनिक चळवळीला प्रोत्साहन द्यावं लागणार आहे. त्यादृष्टीनं आपल्यापैकी अनेकांनी काम सुरू केलंय. ते काम आपण वाढवलं पाहिजे. सखोल संशोधन आपण सर्वांनी केलं पाहिजे, असंही आवाहन मी यानिमित्तानं करतो. शेतीच्या क्षेत्रात या पुढच्या काळात आपल्याला अनेक बदल घडवायचेत. हे बदल निसर्गपूरक, आरोग्यपूरक असतील याची काळजी आपल्या सर्वांना घ्यावीच लागेल. शेतीला आधुनिक तंत्रज्ञानाची जोड द्यावी लागेल. आर्टिफिशल इंटेलिजन्स, रोबोटिकसारखी तंत्रज्ञानं उपयोगात आणावी लागतील. शेती किफायतशीर पद्धतीनं करावी लागेल आणि मला विश्वास आहे, जे महाराष्ट्रातलं यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान आहे, ॲग्रीकल्चर डेव्हलपमेंट ट्रस्ट आहे, इनोव्हेशन अँड इनक्यूबेशन सेंटर आहे आणि आपण सर्वांनी आयोजित केलेला, सहभाग दिलेला शरद पवार इन्स्पायर प्रोग्रॅम म्हणजे त्या दिशेनं पडलेलं एक आश्वासक, महत्त्वपूर्ण अशा प्रकारचं पाऊल आहे. हे पाऊल इथंच थांबणार नाही. शेती प्रगतीच्या वाटेवर यापुढची पावलं अशीच पडत राहतील असा विश्वास मी यानिमित्तानं व्यक्त करतो आणि प्रशिक्षणात सहभागी सर्वांचं अभिनंदन करतो. आयोजकांचं मी मनापासून आभार मानतो आणि आपल्या सर्वांना मन:पूर्वक धन्यवाद देतो. जयहिंद! जय महाराष्ट्र!!



■■

# फेलोज्च्या संकल्पनांमुळे महाराष्ट्र प्रगल्भ राज्य बनेल

**सुप्रिया सुळे**

शरद पवार इन्स्पायर फेलोशिपची सुरुवात, खरं तर ही महेश गादेकर आणि फिरोज मसानी या दोघांच्या चर्चेतून ही झालेली आहे आणि मला दोन-तीन लोकांचा आवर्जुन या कार्यक्रमात उल्लेख करायचांय, की ही फेलोशिप रिअॅलिटी करण्यात अर्थातच राजूदादा म्हटले तशी विज्ञान केंद्र आणि इन्क्यूबेशन सेंटर या दोन्ही टीमची खूप मदत झाली. पण, त्याचबरोबर डॉ. काकोडकर आणि विवेक सावंत या दोघांनी जो आमचा हँडहोल्डिंग प्रत्येक टप्प्याटप्प्यात केलं आणि सावंत सरांचं भाषण ऐकताना स्मार्ट गोल जसे त्यांनी तुम्हाला सांगितले, तसे या फेलोशिपचे पण स्मार्ट गोल्स त्यांनी मला पहिल्या मिटिंगमध्ये सांगितले होते. त्याच्यामुळं ही फेलोशिप जी डेव्हलप झाली, त्याच्यामध्ये काकोडकर साहेब आणि सावंत सरांच्या दोघांच्या मार्गदर्शनानी आज खरं तर आम्ही इथपर्यंत आलेलो आहोत. त्यामुळे त्या दोघांचे मी मन:पूर्वक आभार मानते.

हे करत असताना बऱ्याचशा बाकीच्याही लोकांचा खूप मोठा रोल होता. राजूदादांनी ज्या जयाताईंचा उल्लेख केला, म्हणजे काल गंमतीमध्ये एक मुलगी म्हणाली, की या सगळ्या वास्तूमध्ये इन्क्यूबेशन सेंटरमध्ये एक महिला ती चालवते, डॉमिनेटिंग जया असा शब्द वापरला, मला थोडंस असं वाटलं, की अरे बापरे ही जयाताई आता नाराज होतील. तर जयाताई अजिबात नाराज नाही झाल्या. त्यांच्या हातावरच डीजे लिहिलेले आहे. प्रत्यक्षात ते डी म्हणजे डॉमिनेट नाही, पण त्यांच्या नवऱ्याचं नाव योगायोगाने डीने आहे. पण, इट् इज व्हेरी इंटरेस्टिंग, की ही मुलं सगळ्या जिल्ह्यामधनं आली आहेत, त्यातली एक मला काल असं म्हणाली, की पहिल्या दिवशी मला उभं पण राहाता येत नव्हतं. मला इतकी लाज वाटत होती, इतकं ऑकवर्ड होत होतं. आणि काल कदाचित सगळ्यात चांगलं भाषण त्या मुलीचं झालं. त्यामुळे हा खूप इंटरेस्टिंग असा, प्रोफेसर नलावडे, जयाताई आणि त्यांची सगळी जी टीम आहे, मी आवर्जुन त्यांचा उल्लेख करू इच्छिते, की प्रोफेसर नीलेश, प्रोफेसर जया सारंग, शुभम तर रांचीचे आहेत. अमित काळे, सोनाली सस्ते, देवेन भगत, मयूर पिसाळ, सुहास ननावरे, संकेत भोसले, करण सामंत, कृष्णा धुमाळ आणि केतन हेंद्रे. या सगळ्यांच्या प्रयत्नांमुळं खरं तर हा कार्यक्रम यशस्वी झालेला आहे. त्यांच्या सगळ्यांचे मी मनापासून आभार मानते.

कारण, दोन गोष्टी मुलांच्या बोलण्यातून मला आल्या. अतिशय छोटी गोष्ट होती. पण, कदाचित याच्यात नंदा वहिनींचा मोठा रोल असेल. कारण त्याच्यातलं जे बारीक डिटेलिंग होतं, त्या मुली सांगत होत्या मला, की आम्ही उशिरापर्यंत जर कधी काम केलं, तर होस्टेलला परत जाईस्तोपर्यंत जया मॅडम त्याचं मॉनेटरिंग करायच्या, की प्रत्येक मुलगी ही तिच्या होस्टेलमध्ये व्यवस्थितपणे पोहोचली का नाही. किंवा या सगळ्या दिवसांमध्ये कंटिन्यूज इथे एक दिवसाआड डॉक्टर्स येत होते. त्यांना जेवणासाठी, म्हणजे अगदी फेलोशिपमध्ये तुम्हाला असं वाटेल की केवढी क्षुल्लक गोष्ट आहे, पण, अगदी घरी जसं असेल, की आई विचारते आपल्याला, की उद्या ही भाजी खाशील का. मग मुलं म्हटलं, की नाही नाही भेंडी नको आम्हाला. इतकं प्रेमानं या मुलांना गेल्या २१ दिवसांत ज्याला जेन्युअली इंग्रजीमध्ये नर्सरिंग म्हणतो, तसं नर्सरिंग झालेलं आहे आणि एक मुलगी तर काल मला म्हणाली, की मी पहिल्या दिवशी आले तेव्हा असं वाटत होतं, की आता २१ दिवस कधी संपतील. आता ती म्हटली, की २१ दिवस संपले तर आम्हाला एक्स्टेंशन मिळेल का. म्हटलं आता राजूदादाला विचार. ती तुम्हाला ॲडॉप्ट




२१ दिवसांसाठीच केलेलं आहे. पुढचं ॲडॉप्शन असेल तर ते दादा-वहिनींकडं, माझ्याकडे नाही.

अतिशय चांगल्या वातावरणात हा कार्यक्रम झाला आणि सावंत सर तुम्ही म्हणला तसं, की देअर विल बी हँडओव्हरिंग प्रोग्रॅम. म्हणजे आत्ता मेंटरिंग हे नलावडे सर वगैरे करतायंत. पण आमचा प्रयत्न राहील, की पहिल्या बॅचनी तिसऱ्या बॅचला मेंटरिंग करावं. दुसऱ्या बॅचनी चौथ्या बॅचला मेंटरिंग करावं आणि हा प्रोग्रॅम इव्हॉल्व्ह व्हावा. त्याच्यात तुमचं आणि काकोडकर सरांचं मार्गदर्शन तर आम्हाला लागेलच. पण, मी आवर्जुन प्रताप पवारांच्या कॉन्ट्रिब्यूशनचा मोठा उल्लेख करीन. कारण, सुरूवातीला त्यांचं मार्गदर्शन आम्ही घेतलं आणि ज्या ऑक्सफर्डबद्दल सातत्यानं मुलं काल बोलत होती, यापैकी दोन मुलं अशी आहेत ज्यांना ऑक्सफर्डला एक प्रोग्रॅम करायला



जायचं होतं. पण, प्रताप पवारांच्या मदतीमुळे तो सगळा ऑक्सफर्डचा प्रोग्रॅम लोकलाईज करून आज बारामतीमधल्या या इन्क्यूबेशन सेंटरमध्ये वन टेंथ द कॉस्ट म्हणजे त्या मुलाला किती तरी लाख रूपये भरावे लागणार होते. तोच प्रोग्रॅम अतिशय कमी किंमतीमध्ये तसाच लोकलाईज करून आज प्रताप पवारांच्या प्रयत्नांमुळं हा ऑक्सफर्डचा प्रोग्रॅम बारामतीत होणार आहे. ही एक खूप मोठी गोष्ट आहे. आणि माझा विश्वास आहे, की याच्यामुळे पुढचे जे काही फेलोज् येतील

त्यांना या सगळ्या गोष्टींचा उपयोग होईल.

या संस्थेनी आप्पासाहेब काकांचं जे मोठं योगदान आहे, त्यांच्या नावाने एक स्कॉलरशीप सुरू केली आहे. ही आता आपण फेलोशिप करतोय. कंटिन्यू ज्याचा उल्लेख सावंत सरांनी त्यांच्या भाषणात केला, यू हॅव टू ॲक्शन, यू हॅव टू वर्क फॉर इट अँड देन थिंक अबाऊट. म्हणजे सगळ्या गोष्टींचा इन्ट्रोपेक्शन. म्हणजे प्रत्येक टप्प्याटप्प्यात आम्ही यांचा फीडबॅक फॉर्म जो घेतलांय, एक मॉडेल आम्ही फेलोशीप म्हणून ट्राय अँड टेस्ट करतोय. द प्रोग्रॅम वील इन्व्हॉल्व वर्क नेक्स्ट फाईव्ह इयर्स, टेन इयर्स. आणि तुमच्या सगळ्यांच्या मार्गदर्शनानी आणि या मुलांच्या इनपूटस्‌नी हा प्रोग्रॅम पुढं चालावा. त्याचा एक अल्यूमनाय त्यांनी स्वत: तयार करावा आणि जसं प्रताप काका म्हणाले, की एकटे मोठे होऊ नका, कुणाला तरी अजून स्वत:बरोबर मोठं करण्यासाठी प्रयत्न करा. तर हा जो अल्यूमनाय फेलोशीपमधून तयार होईल, त्याच्यातून आमची हीच अपेक्षा आहे, की हँडहोल्डिंग करून या नवीन गोष्टी, नवीन तंत्रज्ञान, हे ज्ञान आत्मसात करून त्याला एक रिॲलिटी म्हणजे एक चार-पाच वर्षात हजार मुलं-मुली जर असं इनोव्हेशन करू शकले, यशस्वी होऊ शकले, तर मला वाटतं, की या देशातला सगळ्यात प्रगल्भ प्रत्येक बाबतीतलं राज्य कुठलं असेल तर ते अर्थातच आपला महाराष्ट्र असेल. आणि त्याच्यात तुमच्या फेलोज्‌चं सगळ्यात मोठं योगदान असेल. कारण का तर ते टेक्नॉलॉजी ड्रीव्हन असेल.

त्यामुळं आज या संपूर्ण कार्यक्रमाचा हा पहिला टप्पा आहे. पुढची बॅच येईल ती मे किंवा जूनमध्ये त्याच्या तारखा घ्यायचं चाललेलं आहे. त्याच्यातही यांनी दिलेल्या फीडबॅकचा, काही बदल जर सुचवले असतील तर ते सगळे आम्ही करणार आहोत. मला स्वत:लाच काल या मुलांना भेटताना एका गोष्टीचं आश्चर्य वाटलं, की ही सगळी मुलं जास्ती करून ग्रामीण भागात शिकलेली आहेत. आणि त्यांचं सगळ्यांचं वय १९, २०, २१, २२, एवढ्या लहान वयामध्ये एवढं इनोव्हेशन म्हणजे त्या व्हॅनिलाचा जो एक्स्पिरियन्स मुलींनी सांगितला किंवा चीझ जो तुम्ही पाहिला तेव्हा सगळ्यात इंटरेस्टिंग जी गोष्ट कधी माझ्या मनातही आली नव्हती, की चीझ बाटलीतून आम्ही लहानपणी खायचो, त्याच्यानंतर स्लाईस आली, तसा जॅमचा स्लाईस म्हणजे ॲकच्युअली इनोव्हेशन. मी परदेशातही फिरलेय, पण जॅमची स्लाईस ही चीझच्या स्लाईससारखी असावी असं कधी कुणाच्याच मनात म्हणजे जॅमच्या ज्या मोठ्या कंपन्या आहेत त्यांना आढळलं नाही. पण आमच्या हिंगोलीच्या मुलाला हे सुचलं. खरंच हे ॲबस्युलटली वंडरफुल आणि एक्सायटिंग आमच्या सगळ्यांसाठी आहे. त्याच्यामुळं आज तुम्ही खूप विश्वास ठेऊन तुमच्या आयुष्यातले २१ दिवस हे इथे दिले याबद्दल तुमच्या सगळ्या फेलोज्‌चे मी मनापासून आभार मानते. आम्हाला ज्यांनी टप्प्याटप्प्यात हे करण्यासाठी मदत केली, त्यांचेही मन:पूर्वक आभार मानते.

साहेब, दादा यांचं मार्गदर्शन आम्हाला सातत्यानी असतं. पण, सुरूवातीलाच राजूदादांनी जे इंटरव्हेशन केलं आणि त्याच्यानंतर ज्या लोकांनी मदत केली, ह्यांचेही मी, या काही झूमनी आपल्याला जॉईन झालेले, त्यांचे आभार मानते. पण आय मस्ट ॲडमीट वन थिंग, की या सगळ्या मुलांचा ॲपशूल्ट जो रोल मॉडेल या सगळ्या कार्यक्रमात होता, सावंत सर ते तुम्ही होता. या सगळ्या चाळीस मुलांमध्ये प्रत्येकानी ज्यांचा उल्लेख केला, आणि आम्हाला जो फीडबॅक फॉर्म मिळाला त्याच्यात निगेटिव्ह कमेंट तुमच्या प्रोग्रॅममधल्या काय होत्या फीडबॅक फॉर्ममधल्या, की सावंत सरांचं लेक्चर खूप कमी वेळाचं झालं.



आणि ते स्वत: पाऊण तास बोलले. त्याच्यानंतर तीन तास डिस्कशन झालं. म्हणजे त्यांचं सेशन चार तासांचं झालं. तरी कोणीही समाधानी झालं नाही. त्याच्यामुळं दॅट इज द फीडबॅक फॉर अस. त्याच्यामुळं पुढच्या मे महिन्याच्या प्रोग्रॅममध्ये तुमचा रोल आता किती महत्त्वाचा आहे हे आता नलावडे सर ठरवतील. पण इट वॉज व्हेरी व्हेरी इंटरेस्टिंग की या मुलांना त्याच्यात खूप क्लिअॅरिटी तुमच्या गोल्समध्ये मिळाली. त्यामुळं तुमचं मार्गदर्शन आणि एमकेसीएलचा जो सपोर्ट आम्हाला फक्त या व्हर्टिकलसाठी नाही, पण शिक्षणासाठी जो मिळतोय आणि तुमचं मार्गदर्शन आमच्यासाठी या खूप महत्त्वाचं राहील. नलावडे सर, जया मॅम आणि त्यांची इनटायर टीम, म्हणजे खरं तर ही फॅमिलीसारखं झालेलं आहे आणि काल निघत असताना या सगळ्या मुलांनी मला आग्रह केला, की टीम खूप चांगली आहे. एक महाराष्ट्र म्हणून स्वत:ला ते बघतात. ही चाळीस जणांची टीम पुढच्या काळात नक्कीच आपल्याला काहीतरी चांगलं उभं करून दाखवील. प्रताप पवारांनी फक्त दोन गोष्टी ज्या सांगितल्या, त्या लक्षात ठेवा. ज्या इन्क्यूबेशन सेंटरबद्दल आपण काल बोललो आणि बिझनेसेसबद्दल ते बोलले, ते दोन्ही पुण्यातील अपॉर्च्युनिटीज, पूना इंजिनिअरिंग सीईओपीजकडेही आहेत आणि त्यांच्या सायन्स सेंटरसाठी आहे. ते पण आपण पुढच्या प्रोग्रॅममध्ये फेलोज्‌साठी इंटिग्रेड करू आणि तुमच्या टीमसाठी त्याची सगळ्याची माहिती आम्ही तुम्हाला सगळ्यांना पाठवून देऊ. म्हणजे आज तुम्ही सगळे या कार्यक्रमाला आवर्जुन उपस्थित राहिलात, राजूदादांच्यामुळे खरं तर कार्यक्रम एवढा यशस्वी झाला. त्याच्यामुळे मी माझ्या सगळ्या बंधूंचे मन:पूर्वक आभार मानून. लेटस् मेक धिस ड्रीम इन टू अ रिअॅलिटी. थँक यू!

■■


बारामती येथे २१ दिवस चाललेल्या बूट कॅम्पच्या समारोप समारंभाला उपस्थितांमध्ये शरद पवार, विवेक सावंत, प्रतापराव पवार, अजित पवार, विठ्ठल मणियार, अजय शिर्के, राजेंद्र पवार, रोहित पवार, सुप्रिया सुळे, सुनंदाताई पवार, दत्ता बाळसराफ व शरद पवार इन्स्पायर फेलोशिप मिळालेले सर्व विद्यार्थी.




पहिली गोष्ट, तुम्हा सगळ्या विद्यार्थ्यांचं अभिनंदन. तुम्ही या संस्थेत यायला पात्र झालात, आणि त्याचा तुम्ही उपयोग करून घेतलेला आहे. मी आत्ता ही जी चित्रफित पाहिली, त्यात माझ्यासारख्याला अतिशय आनंद आहे, की जे योग्य शिक्षण तुम्हाला मिळायला पाहिजे, जे योग्य मार्गदर्शन तुम्हाला मिळायला पाहिजे, ते अतिशय कष्टपूर्वक आणि जाणीवपूर्वक या लोकांनी, नुसतंच देशातले नाही तर आंतरराष्ट्रीय ख्यातीचे लोकसुद्धा इथं आणून प्रयत्न केला. याच्याबद्दल संस्थेचं अभिनंदन केलं पाहिजे.

# तक्रार न करता प्रयत्नवादी राहिल्यास यशस्वी व्हाल

**प्रतापराव पवार**

काही गोष्टी मला फक्त सांगायच्च्यात, की ॲग्रो वन नावाचं वर्तमानपत्र, जे तुम्हाला माहिती असेल, तिथे गेली दहा वर्षे आपण रोज दोन यशस्वी कथा लिहितो. त्यामुळं तुम्हाला काही हजार यशस्वी कथा मिळतील, ज्याच्यातून तुम्हाला काही प्रेरणा मिळेल. कारण लोक अतिशय कष्टातनं,

धडपड करून उभे राहू शकतात याची काही उदाहरणे आहेत. त्यातनं तुम्हाला काही शिकता आलं तर जरून शिकायचा प्रयत्न करा. आत्ता सायन्स अँड टेक्नॉलॉजी पार्क या संस्थेचा उल्लेख झाला. त्याचा मी २० वर्षे सदस्य आहे. आणि भाऊ इन्स्टिट्यूट म्हणून कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगची संस्था आहे, या दोन्ही ठिकाणी अंत्रप्रिन्युरशीपशचं खूप काम चालतं. या दोन्ही संस्थांमध्ये गव्हर्मेंट ऑफ इंडियाच्या मदतीने आम्ही कोट्यवधी रूपये विद्यार्थ्यांना अंत्रप्रिन्युरशीपसाठी देतो दोन गोष्टीकरता, एक एखाद्याला प्रोडक्ट डेव्हलप करायचं असेल तर आमच्याकडं काही फंडस् गव्हर्नर देतं आणि दुसरी गोष्ट एकाचं प्रोडक्ट डेव्हलप झाल्यानंतर त्याचं उत्पादन करायचं असेल तर त्याच्यासाठीही गव्हर्मेंट ऑफ इंडियाच्या काही योजना आहेत. यात तुम्हाला काही उपयोग झाला, तर जरूर प्रयत्न करा. या दोन्ही संस्थांशी मी संबंधित आहे आणि बारामती अ‍ॅग्रो ट्रस्टच्या माध्यमातूनही तुम्ही तिथे पोहचू शकाल. मार्गदर्शनसुद्धा तिथं पुष्कळ मिळतं. याचाही तुम्ही जरूर उपयोग करून घ्या.



एक दोन गोष्टी मला फक्त सांगायच्यात, की मी एका छोट्या गॅरेजमध्ये व्यवसाय सुरू केला असल्यामुळे सगळ्या गोष्टींतून गेलेलो आहे. अ‍ॅग्रीकल्चरच्या बाबतीमध्ये तुमच्याकडं वेस्ट प्रॉडक्टस् म्हणजे वेस्टेज खूप असतात. आणि त्याचा आपण उपयोग करून घेतोय किंवा त्याचा विचार करतोय, यासंदर्भात दोन-तीन उदाहरणं मी सांगतो, ज्याचा मी उपयोग करुन घेतलेला आहे. एक काजूचं तेल, त्यासंदर्भात कोकणातल्या एका बागेच्या मुलाशी बोलणं झालं, तर हा फेकून दिलेला प्रोडक्ट आहे. जो अत्यंत व्हॅल्यूबल आहे. त्याचे दीडशे ते दोनशे प्रॉडक्ट तयार करता येतात आणि ते मार्केटमध्ये आंतरराष्ट्रीय दर्जाचे होऊ शकतात हे माहिती म्हणून तुम्ही घ्या. अशी अनेक उत्पादनं आहेत. साधा आपण एक विषय घेतला, की आपल्याकडे शुगर फॅक्टरीज् खूप आहेत. त्याचं जे बगॅस जाळतो त्याची जी अ‍ॅश असते त्याचं अ‍ॅनालिसिस जे सिमेंटच्या बरोबरीचं आहे, त्याच्यापासून बरीच उत्पादनं तयार करता येतात, जी आम्ही केली आणि जगभर एक्स्पोर्ट पण केलीत. त्यामुळं त्याची किंमत कमी आहे आणि त्याच्यात व्हॅल्यू अ‍ॅडिशन केलं की तुम्हाला एखादं मोठं उत्पादन मिळू शकतं.

हा एक दृष्टीकोन तुम्ही जरूर ठेवा, की वेस्ट प्रॉडक्टमधनं तुम्ही व्हॅल्यू अ‍ॅडिशन काय करू शकता का. ती एक मोठी संधी असते. असू शकते ती पण तुम्ही जरूर शोधा. आणखीन एक गोष्ट तुम्हाला सांगायचंय, की बऱ्याच वेळा असं असतं, की आमच्याकडं अमूक नाही, माझ्याकडं पैसे नाहीयेत, माझं नाव अमूक नाही, माझा वशिला नाहीये या तक्रारी तुम्ही सांगता. त्याची काही गरज नाहीये. कारण तुम्हाला चांगलं इंग्लिश बोलता येत नाही हा काय तुमचा दोष नाही. तुम्ही काय इंग्लंडमध्ये जन्मलेला नाहीयेत. येत नाही किंवा माझ्याकडं नाहीये हा काय तुमचा गुन्हा नाही, दोष नाहीये. कारण त्याच्यावर मात करता येऊ शकते. आणि ही जिद्द तुम्ही कायम ठेवा. याची मी मुद्दाम दोन उदाहरणं सांगीन, की जिद्द असल्यानंतर काय होऊ शकतं. त्यातलं एक व्यक्तीमत्व इथं बसलेत स्टेजवर ते म्हणजे शरद पवार. दुसरे आहेत, ते माझे एक मित्र होते छाब्रिया म्हणून, ज्यांना कराचीतनं पुण्यामध्ये यावं लागलं. शिक्षण इयत्ता चौथी. भाषा इथली नाही. शिक्षण नाही, पैसे नाहीत. साधं काम करायचे ते तीस रूपये पगारावरती. या माणसाने भाड्याच्या सायकली घेऊन धंदा सुरू केला, आणि जेव्हा त्यांचं निधन झालं, त्यावेळी ते दहा हजार कोटी रूपयांचे मालक होते. त्यांना मी विचारलं होतं, की तुम्ही हे यश कसं मिळवलं. याच्यामागचं इंगित काय. एका वाक्यात काय सांगाल तुम्ही. त्यांनी माझ्या हृदयाची आग हे एकच भांडवल होतं. बाकी कुठलंही नाही. तुमच्या माझ्या हृदयामध्ये आग असेल तर तुम्ही शरद पवार होऊ शकता, तुम्ही छाब्रिया होऊ शकता, तुम्ही आणखी त्यांच्या पुढं जाऊ शकता. हे ध्यानात ठेवा. त्यामुळं तक्रार करू नका. तुम्हाला चांगलं प्रशिक्षण मिळालेलं आहे. प्रचंड प्रयत्न कराल तर तुम्ही यशस्वी व्हाल. तुम्ही याठिकाणी आलात त्याच्याबद्दल मी तुमचं अभिनंदन करतो. संस्थेनं हा जो प्रयत्नवाद केलाय, हाही मला अत्यंत स्तुत्य वाटतो, त्याच्यातून नवीन उद्योजक घडतील, आणि शेवटची गोष्ट एकटे मोठे होऊ नका, तुमच्या बरोबरच्या लोकांना बरोबर घ्या. हाही संदेश शरद पवारांचा आहे. त्यामुळं सातत्यानं हेही ध्यानात ठेवा, की तुमच्या कल्याणाबरोबर चार लोकांना पुढं कसं आणता येईल हा विचार तुमच्या मनामध्ये ठेवा. तशा प्रकारची वाटचाल चालू ठेवा. या वाटचालीकरता माझ्याकडनं, सकाळकडनं, अ‍ॅग्रो वनकडनं मन:पूर्वक शुभेच्छा! धन्यवाद!! ■■



# स्वप्नपूर्तीसाठी अविरत कष्टाची तयारी ठेवा

**राजेंद्र पवार**

गेल्या २१ दिवसांच्या प्रशिक्षणासाठी मुंबईपासून ते गडचिरोलीपर्यंतचे जवळजवळ ३६ जिल्ह्यातले विद्यार्थी हे इथं स्टार्टअपसाठी, शरद पवार इन्स्पायर फेलोशिपसाठी सहभाग घेतला आहे. पहिल्याच दिवशी आपण सर्वांनी मिळून चर्चा केलेली आहे, यात पवार साहेबांनी तुम्हाला वेळ दिला होता. सुप्रियाताईंनी वेळ दिला होता. यात तुमची स्वप्नं काय आहेत, विचार काय आहे किंवा कुठला विषय घेऊन तुम्हाला पुढं काम करायचंय, यासंदर्भात तुम्ही प्रत्येकानं तुमचं मनोगत सांगितलेलं आहे. आणि त्यानंतर आपण गेले २१ दिवस या सर्व कार्यक्रमाचं आयोजन केलं होतं. आमच्या संपूर्ण टीमनं मनापासून तुम्हाला सहकार्य केलेलं आहे आणि जे जे तज्ज्ञ बोलवले, काही ऑनलाईन होते, काही समोर येऊन सुद्धा त्यांनी लेक्चर दिलेलं आहे. ज्यांना जे जे काय बेस्ट ते तुम्हाला सांगितलेलं आहे.

आज या संस्थेचा जर विचार केला, गेले ३०-३५ वर्षे या संस्थेनं जे काम केलं ते मुलींच्या शिक्षणाच्यासंदर्भात. आपण जर गेल्या ३०-३२ वर्षांचा विचार केला, तर त्यावेळी इथं ग्रामीण भागातल्या मुलींना शिक्षणाची गरज होती. म्हणून ही सर्व व्यवस्था पवार साहेब आणि आपण सर्वांनी त्यावेळी केली होती. इथं होस्टेलचीही त्यावेळी व्यवस्था केली. त्यातून त्या विद्यार्थीनींना काय मिळालं हे जर आपण पाहिलं तर बऱ्याचशा मुली चांगल्या घरात निघून गेल्या. काही हाऊस वाईफ झालेल्या आहेत. काही प्रशासकीय अधिकारी झाल्या आहेत. काही नोकरीला लागलेल्या आहेत आणि त्याचप्रमाणे ॲग्रीकल्चर कॉलेजच्या गेल्या दहा वर्षातील विद्यार्थीसुद्धा काही अधिकारी बनले आहेत आणि काही जण स्वत:चा शेती व्यवसाय पाहण्यात गर्क आहेत. परंतु, खूप असा नावाजलेला उद्योजक कुणी झालेला नाहीये किंवा एखादा शास्त्रज्ञ झालेला नाहीये. त्यामुळे आज जे आपण कार्य करणार आहोत, ते एखादं संशोधन, शास्त्रज्ञ घडवण्याचं काम आणि उद्योजक घडविण्यासाठी आज आपण या कार्यक्रमाची सुरूवात केलेली आहे.

मला एका उद्योजकांची आठवण होते. त्यांनी एक शाळा काढली होती आणि त्या शाळेची फी जवळजवळ एक लाखाच्या दरम्यान होती. मी त्यांना विचारलं, की तुम्ही शाळा काढली, एवढी मोठी फी घेऊन गोरगरीबांचं काम करणार आहे का. त्यांनी मला स्पष्ट सांगितलं, की मला गोरगरीबांसाठी काम नेहमीच्या पद्धतीनं करायचं नाहीये. परंतु, या शाळेत जो कोणी शिकणार आहे, तो दहा हजार लोकांना काम कसं देऊ शकेल आणि उद्योग-व्यवसाय कसा उभा करू शकेल हे मला घडवायचं आहे. म्हणजे उद्योजक एक तयार झाला, तर अनेक लोकांना काम मिळू शकतं आणि मला वाटतं, तुम्ही मंडळीसुद्धा भविष्यात नोकरीच्या पाठीमागं न लागता उद्योगाच्या मागे लागताल आणि अनेक लोकांनी काम देताल अशी मी अपेक्षा व्यक्त करतो.

आज मला एकच सुप्रियाताईंना सांगायचंय, की बऱ्याचवेळा सुप्रियाताईंच्या तोंडी केव्हीके, केव्हीके असतं. तर आता या संस्थेचे दोन-तीन प्रमुख भाग पडलेले आहेत.

एक केव्हीके, कृषीच्या संदर्भात जे काम आहे ते केव्हीके करतं, आणि हा सगळा वेगळा झालेला सेक्टर इनक्युबेशन सेक्टर जो आहे हा सगळा ॲग्रीकल्चर डेव्हलपमेंटचा भाग असला तरी हा इन्क्युबेशन सेंटरचा भाग आहे. कारण मग काही वेळा काम करताना स्वत:हून भाग घेणारे अधिकारी असतील, किंवा स्टार्टअपमध्ये भाग घेणारी सर्व मंडळी असतील, त्यांची आपण पाठ थोपटली पाहिजे. आणि तिसरं जे वेगळं काम होणार आहे, ते सायन्स पार्कच्या संदर्भात होणार आहे. मग ती बारावीपर्यंतची मुलं असतील, एज्युकेशन असेल, ट्रेनिंग असेल किंवा विद्यार्थ्यांना सायन्सकडं नेण्याचं काम असेल ते तिसरं काम आता आपण हळूहळू करणार आहोत. येत्या दोन-तीन महिन्यात ते पूर्ण होईल आणि मला वाटतं, तेही आपल्याला मोठं काम करायचंय. त्यामुळं आता तीन सेक्टर आणि एक एज्युकेशन, रेग्युलर जे आपलं शैक्षणिक काम आहे, असा चौथा भाग, या चारही भागात ही संस्था, आपण काम करणार आहोत. तेव्हा त्या त्या भागातल्या लोकांना त्यांच्या कामाचं क्रेडिट त्यांनी द्यावं. एवढीच माझी विनंती आहे.

आज या सर्व प्रयत्नांतून, विशेषत: हे जे इनक्यूबेशन सेंटर उभं राहिलंय, त्यात संपूर्ण टीमनी प्रचंड मेहनत घेतली होती आणि नीती आयोगाकडून त्यांनी ते मंजूर करून आणलेलं आहे. त्याला पवार साहेबांची खूप मदत झालेली. अजितदादांचीही मदत झाली होती. सुप्रियाताईंची झाली. प्रताप काकांचीही भरपूर मदत झालेली आहे. आणि विशेषत: हे उभं करण्यासाठी सीएसआर फंडसाठी जे उद्योजक आहेत, त्यांचीही मदत झालेली आहे आणि ते सेंटर उभं राहिलेलं आहे. तुम्ही पहिली लोकं आहात, ज्यांनी इथं सहभाग घेतलेला आहे. या सर्व २१ दिवसांत डिजिटल थिंकिंग, प्रोटोटाईम मेकिंग, आर्टिफिशियल इंटेलिजन्स, यूज ऑफ आयओटी सेंटर्स इन ॲग्रीकल्चर, विविध टेक्नॉलॉजी अशी अनेक गोष्टी आपण शिकलात. मघाशी फिल्ममध्ये सांगितलं आहे, की यासाठी आपण नाशिकला गेलात, फलटणमध्ये केबी एक्स्पोर्टमध्ये ऑरगॅनिक औषधं बनवण्याचं खूप चांगलं काम होतं, नियासमला आपण भेट दिली, दुधाच्या बाबतीत इथं प्रक्रिया उद्योग तुम्ही उभारू शकता, नंदनला भेट दिली आणि आपल्या इथल्या ग्रीन हाऊससंदर्भात सुद्धा तुम्ही सर्व टेक्नॉलॉजी समजून घेतलेली आहे.

मला आणखीन एक अभिमान वाटतो, की तिवारी आणि त्यांच्या सर्व टीमनी मिनिस्ट्री ऑफ प्रोसेसिंग, पीएम, एफएमपी स्कीम यासाठी फूड इनक्यूबेशन सेंटर मंजूर करून आणलेलं आहे. आतापर्यंत या संस्थेत जे काम झालं, ते १५ वर्षात भिमथडीच्या रूपात अनेक बचत गटाच्या महिलांना आपण उद्योग उभे करून दिलेले आहेत. किंवा त्यांना मार्केटिंग करून दिलेलं आहे. यात या संस्थेच्या विश्वस्त सुनंदा पवार आणि त्यात सुप्रियाताईंनीसुद्धा मोठं काम केलेलं आहे. परंतु, हे सर्व जे काम आहे, ते काम एका लिमिटपर्यंत चाललं होतं. किंवा भिमथडीसारख्या कार्यक्रमात वर्षातून एकदा एकत्र येत होतो. आणि वर्षभर काही प्रमाणात आपण ट्रेनिंग देत होतो. परंतु, आज या सेंटर ऑफ इनोव्हेशनच्या विद्यमातून अखंड महाराष्ट्र गडचिरोलीपासून सगळ्या भागातल्या, आदिवासी भागात सुद्धा महिलांसाठी आपल्याला काम करता येणार आहे. मार्केटिंगच्या बाबतीत किंवा पॅकेजिंग कसं करायचं याचंसुद्धा आपल्याला मार्गदर्शन यासाठी करून द्यावं लागेल. मला अभिमान वाटतो, की तिवारी आणि त्यांच्या सर्व टीमनी या सर्व गोष्टी खेचून आणलेल्या आहेत आणि भविष्यासाठी सर्व तयार केलेलं आहे.

सतत वेगवेगळे प्रोजेक्ट्स् चाललेले असतात. कारण एका ठिकाणी थांबून चालणार नाही. एवढी मोठी बिल्डिंग या सर्व मंडळींनी आपल्याला याठिकाणी बांधून दिलेली आहे. परंतु, यात सतत काम झालं पाहिजे आणि सतत नवनवीन लोकांसाठी याचा उपयोग झाला पाहिजे. यासाठी हा प्रयत्न राहणार आहे. याचा मूळ उद्देश आहे, की तुम्ही नोकरीमागं पळू नका. कदाचित नोकरीमध्ये तुम्ही तुमच्यापुरतं आणि कुटुंबापुरता मार्ग काढू शकता. तुम्ही डॉ. राजेंद्र जगदाळेंना भेटा. त्यांचंही आपल्याला इथं खूप मोठं सहकार्य लाभलेलं आहे. या वयातही त्यांचा उत्साह ओसंडून वाहत असतो. सतत पॉझिटिव्ह त्यांचे विचार असतात. आपल्याला इथं नेहमी मदत करतात. प्रतापराव पवारसुद्धा सतत कुठेही परदेशात जात असेल तरी त्यांना एखादी गोष्ट या संस्थेसाठी चांगली आहे असं वाटलं किंवा एखाद्या नवीन प्रोजेक्टसाठी ही गोष्ट योग्य आहे, तर ते संस्थेचा विचार करतात. मध्यंतरी ते इंग्लंडला गेले असताना तिथं डॉ. अजित जावकर यांच्याबरोबर ऑक्सफर्ड विद्यापीठाशी त्यांनी करार केलेला आहे आणि या करारातून आणखी आधुनिकतेकडं जाण्याचा मार्ग आपल्याला खुला झालेला आहे. यात विद्या प्रतिष्ठान आणि ॲग्रीकल्चर डेव्हलपमेंट सेंटर यांच्या संयुक्त विद्यमाने आणि ऑक्सफर्ड विद्यापीठ यामुळं आपण हा प्रकल्प विद्या प्रतिष्ठानला उभा करत आहोत आणि त्याचाही उपयोग इंजिनिअरिंग सेक्टरमधल्या मुलांना खूप होईल. बारामती हा ॲग्रीकल्चर असेल, इंजिनिअरिंग असेल किंवा कुठल्याही शिक्षणासाठी एक हब तयार होईल आणि ही ज्ञानाची पंढरी असेल, विज्ञानाचीही पंढरी असेल ही निर्माण होईल असं मला वाटतं. यात अनेक लोकांचा सहभाग आहे.

आता सर्व तयार आहे. मला वाटतं आता तुम्ही तयार व्हायला पाहिजे. यात काही मंडळींनी शेर शायरी वगैरे गोष्टी

सांगितल्या. त्याही आवश्यक आहेत. परंतु, नुसत्या स्वप्नांनी काम होत नसतं. याला प्रचंड कष्ट लागतं आणि त्या कामात आपल्याला झोकून द्यावं लागतं. ही जी सर्व उद्योगपती मंडळी आहेत, ती पुढं आली, कारण मुळात त्यांच्या मागं कुणीना कुणी कष्ट केलेलं आहे. अनेक वर्षे काम केलेलं आहे. काही दोन-दोन, तीन-तीन पिढ्या त्यांनी कामात घालवलेल्या आहेत. एखादा प्रोजेक्ट उभा करत असताना त्यांनी संपूर्ण त्याला आपला वेळ दिलेला आहे. त्यामुळं आज सर्व गोष्टी त्यांना दिसतायंत. पवार साहेब तुम्हाला दिसतायंत. तुम्ही खूप लहान आहात. आम्ही लहान असल्यापासून ६७ सालापासून आम्हाला ते आठवतात. त्यांची आज जी लेवल तुम्हाला दिसत आहे, त्याच्या पाठीमागं प्रचंड कष्ट आहेत. त्यांनी जे प्रोफेशन निवडलं, मग एखादा उद्योग असेल किंवा राजकारण असेल, समाजकारण असेल, अशा कुठल्याही प्रोफेशनला कष्टाशिवाय दुसरा मार्ग नसतो. आणि नुसतं कष्ट करून चालत नाही. त्याला सतत वेळ द्यावा लागतो. हे पवार साहेबांनी ६७ सालापासून केलेलं आहे. मला आठवतंय, ८० सालाच्या दरम्यान जेव्हा त्यांना पक्षबांधणी करायची होती, अख्खा महाराष्ट्र एक-एक महिना गाडीने ते फिरत असायचे आणि अख्ख्या महाराष्ट्रात पहाटे चार-पाच वाजेपर्यंत त्यांच्या सभा चालायच्या. किंवा नंतर सत्तेवर आल्यावर सुद्धा पहाटे तीन-तीन वाजेपर्यंत फाईल चेक करणे, लोकांना भेटणे हे त्यांच्या गरजेचा भाग असतो. लोकांच्या गरजा काय आहेत, लोकांना काय हवं-नको आणि आज याही वयात ते बऱ्याचवेळा गाडीतून फिरत असतात. त्याच्यामागं एकच उद्देश आहे, की लोकं कशी आहेत, भेटणाऱ्या लोकांची मतं काय आहेत किंवा सामान्य लोक आज कुठल्या परिस्थितीत आहेत याचा सतत त्यांचा विचार चालू असतो आणि अखंड प्रयत्न करत राहिलं, अखंडपणे त्याला आपण पूर्ण वेळ दिला तरच या पदाला आपण येऊ शकतो.

इथं प्रतापकाका सुद्धा आहेत. मला आठवतंय, ७० सालाच्या दरम्यान त्यांनी नुकतीच इंडस्ट्रीमध्ये सुरूवात केली होती. त्यावेळी केमिकलची सुरूवात झाली होती. ते स्वत: तिथं जाऊन केमिकल मिक्स करत असायचे हे मी स्वत: पाहिलेलं आहे. त्याचवेळी त्यांची पहिली स्कूटर आली होती आणि त्या स्कूटरवर आम्ही फिरलो होतो. इतक्या सामान्य गोष्टीतून आज ते या लेवलला पोहोचले आहेत. त्याच्यामागं ४०-५० वर्षांचे त्यांचे अखंड कष्ट आहेत.

याचबरोबर अजितदादांच्या बाबतीतसुद्धा आपण बघितलं, तर आत्ताच्या अधिकारी मंडळींना जर विचारलं किंवा तुम्ही कधी बघितलं शनिवारी किंवा रविवारी, तर पहाटे पाच वाजता त्यांचं काम सुरू होतं. म्हणजे त्यांचा जो विषय, तो विषय त्यांना लोकांच्या उपयोगासाठी ते पहाटे पाच वाजता उठून कुठल्याही कामाकडे स्वत: जातीने लक्ष देत असतात आणि दिवसभर लोकांना वेळ देत असतात. आणि उरलेला आठवडा ते मंत्रालयात असतात किंवा इतर कामांत असतात. सकाळी पाच, सहाला यांचे दिवस सुरू होतात.

रोहितच्या बाबतीत कदाचित मी वडील असल्यामुळे बोलणं उचित नसेल, परंतु, आज तुम्हा तरूणांना कदाचित आकर्षण असेल, परंतु, एक लक्षात ठेवा, त्यानं जेव्हा सुरूवात केली होती आणि शुगर फॅक्टरीचा मेन बेस जो आहे तो कामगारांचा आहे, तर तो आष्टी-पाटोदा असेल किंवा जामखेड असेल या सगळ्या भागात मुकादमांच्या समोर जाऊन अगदी त्यांच्या डायऱ्या बघण्यापासून त्यानी ते समजून घेतलं. इतक्या छोट्या छोट्या गोष्टीतून सुद्धा त्याने कामं समजून घेतली आणि नंतर त्याच तालुक्याचा तो आमदार झालेला आहे. दहा वर्षे त्यानी प्रत्येक गोष्ट समजून घेतली आणि त्यामुळं उद्योजक म्हणून त्याला स्वत:ला पुढं येता आलं.

तेच सुप्रियाताईंच्या बाबतीतसुद्धा त्यांच्या मतदारसंघात फिरताना आपल्याला जाणवतं, की एकही गाव त्यांनी सोडलेलं नाही. तुम्हाला ही सर्व मंडळी मोठी दिसतात. परंतु, यात कष्ट आहेत, जिद्द आहे, आपल्या प्रोफेशनला वेळ देणं आहे आणि त्यातल्या अडीअडचणींना सामोरं जाणं महत्त्वाचं असतं आणि तुम्ही हे करावं अशी भविष्यातली अपेक्षा आहे.

माझ्याबाबतीत जर सांगायचं म्हटलं तर मी अमेरिका, म्हणजे अमेरिका हे खूप मोठं नाव असल तरी मी खूप मोठी डिग्री मिळवलेली नाही. असोसिएट डिग्री आणि त्यात वर्क अँड स्टडी, जेव्हा मी परदेशात गेलो, जाताना मला माझ्या काकांनी सांगितलं होतं, की तू कष्टानं मरणार नाहीस. कष्ट करत राहा आणि तोच एक अमेरिकेतला उपयोग मला आयुष्यभर उपयुक्त ठरला. तिथं जाताना ५०० डॉलर दिले होते. त्यावेळी साडेसात रूपये डॉलर होता. म्हणजे त्याची किंमत जर केली तर मला वाटत नाही ती साडेतीन हजाराच्या पुढे जात असेल. परंतु, तिथं प्रतापकाकांची आणि बापूसाहेब म्हणून आमचे दुसरे काका, की ज्यांनी इंडस्ट्रीला सुरूवात केली, त्यांचे काही मित्र होते त्याच्यामुळे या सर्व गोष्टी जमल्या आणि शेवट परत येताना मला आठवतंय, की पवार साहेब तिथं आले होते आणि मला काही गोष्टी घ्यायच्या होत्या. माझ्याकडे पैसे राहिले नव्हते. त्यांनी हजार डॉलर डेअरीच्या व्यवसायासाठी मशिनरी घेण्यासाठी म्हणून दिले होते. आल्यानंतर सुरूवातीला शेतीच केली. पूर्ण पंधरा वर्षे शेती करत होतो. म्हणजे लेबरमागं उभं राहणं एवढंच काम केलं. जरी त्यावेळी लेबरमागं उभा राहिलो असेन. परंतु, शेतीतले बारकावे मला आज कळतायंत. आज शंभर एकरात जी वेगवेगळी पिकं घेतलेली असतात, कधीही

मी खाली उतरून बघत नाही. गाडीतनं सुद्धा मला समजतं, की कुठं औषध कमी, कुठं औषध बसलेलं नाही, कुठं काय केलं पाहिजे आणि त्यासाठी त्यावेळी दिलेला जो वेळ आहे त्याचा उपयोग मला इथं शंभर एकरावर प्रदर्शन करताना झालेला आहे.

लेबरच्या बाबतीत, मी गडीमाणसांतसुद्धा होतो. मी हे सांगण्याचं कारण काय, तर उद्या माणसांशिवाय तुम्हाला उद्योग करता येणार नाही. शेवटी सायकॉलॉजी आणि माणूस हे उद्योगधंद्यातलं सगळ्यात मोठं काम आहे. साधा गडीसुद्धा, तो चालत कसा येतो, तो आपल्याला उचल मागणार आहे का, उद्या सुट्टी घेणार आहे का काम सोडून जाणार आहे हे त्याच्या चालीवरनं आपल्याला कळतं. हे शिकायला मला त्यावेळी मिळालं. त्यामुळं मला नंतरच्या काळात कुठंही लोकांच्यात वावरत असताना सुद्धा समजतंय की कसं असलं पाहिजे. यानंतर एकच सांगतो, की आपल्याला खरा सल्ला देणारे किंवा आपल्याबरोबर फक्त आई-वडील असतात. परंतु, आई



उंबऱ्यापर्यंत किंवा अंगणापर्यंत पुढे येते, वडिलांचे अनुभव फार फार तर गावाच्या कोपऱ्यापर्यंत किंवा व्यवहारातले अनुभव तुम्हाला समजू शकतात, बाकी सर्व धंदा करत असताना आपण एकटे असतो आणि पुढचा अथांग जो व्यवहार आहे हा फक्त आपल्यालाच करावा लागतो. यात मला वाटतं, कुठंही गुरू कुणी नसतं आणि कुणालाही फारसे सल्ले विचारू नका.

इथं तुम्ही बघितलं असेल, की इथं गौतम बुद्धांची प्रतिमा मी मुद्दाम बसवलेली आहे. बरेच जण म्हणतात, की इथं गौतम बुद्धांचा काय संबंध. परंतु, एक लक्षात घ्या, की आपल्या भारत वर्षामध्ये गण होते, त्या गणातल्या एका गणातले गौतम बुद्धांचे वडील हे राजा होते आणि त्यांचा हा मुलगा युवराज होता. गौतम बुद्ध ही एकच व्यक्ती आणि तिथं जो पुतळा आहे तो सिद्धार्थचा आहे, म्हणजे बौद्धत्व प्राप्त व्हायच्या आधीचा आहे आणि त्यांनी त्यावेळी सांगितलं, की आप्तो दिपो भव:, म्हणजे स्वत:चे स्वत: प्रज्वलित व्हा. उद्देश असा आहे, की या परिसरात तुम्ही या, पाहा, शिका आणि परत जाताना तुमचं तुम्हाला प्रज्वलित व्हायचं आहे आणि पुढचं आयुष्य मार्गक्रमण करायचंय हे लक्षात घ्या. त्यामुळं मी सतत दोन गोष्टी कायम लक्षात ठेवतो. एक आप्तो दिपो भव: आणि दुसरं सजग असणं. मग बुद्ध वाङ:मय असेल किंवा विपश्यना असेल यात सजग हा शब्द सतत आलेला आहे. हा थोडा सावधानतेच्या जवळ जाणारा आहे, पण पूर्ण सावधानता नाहीये. व्यवहार करताना आपण सतत सजग पाहिजे. समोरचा माणूस आपल्यावर कुठली चाल करणार आहे. आपला पुढचा कॉम्पिटीटर काय करणार आहे. बँकेत जाताना आपल्याला कर्ज झेपलं जाणार आहे का, अशा प्रत्येक गोष्टीत आपण सजग असलं पाहिजे तरच आपल्याला जगता येतं हे लक्षात ठेवूया, नाहीतर आपल्याला व्यवसायही करता येत नाही आणि कुठलीही गोष्ट करता येणार नाही. आणखी एक सल्ला तुम्हाला देतो, तो म्हणजे कुणालाही तुम्ही सल्ले विचारायला जाऊ नका. कारण सल्ले देणारे खूप मोठी मोठी माणसं असतात आणि त्यांचं उठणं-बसणं खूप मोठ्या लोकांच्यात असतं, त्यामानाने आपण सुरूवात केलेली असते. त्यामुळं आपल्याला त्या लेवलचे सल्ले मिळत नाहीत. त्यांच्या दृष्टीनं आपण खूप लहान असतो. त्यामुळं शेवटी आपल्याला काय जमणार आहे, आपल्यात प्लस काय, मायनस काय आहेत, परिसराची स्थिती समजूनच आपण मार्ग काढला पाहिजे.

मला शेवटचं एकच सांगायचंय, की तुमचा शेतीच्या संदर्भातला स्टार्टअप आहे. इथं कर्जमाफी असेल, सवलती असतील, सबसिडी असेल, हे टेकू शेतीला तेवढे पुरणार नाहीत. भविष्यात शेती तरणार नाही. त्यासाठी आपल्याला नवीन आव्हानांना सामोरं जावंच लागणार आहे. कारण, भविष्यात तुम्हाला दीडशे कोटी जनता जगवून जे इंधन तयार करायचंय, त्यानंतर तरूणांच्या बाबतीत बदलत्या सवयी आहेत त्याचा आपण अभ्यास करा. याचबरोबर लोकांचं राहणीमान बदलत चाललंय, विभक्त कुटुंबं होत चालली आहेत. मग त्यासाठी काय लागणार आहे, त्यांना व्यवसाय कुठले पाहिजेत यासंदर्भात आपण विचार करा. आम्ही आता मावळतीला लागलेलो आहोत, तुम्ही सगळे उगवतीला लागलेले नवचैतन्य आहात. आमच्यासारख्यांनी दोन पावलं मागं आलं तरच तुमच्यासारख्या नवतरूणांना संधी दिली जाईल आणि ती संधी तुम्ही स्वत: हिसकावून घेतली पाहिजे असं मला वाटतं. तुम्हा सगळ्यांना शुभेच्छा देतो आणि माझे दोन शब्द संपवतो.

■■




राज्यघटनेने भारतासाठी संघराज्य प्रणाली स्वीकारलेली असूनही त्या मूलभूत तत्वाला छेद देऊन राज्यांच्या अधिकारांवर आक्रमण करणे, केंद्र सरकारच्या हाती अधिकाधिक सत्ता व अधिकार एकवटण्याचे वाढते प्रयत्न आणि अंतिमतः केंद्रीकरणाची व्याप्ती वाढवत भारतात एक केंद्रित आणि सर्वंकष राज्यव्यवस्था निर्माण करण्याच्या दिशेने वाटचाल सुरु झालेली आहे काय अशी शंका येऊ लागली आहे. दिल्लीत म्हणजेच सध्या सत्तेत असलेल्या राज्यकर्त्यांनी योजनाबध्द व पध्दतशीरपणे केंद्रीकरणाची व्याप्ती वाढविण्याचा प्रकार सुरु केला आहे. त्याला आता राज्यांकडून विरोध सुरु झाला आहे. अगदी केंद्रीय सत्तेला अनुकूल असलेल्या तेलंगणा राष्ट्रसमिती आणि ओडीशामधील बिजु जनता दलासारख्या पक्षांनी देखील या वाढत्या केंद्रीकरणाच्या विरोधात आवाज उठविला आहे. यावरुनच आता या विषयाचे गांभीर्य वाढले आहे हे निर्विवादपणे स्पष्ट होऊ लागले आहे. यासंदर्भात संघराज्य पध्दती, उदारमतवादी लोकशाही संसदीय व्यवस्था यावर विश्वास असणाऱ्या राजकीय शक्तींना केवळ सजग आणि जागरूक राहून चालणार नाही तर केंद्र सरकारचे हे केंद्रीकरणाचे प्रयत्न हाणून पाडण्यासाठी एकत्रित येण्याची वेळ आलेली आहे. राज्यांची एकजूटच या देशातील संघराज्य




वर्तमान दिल्लीपतींच्या राज्यकारभाराचे सर्व सत्तेचे केंद्रीकरण करण्याचे मूलभूत सूत्र यातून स्पष्ट होते. हे राज्यघटनेच्या मूलभूत तत्वांशी केवळ विसंगत नसून त्यांच्या विरोधात जाणारे आणि त्यांचे अस्तित्व नष्ट करणारे आहे. म्हणूनच राज्यकारभाराचा हा बदलता प्रकार देशाच्या मुळावर येणारा आहे. यासाठी राज्यघटनेशी प्रामाणिक बांधिलकी मानणाऱ्या सर्वच राष्ट्रीय व प्रादेशिक राजकीय पक्षांना एकत्र येऊन कृति करावी लागेल.

# वाढते केंद्रीकरण

## केंद्र व राज्यांमध्ये वाढता तणाव

वसीम अहमद

पध्दती टिकविण्यासाठी साह्यभूत होऊ शकेल.

संसदेचे अधिवेशन सुरु झाले. या वर्षातील हे पहिले अधिवेशन असल्याने राष्ट्रपतींच्या अभिभाषणाने त्याचा प्रारंभ झाला. यानंतर प्रथेप्रमाणे या अभिभाषणाबद्दल राष्ट्रपतींना धन्यवाद देणाऱ्या प्रस्तावावर चर्चा सुरु झाली. राज्यसभेत यानिमित्ताने बोलताना तेलंगणा राष्ट्र समितीचे सदस्य के. केशव राव आणि बिजु जनता दलाचे शश्मित पात्रा यांनी मोदी सरकारवर एकतर्फी निर्णय करुन संघराज्य




प्रणाली नष्ट करीत असल्याची टीका करतानाच भाजपची सरकारे असलेल्या राज्यांना पूर्णपणे झुकते माप देत असल्याचा आरोप केला. हे दोन्ही पक्ष सर्वसाधारणपणे मोदी सरकारबरोबर मित्रत्वाचे संबंध राखून असलेले पक्ष म्हणून ओळखले जातात. परंतु त्यांच्याकडून झालेली ही टीका अनपेक्षित आणि चकित करणारी होती. या पक्षांप्रमाणेच तृणमूल काँग्रेस व इतर पक्षांनी देखील मोदी सरकारच्या या भेदभावाच्या नीतीचा खरपूस





समाचार घेतला.

बिजु जनता दलाचे सदस्य शश्मित पात्रा यांनी राष्ट्रपतींच्या अभिभाषणात संघराज्य पध्दतीबद्दल साधा उल्लेख देखील नाही. त्यांच्या भाषणात हा शब्द शोधण्याचा आपण खूप प्रयत्न केला परंतु कुठेही हा शब्द सापडला नाही असे त्यांनी उपरोधिकपणे म्हटले. ते पुढे म्हणाले की राज्यघटनेत समाविष्ट असलेल्या समानता आणि संघराज्यवाद या संकल्पना मोडीत काढल्या जात आहेत. राज्यघटना निर्माते डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी समता, स्वातंत्र्य आणि बंधुभाव या तत्वांबद्दल मांडलेल्या विचारांचा संदर्भ देऊन ते म्हणाले की प्रत्येक राज्याला समान पध्दतीची म्हणजेच भेदभावविरहित वागणूक मिळणे आवश्यक आहे. परंतु प्रत्यक्षात असे घडत आहे काय असा प्रश्न त्यांनी केला.

ओडीशाचे मुख्यमंत्री नवीन पटनाईक यांनी प्रधानमंत्री ग्रामीण आवास योजना या घरांच्या योजनेसंदर्भात परवानगी मागण्यासाठी तीन पत्रे लिहिली आणि २०१९ पासून ते त्यासाठी

पाठपुरावा करीत आहेत. सर्व काही डिजिटल असल्याने परवानगी देखील डिजिटल पध्दतीने मिळेल असे सांगण्यात आले. परंतु अद्याप या योजनेला परवानगी मिळालेली नाही. संबंधित योजनेचे पोर्टलच गेली तीन वर्षे बंद अवस्थेत असल्याचे उघडकीस आले. या योजनेखाली प्रामुख्याने गरीब आणि वंचित व अनुसूचित जातींच्या लोकांसाठी सहा लाख घरे बांधण्याची योजना ओडीशा सरकारने तयार केली होती. मात्र अजुनही ती परवानगी अभावी सुरु होऊ शकलेली नाही. मात्र भाजपचे सरकार असलेल्या कर्नाटक राज्याने याच पोर्टलकडे अर्ज करुन परवानगी मागितली आणि जानेवारीत ते पोर्टल सुरु झाल्याची माहिती आम्हाला मिळाली असा गौप्यस्फोट करुन पात्रा म्हणाले की ओडीशातल्या सहा-साडेसहा लाख गरीब लोकांनी कोणता गुन्हा केला होता की त्यांच्यासाठी हे पोर्टल सुरु होऊ शकले नाही. त्यांचा गुन्हा एवढाच होता की




ते भाजपचे सरकार असलेल्या राज्याचे रहिवासी नाहीत असा घणाघात पात्रा यांनी केला.

केशव राव यांनी मोदी सरकारतर्फे राज्यांना विश्वासात न घेता परस्पर राज्यांच्या विषयांबाबत एकतर्फी कायदे करणे किंवा इतर महत्वाचे निर्णय करण्याच्या प्रकाराचा समाचार घेतला. सरकारच्या या 'हम करे सो कायदा' प्रवृत्तीचे सर्वात मोठे उदाहरण आहे असे त्यांनी सांगितले. कृषि कायदे हे राज्यांना विश्वासात न घेता, त्यांच्याशी पुरेशी सल्लामसलत न करता एकतर्फीपणे केंद्राने मंजूर केले. त्यानंतर ते तशाच एकतर्फीपणे मागेही घेतले. केंद्र सरकार केवळ मनमानीपणे कारभार करीत आहे. मोदी सरकारच्या काळात राज्यघटनेची मूलभूत चौकट, धर्मनिरपेक्षता, केंद्र-राज्य संबंध-संघराज्य प्रणाली, राज्यांचे विषय या सर्वांना धोका निर्माण झाला आहे असा गंभीर आरोपही केशव राव यांनी केला. काँग्रेसचे दिग्विजयसिंग यांनी मोदी सरकारच्या एकतर्फी कारभाराचे मोठे उदाहरण म्हणून २९ कामगारविषयक कायदे हे एकाच कायदेसंहितेत समाविष्ट करताना कामगार संघटनांशी सल्लामसलत केली नसल्याचे सांगितले. तृणमूल काँग्रेसचे जवाहर सरकार यांनी ईडी(एन्फोर्समेंट डायरेक्टोरेट) आणि सीबीआय व इतर राष्ट्रीय तपास संस्थांचा वापर केवळ राजकीय सूड घेण्यासाठी केला जात असल्याचा आरोप केला. ही प्रातिनिधिक भाषणे आहेत. यातून निघणारा अर्थ समान आहे. वर्तमान दिल्लीपतींच्या राज्यकारभाराचे सर्व सत्तेचे केंद्रीकरण करण्याचे मूलभूत सूत्र यातून स्पष्ट होते. हे राज्यघटनेच्या मूलभूत तत्वांशी केवळ विसंगत नसून त्यांच्या विरोधात जाणारे आणि त्यांचे अस्तित्व नष्ट करणारे आहे. म्हणूनच राज्यकारभाराचा हा बदलता प्रकार देशाच्या मुळावर येणारा आहे. यासाठी राज्यघटनेशी प्रामाणिक बांधिलकी मानणाऱ्या सर्वच राष्ट्रीय व प्रादेशिक राजकीय पक्षांना एकत्र येऊन कृति करावी लागेल.

२०१४ मध्ये सत्तेत आल्यानंतर आपल्या सरकारच्या कामकाजाचे नेहमीच्याच नाट्यमय शैलीत वर्णन करताना चमकदार शब्दांचा वापर करण्यात आला होता. 'मिनिमम गव्हर्नमेंट, मॅक्झिमम गव्हर्नन्स'! याचा शब्दशः अर्थ 'किमान सरकार, कमाल राज्यकारभार!' परंतु याचा खरा अर्थ हा होता की सरकारचा कमीतकमी हस्तक्षेप आणि दडपणविरहित सुरळीत व व्यापक राज्यकारभार! म्हणजेच केंद्र सरकारचा सर्वच राज्यकारभारात कमीतकमी हस्तक्षेप व ढवळाढवळ राहील असे चित्र उभे करण्यात आले. याचाच अर्थ राज्यांचे अधिकार देखील कायम राखणे हा होतो. म्हणूनच जेव्हा अशा लंब्याचौड्या बाता मारल्यानंतर राज्यकर्त्यांचे प्रत्यक्ष आचरण व वर्तन त्या बातांशी विसंगत असेल तर प्रश्न उपस्थित होत राहणार. तसेच राज्यकर्त्यांच्या प्रत्येक हेतुबद्दल शंका निर्माण होतच राहणार. जीएसटी करप्रणालीची सदोष अंमलबजावणी ही देखील राज्यांना अडचणीची झाली आहे. राज्यांच्या साधनसंपत्तीवर त्याचा आघात झाला आहे. राज्यांना

महसुलासाठी म्हणजेच साधनसंपत्तीसाठी केंद्रावर अवलंबुन राहण्याची पाळी आली आहे. जीएसटी करप्रणाली लागू करण्यात राज्यांना जे आर्थिक नुकसान झाले त्याची भरपाई केंद्राकडून वेळेवर करण्यात न आल्याने राज्ये कर्जबाजारी झाली आहेत. जीएसटीद्वारे मिळणाऱ्या महसुलाचे राज्यांना वाटप करण्याऐवजी त्याची रक्कम केंद्र सरकारने अवैध रीतीने २०२०मध्ये स्वतःच वापरले असा ठपका सीएजीने ठेवलेला होता. थोडक्यात राज्यांना पैशासाठी केंद्राचे परावलंबित्व स्वीकारावे लागले. खरंतर मांडलिकत्व हा शब्द अधिक योग्य ठरेल. याखेरीज राष्ट्रीय तपास संस्था(एनआयए) व इतरही केंद्रीय संस्थांच्या माध्यमातून राज्यांच्या अधिकारांवर आक्रमण चालू आहे. दोन महिन्यांपूर्वीच अंगात आल्याप्रमाणे केंद्र सरकारने सीमावर्ती राज्यांमधील सीमा सुरक्षा दलाच्या अधिकारक्षेत्रात वाढ केली. पंजाब आणि पश्चिम बंगालच्या सीमांवर सीमा सुरक्षा दल तैनात आहे. त्यांना केवळ सीमेच्या परिसरात एका विशिष्ट अंतरात त्यांना गस्तीचे तसेच त्या मर्यादित क्षेत्रातील कायदा व सुव्यवस्थेवर लक्ष ठेवण्याचे अधिकार दिलेले असतात. साधारणपणे सीमेच्या आत पंधरा ते पंचवीस किलोमीटरचे क्षेत्र त्यांच्या अधिकारात असते. केंद्रीय गृह मंत्रालयाने तीन-चार महिन्यांपूर्वी अचानक त्यात पन्नास किलोमीटरपर्यंत वाढ केली. आता पंजाबसारख्या राज्यात पन्नास किलोमीटरच्या हिशोबाने क्षेत्र काढायचे ठरविल्यास जवळपास ९० टक्के पंजाबमधील कायदा व सुव्यवस्था सीमा सुरक्षा दलाच्या म्हणजेच थेट केंद्र सरकार किंवा केंद्रीय गृहमंत्रालयाच्या ताब्यात गेल्यासारखे होते. अशा पध्दतीने राज्यांच्या अधिकारांवर बिनदिक्कतपणे आक्रमण करण्याचे प्रकार कसे सुरु आहेत त्याची ही उदाहरणे आहेत.

आता अगदी ताजी उदाहरणे पाहू. केंद्र सरकारने पर्यावरण




आणि भारतीय प्रशासकीय सेवा(आयएएस) यासंदर्भात काढलेले फतवे पाहता केंद्र सरकार आता प्रशासकीय पातळीवर देखील अधिकारांचे केंद्रीकरण करु पहात असल्याचे स्पष्ट होते. केंद्राच्या कार्मिक सेवा व प्रशिक्षण मंत्रालयातर्फे नुकताच एक आदेश राज्यांना जारी करण्यात आला आहे. यामध्ये राज्यांमधील प्रशासकीय अधिकाऱ्यांना(आयएएस) राज्यांच्या संमतीखेरीज केंद्र सरकारकडे प्रतिनियुक्ति किंवा डेप्युटेशनवर पाठविण्यासंबंधीचे अधिकार केंद्र सरकारने स्वतःकडे घेतले आहे. यापूर्वी राज्यांच्या परवानगीने आणि सोयीने प्रतिनियुक्त्या केल्या जात असत. आता राज्यांना विचारणा करण्याची पूर्वअट काढून टाकण्यात आली आहे. हा सरळसरळ राज्यांच्या अधिकारांचा भंग तर आहेच पण अधिक्षेपही आहे. आणखी एक असाच मनमानी फतवा केंद्र सरकारने काढला आहे. यामध्ये राज्यांना पर्यावरणाच्या



संदर्भात 'स्टार रेटिंग' देण्याची टूम काढण्यात आली आहे. केंद्र सरकारची पक्षपाती व भेदभावाची प्रवृत्ती लक्षात घेता ते केवळ भाजपची सरकारे असलेल्या राज्यांना चांगले रेटिंग देऊन इतर राज्यांबाबत सावत्रपणाची भूमिका घेणे अगदी सहज शक्य आहे. या रेटिंगमुळे राज्यांच्या गुंतवणूक आकर्षित करण्याच्या क्षमतेवर परिणाम होऊ शकतो. याचे कारण अलीकडच्या काळात कोणतीही नवी गुंतवणूक करताना म्हणजेच एखाद्या राज्यात एखादा प्रकल्प उभारण्याच्या संदर्भात तेथील पर्यावरण विषयक परिस्थितीचाही आढावा घेतला जात असतो. त्या मूल्यमापनाच्या आधारावर संबंधित राज्यात नवीन कारखाने किंवा प्रकल्प सुरु करायचे किंवा नाहीत याचा निर्णय केला जात असतो. यामध्ये केंद्र सरकारने एखाद्या राज्याला

पर्यावरणाबाबत निकृष्ट दर्जा दिल्यास त्या राज्यात होऊ पाहणाऱ्या गुंतवणुकीवर प्रतिकूल परिणाम होऊ शकतो. या दोन्ही मुद्यांवर जवळपास सर्व बिगर-भाजप सरकारे असलेल्या राज्यांनी तीव्र हरकत घेतली आहे. राज्यांचे अधिकार हळूहळू मर्यादित करण्याचा हा प्रकार आहे. प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या संदर्भातील आदेश तर अजिबात अमान्य असल्याचे या सर्व राज्यांनी केंद्राला कळविले आहे. या मुद्यावर ही सर्व राज्ये एकत्र आली आहेत. ज्याप्रमाणे केंद्र सरकारच्या अधिकारात येणाऱ्या विविध तपाससंस्थांच्या प्रमुखांचे सेवाकाळ पाच वर्षांनी वाढविण्याचे अधिकार सरकारने स्वतःकडे घेतले आहेत तसाच हा प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या संदर्भातील फतवा आहे. केंद्र सरकारला पाहिजे त्या अधिकाऱ्यास मनाला येईल त्याप्रमाणे केंद्राच्या सेवेत घेणे याचा अर्थ राज्यांच्या प्रशासकीय स्वायत्ततेचा तो संकोच ठरेल. राज्यांना प्रशासनाचा





गाडा चालविणेच अवघड होऊन बसणार आहे. सध्याच्या राज्यकर्त्यांची खुनशी वृत्ती लक्षात घेता त्यांची ही स्वतःकडे अधिकार घेण्याची प्रवृत्ती धोकादायक ठरु शकते.

केंद्र सरकारच्या हाती सत्ता व अधिकार एकवटण्याची ही प्रक्रिया २०१४ पासून सुरु करण्यात आली आहे. त्याची सुरुवात योजना आयोगाचे अस्तित्व नष्ट करु करण्यात आली. योजना आयोग ही संस्था संघराज्य प्रणालीतील प्रमुख संस्था होती. ज्या राज्यांना एखादा मोठा प्रकल्प हाती घ्यायचा असेल ती राज्ये संबंधित प्रकल्पाचा प्रस्ताव प्रथम योजना आयोगाकडे पाठवीत असत. योजना आयोगाच्या छाननीनंतर आणि त्यांच्या काही सूचना असतील तर त्या आधारे योग्य ते बदल करुन तो प्रस्ताव केंद्र सरकारकडे जात असे. त्यानंतर केंद्र सरकार म्हणजेच केंद्रीय मंत्रिमंडळ त्याचा विचार करुन मग त्याला मंजुरी दिली जात असे. ढोबळमानाने ही प्रक्रिया अवलंबिल्याने थोडा वेळेचा अपव्यय झाला तरी वाद टाळले जात आणि प्रकल्प मार्गी लागण्यात सुलभता येत असे. आता हे सर्व अधिकार पंतप्रधान कार्यालयात एकवटण्यात आले आहेत. म्हणजेच राज्यांनी पंतप्रधान व त्यांचे कार्यालय यांच्यापुढे गुडघे टेकून प्रकल्पांचा प्रस्ताव करायचे.

थोडक्यात पंतप्रधान व त्यांच्या कार्यालयाच्या मेहेरबानीवर राज्ये अवलंबुन राहू लागली. यानंतर टप्प्याटप्प्याने केंद्र सरकारने राज्यांचे अधिकार संकुचित करण्यास सुरुवात केली. यामुळे राज्यांच्या स्वायत्ततेला ग्रहण लागले. त्याची उदाहरणे व दाखले वर दिलेलेच आहेत. आता लोकसभेत बहुमत असल्याने राज्यकर्त्यांनी त्यांना पाहिजे तसे अधिकार हाती घेण्याचे सत्र आरंभिले आहे. संसदीय लोकशाहीच्या ऱ्हासाची ही प्रक्रिया आहेच परंतु देशाची वाटचाल आता सर्वंकष राज्यव्यवस्थेच्या दिशेने सुरु आहे हे स्पष्ट दिसते. याचा विरोध राज्यांना करावा लागेल व त्यासाठी वैचारिक एकजूट करावी लागेल. अन्यथा येत्या काही वर्षातच राज्ये ही केंद्र सरकारची दास झाल्याचे चित्र निर्माण झाल्याखेरीज राहणार नाही!

■■

**नानांचे स्मरण :** फेब्रुवारी महिना महाराष्ट्र, भारत, जग यांच्या दृष्टीने फार महत्त्वाचा आहे. छत्रपती शिवाजी महाराजांमुळे फेब्रुवारी महिना अजरामर झाला आहे. याच महिन्यात महाराष्ट्राच्या आणखी एका शिल्पकाराचे कृतज्ञ स्मरण करणे आवश्यक आहे. ते म्हणजे नाना शंकरशेठ. या महिन्यात त्यांना ही शब्दसुमनांजली.



## आधुनिक मुंबईचे जनक

# जगन्नाथ शंकरशेठ मुर्कुटे

प्रा. डॉ. गणेश राऊत

**चरित्र :** जगन्नाथ शंकरशेठ मुर्कुटे यांचे घराणे मूळचे ठाणे जिल्ह्यातील मुरबाड गावचे. त्यांच्या घरचा पिढिजात व्यवसाय म्हणजे पोतदारी, व्यापार करणे हा होय. सुवर्णमुद्रा, गावकीतल्या महसुलाचे परीक्षण, मोती-रत्ने, चहा-साखर, लवंग आणि मसाल्याच्या पदार्थांचा व्यापार ते करीत असत. शंकरशेठजी आणि भवानीबाई यांच्या पोटी १० फेब्रुवारी,



१८०३ (महाशिवरात्र) या दिवशी जगन्नाथ यांचा जन्म झाला.

**वाटचाल :** शंकरशेठ हे अत्यंत श्रीमंत व्यापारी होते. ते इंग्रजांना अर्थपुरवठा करायचे. जगन्नाथ शंकरशेठ यांच्या चरित्रकार अमला नेवाळकर यांनी त्यांच्या संपत्तीची माहिती पुढीलप्रमाणे दिली आहे - १७९५-१८०० या ५-६ वर्षांत शंकरशेठजींची संपत्ती < १६ लक्ष रोकड व दीड-दोन लाखांचे जड-जवाहीर इतकी होती. आपल्या अफाट संपत्तीचा वारस असणाऱ्या जगन्नाथच्या जडणघडणीकडे वडिलांनी बारकाईने लक्ष दिले. मुलाचे शिक्षण, मुलाचे मित्र या संदर्भात ते दक्ष होते. भारतीय आणि इंग्रज शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी विविध भाषांमध्ये पारंगतता प्राप्त केली. पुढे वयाच्या १७-१८ व्या वर्षी जगन्नाथ उर्फ नाना यांचा विवाह जमनाबाई यांच्याशी झाला.




**जस्टिस ऑफ द पीस (जे.पी.) :** जे. पी. ही व्यवस्था म्हणजे समाजातील काही प्रतिष्ठित व्यक्तींनी शहरातील नागरी समस्यांसंबंधी (आरोग्य, स्वच्छता, शहर विकास सूचना आणि खटल्यांमध्ये) पंच म्हणून काम करणे अपेक्षित होते. युरोपियन न्यायाधीश आणि युरोपियन पंच खटल्यांमध्ये भारतीय पंच म्हणून काम करणे अपेक्षित होते. युरोपियन न्यायाधीश आणि युरोपियन पंच खटल्यांमध्ये पक्षपात करीत असत. हा पक्षपात वर्णश्रेष्ठत्व आणि अज्ञान या दोन्हींमुळे होत असे. त्याला आळा घालण्यासाठी नानांनी एक अर्ज तयार करून ब्रिटिश पार्लमेंटमध्ये या संदर्भातील बिल मांडण्याचे प्रयत्न केले. यास यश येऊन भारतात जे पहिले १३ जे.पी. नेमले गेले त्यात नाना हे पहिले हिंदुस्थानी 'जे.पी.' होत. जे. पी. म्हणून कार्य करताना नानांनी भिवंडीतील विठ्ठल मंदिर प्रकरण, पंढरपूर देवदर्शन प्रश्न, गुजरातमधील श्रीद्वारकाधीश मंदिर यांच्या संदर्भातील प्रश्न यशस्वीपणे सोडविले. मुंबईत सन १८५१ मध्ये धार्मिक कारणांवरून दंगल उसळली असता नानांनी मोहल्ला (गल्ली) कमिट्यांची शिफारस केली व शांतता प्रस्थापनेचे प्रयत्न केले.

सामाजिक कार्य : मंदिरे बांधणे, बागा उभारणे, रस्ते बांधणे, धर्मशाळा उभारणे इत्यादी कामे नानांनी मनापासून



केली. पुणे शहरातील स्वतःच्या बंगल्यापासून ते पर्वती मंदिरापर्यंत रस्ता बांधणे, पुणे रेल्वे स्टेशनजवळील धर्मशाळेत घड्याळ बसविण्यासाठी तीन हजार रुपये खर्च करणे, १८५५ च्या क्रिमियन युद्धातील दिवंगत सैनिकांच्या कुटुंबीयांना मदत फंड, १८६१ चा वायव्य सरहद्द प्रांतातील दुष्काळप्रसंगी मदत, सन १८६२ मध्ये लँकेशायरच्या गिरणी कामगारांवरील संकट, सन १८६३ मध्ये मद्रास विणकर कामगारांस मदत, १८६४ कलकत्ता वादळप्रसंगी मदत, १८६४ गुजरातमध्ये धान्यटंचाई प्रसंगी नानांनी व्यक्तिगत मदत आणि सामूहिक मदत उभारली. असे कार्यरत असतानाच ३१ जुलै, १८६५ रोजी त्यांचे देहावसान झाले.

## योगदान :

**शैक्षणिक कार्य :** नानांचे शैक्षणिक क्षेत्रातील कार्य लक्षणीय आहे. मुंबई इलाख्याचा गव्हर्नर माउंट स्टुअर्ट एल्फिन्स्टनने मुंबईत शिक्षणप्रसारासाठी सन १८२० मध्ये 'दि नेटिव्ह स्कूल अँड स्कूल बुक कमिटी' स्थापन केली होती. त्यात नानांचे सहकार्य होते. पुढे मुंबईची हैंद शाळा आणि शाळा पुस्तक मंडळी (दि बॉम्बे नेटिव्ह स्कूल अँड स्कूल बुक कमिटी) या संस्थेची स्थापना झाली. यातही नानांचा सहभाग होता. ते संचालक होते. या संस्थेचे पुढे 'बॉम्बे नेटिव्ह एज्युकेशन सोसायटी'मध्ये रूपांतर करण्यात आले. सन १८४१ मध्ये 'बोर्ड ऑफ एज्युकेशन' (शिक्षण मंडळी) ही संस्था प्रत्यक्षात आल्यावर बॉम्बे नेटिव्ह एज्युकेशन संस्थेचा अवतार समाप्त झाला. नाना शेवटपर्यंत एल्फिन्स्टन निधीचे अध्यक्ष, कॉलेज व शैक्षणिक संस्थांचे चालक होते.

**स्टुडंट लिटररी अँड सायन्टिफिक सोसायटी :** नानांच्या पाठिंब्याने दादाभाई नवरोजी आणि अन्य सहकाऱ्यांनी ही संस्था स्थापन केली. या संस्थेच्या वतीने मुलींसाठी कन्या शाळा चालविण्याचे ठरले. नानांनी या शाळेसाठी स्वतःच्या वास्तूचा काही भाग वापरायला दिला. नानांचे चिरंजीव विनायक जगन्नाथ मुर्कुटे यांनी या कामी पुढाकार घेतला. सुरुवातीला ४४ पारशी व २४ हिंदू विद्यार्थिनी वर्गात येऊ लागल्या. सन १८५१ मध्ये गुजराथी हिंदू समाजाची पहिली मुलींची शाळा सुरू झाली. पुढे 'गुजराथी ज्ञानप्रसारक मंडळी', 'मराठी ज्ञानप्रसारक मंडळी', 'गुजराथी हिंदू बुद्धिवर्धक सभा' सुरू झाली. त्यापूर्वीच सन १८२९ मध्ये मिसेस मार्गारेट विल्सन यांनी अमेरिकन मिशनच्या माध्यमातून मुलींसाठी 'ना. जगन्नाथ शंकरशेठ मुलींची मराठी शाळा सुरू केली होती. त्या काळी एतद्देशीयांचा विरोध, निंदानालस्ती सहन करून नानांनी स्वतःची पदरमोड करून या शाळा चालविल्या. 'बोर्ड ऑफ एज्युकेशन' समोर त्यांनी भारतीयांना मातृभाषेतूनच शिक्षण

मुंबईतील एल्फिस्टन कॉलेज



जे जे हॉस्पिटल, मुंबई




द्यावे असा आग्रह धरला. शैक्षणिक पाठ्यपुस्तके धार्मिक गोष्टींपासून स्वतंत्र ठेवावीत असेही ठामपणे सांगितले. यातूनच पुढे गिरगाव रस्त्यावर एक इंग्रजी-मराठी शाळा (जगन्नाथ शंकरशेठ स्कूल) स्थापण्यात आली. तिला पहिली ३ वर्षे नानांनी उदार अंतःकरणाने मदत केली.

**ग्रँट मेडिकल कॉलेज :** आधुनिक काळातील वैद्यकीय शिक्षण मुंबईत सुरू करण्याचे श्रेय नाना आणि त्यांचे सहकारी (फ्रामजी कावसजी, जमशेठजी जीजीभाई) यांना जाते. नानांनी मुंबईतील एक कर्तबगार इंग्रज गव्हर्नर सर रॉबर्ट पँट यांच्या नावाने मेडिकल कॉलेज स्थापून त्यांचे उचित स्मारक उभारावे असा प्रस्ताव मांडला. त्याला सरकारी साहाय्य मिळाले. पहिल्या यशस्वी तुकडीला शिक्षण संपल्यावर सरकारी मानधन, वैद्यकीय शिक्षण मराठीतून देणे इत्यादी सोई करण्यात आल्या होत्या. त्या नानांमुळे घडल्या. अखिल 'बोर्ड ऑफ एज्युकेशन' समोर त्यांनी भारतीय पातळीवर कायदे शिक्षणाचे वर्ग मुंबईत प्रथमच सुरू करण्यात नानांनी पुढाकार घेतला. एल्फिन्स्टनच्या आवारात हे कायदेशिक्षण सुरू झाले. पाच वर्षांचा अभ्यासक्रम पूर्ण करणाऱ्या विद्यार्थ्यांना कोर्टाची सनद आणि स्वतःचा व्यवसाय सुरू करण्याची परवानगी नानांनी मिळवून दिली. महादेव गोविंद रानडे (जे पुढे न्यायमूर्ती झाले) आणि बाळ मंगेश वागळे हे दोघे एल.एल.बी. (L.L.B.) परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे नानांनी पाहिले. सर जमशेटजी जीजीभाई कला महाविद्यालय उभारण्यात नानांनी पुढाकार घेतला आणि भारतीयांच्या मुक्त कलाविष्काराला संधी मिळाली. नानांच्या सहकार्याने आणि खंबीर भूमिकेने पुण्यातील डेक्कन कॉलेज, त्यातील संस्कृत व भारतीय भाषा अभ्यासाचा अध्ययन व अध्यापन विभाग सुरू झाला. सर्व जाती-धर्मातील मुले संस्कृत शिक्षण घेऊ शकणार होती. पुढे नानांच्या निधनानंतर त्यांचे चिरंजीव विनायक जगन्नाथ यांनी मुंबई विद्यापीठात जगन्नाथ शंकरशेठ शिष्यवृत्ती (स्कॉलरशिप) या नावाने शिष्यवृत्ती दिली. तिला जेवढी प्रतिष्ठा मिळाली ती अभूतपूर्व आहे. मुंबई विद्यापीठ स्थापन झाल्यावर नानांच्या शैक्षणिक कार्यातील योगदानासाठी सरकारने त्यांना फेलो व विद्यापीठाच्या सीनेटमध्ये बसण्याचा बहुमान दिला. सन १८६४ मध्ये नाना व त्यांचे पुत्र दोघेही विद्यापीठाच्या सीनेटमध्ये एकत्र होते. हा दुर्मीळ योग होय.

**सामाजिक क्षेत्र :** नानांनी वयाच्या विसाव्या वर्षीच सतीबंदी करावी, या ठरावावर सही केली होती. या अर्जावर राजा राममोहन रॉय यांचीही सही होती. पुढे कायदा करून ही प्रथा संपविण्यात आली. धर्मांतर आणि शुद्धीकरण घटनांमध्ये नानांनी स्वधर्मीयांच्याच हिताची भूमिका घेतली. सार्वजनिक आरोग्यसेवेची पायाभरणी करण्यासाठी बॉम्बे नेटिव्ह डिस्पेन्सरी आणि सर जे. जे. हॉस्पिटलच्या उभारणीत त्यांनी सक्रिय योगदान दिले. मुंबईत पहिले सार्वजनिक सूतिकागृह (मॅटर्निटी होम) उभारण्यात नानांनी पुढाकार घेतला आणि




जमशेटजी जीजीभाई कला महाविद्यालय






ते काम यशस्वी केले. वडिलांच्या नावे 'शंकरशेट बाबूलशेट मोफत दवाखाना सुरू करून साथीच्या काळात बेवारस मृतदेहांचा प्रश्न सोडविला. सोनापूर स्मशानभूमीचा प्रश्न त्यांनी हिंदूमुस्लीम-ब्रिटिश यांचे समाधान करून सोडविला. 'डेव्हिड ससून इंडस्ट्रिअल व रिफॉर्मेटरी इन्स्टिट्यूशन' या संस्थेच्या माध्यमातून नानांनी बालसुधारणा क्षेत्रात महत्त्वाचे कार्य केले.

**कायदेमंडळातील कार्य :** सन १८६२ च्या राजकीय सुधारणांनुसार कायदेमंडळात ११ सभासद नेमण्यात आले. त्यात नानांचा समावेश होता. नानांचे इंग्रजीवर प्रभुत्व असल्यामुळे त्यांचे बोलणे प्रभावी होई. कायद्यासमोर समानता, बालगुन्हेगार, वकिलांची फी, दत्तक कायदा, मुला-मुलींचे विवाहयोग्य वय, जुगार प्रतिबंध, मुंबई म्युनिसिपल कायदा यासंबंधी त्यांनी मौलिक मार्गदर्शन करून भारतीयांचे हितरक्षण केले. शहर सुधारणा समिती (मुंबई) म्हणूनही त्यांनी प्रभावी कामगिरी बजावली. रस्त्यावर धूळ उडू नये म्हणून फक्त युरोपीय लोकांच्या वस्तीत पाणी मारले जायचे त्याविरुद्ध मत प्रदर्शन, घरपट्टी व अन्य कर, ग्रँट रोड येथील खासगी मालकीचा शहरातील ड्रेनेज व्यवस्था, मुंबई बेटातील तटबंदी काढणे, बॉम्बे गॅस कंपनीची पायाभरणी या क्षेत्रात त्यांनी महत्त्वपूर्ण कार्य केले.



**अन्य कार्य :** द बॉम्बे स्टीम नॅव्हीगेशन कंपनीची (The Bombay Steam Navigation Company) स्थापना करण्यात नानांचा सहभाग होता. नाना हे संचालक, विश्वस्त, जमा-खर्चाची देखरेख व हिशेबतपासणी प्रमुखही होते. या बोटीने मुंबई ते कराची टपालव्यवस्था सुरू झाली. मुंबईत नाट्यगृहाची उणीव होती. म्हणून नानांनी स्वतःची जागा देऊन बादशाही सभागृह बांधले. तेथे विष्णुदास भावे यांच्या नाटकाचा प्रयोग केला. नानांनी 'ग्रेट ईस्टर्न रेल्वे' कंपनी स्थापण्यात पुढाकार घेऊन मुंबईत आगगाडी (रेल्वे) सुरू करण्यास चालना दिली. यातूनच 'ग्रेट इंडियन पेनिन्सुलर रेल्वे' (GIP) कंपनी अस्तित्वात आली. भारतीय रेल्वेची पहिली कचेरी नानांच्या वाड्यात सुरू झाली. १६ एप्रिल, १८५३ रोजी मुंबईतील बोरिबंदर ते ठाणे हे अंतर रेल्वेने (२१ मैल अंतर ५७ मिनिटांत पूर्ण केले) दुपारी ३.३० वाजता अंतर कापायला सुरुवात केली, त्याच दिवशी रात्री आठ वाजता रेल्वे परत ठाणे-बोरिबंदर प्रवास करून परतली. भारताच्या इतिहासातील ही अभूतपूर्व घटना होय. मुंबईच्या जडणघडणीत आणि रेल्वेच्या उभारणीत

नानांनी दिलेल्या योगदानाबद्दल सरकारने त्यांना प्रथम वर्ग प्रवासाचा आजीव सुवर्ण पास देऊन त्यांचा गौरव केला. नाना रेल्वेचे आयुष्याच्या अखेरीपर्यंत (बारा वर्षे) संचालक होते. पुढे नानांनी फ्रामजी कावसजी इन्स्टिट्यूटची उभारणी केली. 'अॅग्री-हॉर्टिकल्चरल सोसायटी ऑफ वेस्टर्न इंडिया' ही संस्था मुंबईत स्थापन करण्यात इंग्रज अधिकाऱ्यांबरोबर नानांनी पुढाकार घेतला. आयुष्याच्या अखेरच्या पर्वात राणीची बाग, शासकीय मध्यवर्ती वस्तुसंग्रहालय उभारण्यात नानांनी पुढाकार घेतला. रॉयल एशियाटिक सोसायटीचे सदस्यत्व भारतीयांसाठी खुले झाल्यावर नाना सन १८४५ मध्ये सभासद झाले. मुंबई व जिल्ह्यांच्या अचूक जनगणनेचा अहवाल तयार करणाऱ्या उपसमितीत नानांनी भरीव योगदान दिले. रॉयल एशियाटिक सोसायटीला 'नॅचरल हिस्ट्री' या विषयावर नानांनी ग्रंथखरेदीसाठी पाच हजार रुपये देणगी दिली. 'बॉम्बे बेनेव्होलंट लायब्ररी अँड रीडिंग रूम' या संस्थेला जागा मिळवून देणे ते ग्रंथ संग्रहात भर घालणे यासाठी नानांनी भरीव मदत केली. बाबा पद्मनजींना 'यमुना पर्यटन' ही कादंबरी लिहिण्यासाठी नानांनी आर्थिक सहकार्य केले.

**बॉम्बे असोसिएशन :** २६ ऑगस्ट, १८५२ रोजी नाना, डॉ. भाऊ दाजी लाड, नवरोजी फर्दुनजी, जमशेटजी यांनी एकत्र येऊन पश्चिम हिंदुस्थानातील पहिली राजकीय संस्था 'बॉम्बे असोसिएशन' स्थापन केली. त्यापूर्वी १८४० च्या 'ब्रिटिश इंडिया सोसायटी'च्या स्थापनेतही नानांनी पुढाकार घेतला होता. असोसिएशनतर्फे ब्रिटिश पार्लमेंटला २३ पृष्ठांचा अर्ज करण्यात आला. त्यावर ३,००० नागरिकांच्या सह्या होत्या. इंग्लंडमध्ये या अर्जावर विचारविनिमय होऊन अनेक सुधारणा भारतात करण्यात आल्या.

**आर्थिक क्षेत्र :** नानांनी अन्य क्षेत्राप्रमाणेच आर्थिक क्षेत्रातही स्वतःचा ठसा उमटविला. सन १८४२ मध्ये स्थापन झालेल्या 'बँक ऑफ वेस्टर्न इंडिया'चे ते संचालक व विश्वस्त होते. पुढे ते ओरिएंटल बँकेचे संचालक व विश्वस्त झाले. सन १८५२ मध्ये स्थापन झालेल्या 'कमर्शियल बँक ऑफ इंडिया'चे नाना आणि त्यांचे चिरंजीव संचालक झाले. मर्कंटाईल बँक ऑफ इंडिया, लंडन अँड चायना ही बँक सन १८५४ मध्ये स्थापन झाली. नाना या बँकेचे ज्येष्ठ बोर्ड ऑफ डायरेक्टर होते.

सन १८६० मध्ये स्थापन झालेल्या 'सेंट्रल बँक ऑफ वेस्टर्न इंडिया'च्या स्थापनेत नानांचा सहभाग आणि त्यांचे चिरंजीव संचालक होते. या बँकेच्या इंग्लंड, हाँगकाँग, चीन, जपान, ऑस्ट्रेलिया, कलकत्ता, इंदूर, अहमदाबाद, सुरत, मद्रास, सोलापूर येथे शाखा होत्या. सन १८६५ पूर्वी ज्या १४ बँका स्थापन झाल्या त्यातील ६ बँकांच्या उभारणीत आणि विस्तारात नानांचा प्रत्यक्ष सहभाग होता. त्या काळात बँकेचे संचालक मंडळ युरोपियनांनी भरलेले असताना एका हाताच्या बोटांवर मोजता येतील एवढेच भारतीय संचालक त्यावर असायचे. यात नानांचा कायमच समावेश होता यावरून आपणास नानांचे आर्थिक क्षेत्रातील प्रभुत्व समजू शकेल. ■■







# परिवर्तनाचे शिल्पकार

## फुले-शाहू-आंबेडकर व्याख्यानमाला





**परिवर्तनाचे शिल्पकार : फुले–शाहू–आंबेडकर या व्याख्यानमालेअंतर्गत राजर्षि शाहू यांनी महाराष्ट्रात हरितक्रांती घडविण्याच्या दृष्टीने राबविलेल्या धोरणांचा व केलेल्या कार्याचा राजर्षि शाहू चरित्राचे अभ्यासकार आणि ज्येष्ठ इतिहासकार डॉ. जयसिंगराव पवार यांनी घेतलेला संक्षिप्त आढावा.**

# महाराष्ट्राच्या हरितक्रातीचे जनक

# राजर्षी शाहू महाराज



डॉ.जयसिंगराव पवार

कृषीच्या संदर्भामध्ये राजर्षी शाहू महाराजांचं काम हे मुलभूत स्वरूपाचं होतं. आपल्याला हरितक्रांतीचे जनक म्हणून स्वातंत्र्योत्तर कालखंडामध्ये डॉ. स्वामीनाथन यांचं कार्य माहिती आहे. त्यांचं नाव जगभर झालेलं आहे आणि म्हणून त्यांना आपण भारताच्या हरितक्रांतीचे जनक म्हणतो. पण, अशा प्रकारची हरितक्रांती महाराष्ट्रामध्ये म्हणजे त्याकाळच्या मुंबई इलाख्यात, त्या काळच्या दक्षिण हिंदुस्थानात पहिल्यांदा कुणी घडवून आणली असेल, तर ती राजर्षी शाहू छत्रपतींनी. ही गोष्ट अलिकडच्या पिढीला फारशी माहित नाहीये. हरितक्रांतीचा पाया महाराष्ट्रामध्ये शाहू छत्रपतींनी पाऊणशे वर्षापूर्वी, म्हणजे स्वामीनाथन यांच्यापूर्वी पाऊणशे वर्षे, आणि आजपासून जवळजवळ शंभर-सव्वाशे वर्षे हा कोल्हापुरामध्ये घातला गेला.

शाहू महाराजांचं कार्य प्रामुख्यानं आपण सामाजिक क्रांतीचं कार्य नजरेसमोर ठेवतो आणि म्हणून त्यांना समाज क्रांतीकारक असं म्हटलं जातं. आणि एवढं प्रचंड काम त्यांनी सामाजिक क्षेत्रामध्ये केलेलं आहे, की त्यांचं इतर क्षेत्रातलं काम त्या प्रचंड कामाच्या वटवृक्षाखाली खुंटून गेलेलं आहे असं मला वाटतं किंवा झाकाळून गेलेलं आहे. कृषी, व्यापार-उद्योग आणि सहकार या क्षेत्रात कोल्हापुरामध्ये, आपल्या संस्थानामध्ये म्हणजे दक्षिण हिंदुस्थानामध्ये, पर्यायाने हिंदुस्थानामध्ये मुलभूत स्वरूपाचं काम शाहू महाराजांनी केलं, याकडं अलिकडच्या पिढीचं लक्ष नाहीये. शाहू चरित्रकारसुद्धा प्रामुख्यानं जे हायलाईट करतायंत, ते शाहू महाराजांचं सामाजिक कार्य. पण खरी क्रांती जी होणार होती, दोन प्रकारची क्रांती असते, एक सामाजिक मागासलेपण नष्ट करणारी आणि दुसरी क्रांती असते, ती भौतिक मागासलेपण नष्ट करणारी. भौतिक मागासलेपणामध्ये अपेक्षित काय आहे? कोणती क्रांती आहे? तर, कृषी, औद्योगिक, व्यापार, सहकार या क्षेत्रामध्ये जे शाहू महाराजांनी क्रांती कार्य केलं हे भौतिक क्रांती करण्याचं काम आहे.

असं म्हणता येईल सामान्यपणे, की अज्ञानातून एक सामाजिक मागासलेपण निर्माण होतं आणि दारिद्र्यातून हे भौतिक मागासलेपण तयार होतं. दोन्ही प्रकारचं मागासलेपण नाहिसं करण्यासाठी शाहू महाराजांनी जे कार्य केलंय, ते आपल्याला बघायचं आहे. त्यातल्या त्यात विशेषत: भौतिक मागासलेपण जे आहे, हे कशातून निर्माण होतं, तर दारिद्र्यातून निर्माण होतं. ९७ टक्के प्रजा ही शेतकरी रयत, ज्याला आपण आज ओबीसी म्हणतो, ते बारा बलुते, अलुते या सगळ्यांची अर्थव्यवस्था ही कृषीवर अवलंबून होती. याचा अर्थ असा, की हिंदुस्थान हा देश हा कृषीप्रधान होता. कृषीप्रधान याचा अर्थ असा, की ज्या देशाची अर्थव्यवस्था शेतीवर अवलंबून आहे तो देश.

सगळ्या जगाला पुरेल एवढं धान्याचं उत्पादन अमेरिका करते. पण, अमेरिका कृषीप्रधान नाहीये. अमेरिका ही औद्योगिक, उद्योगधंदाप्रधान, व्यापारप्रधान असं राष्ट्र आहे. आधुनिक राष्ट्र आहे. त्याच्यामध्ये सर्व्हिस इंडस्ट्री आहे. कारखानदारी आहे. अनेक क्षेत्रांमध्ये त्यांनी प्रगती केली आहे. त्यामुळं ते एकप्रकारे सर्वार्थानं आधुनिक राष्ट्र बनलेलं आहे. आपलं तसं नाहीये. अमेरिकेमध्ये दोन ते तीन टक्के लोकसुद्धा शेतीवर अवलंबून नाहीयेत आणि अमेरिकेतले लोक जे शेती करतायंत, ते व्यवसाय म्हणून शेती करतायंत हे लक्षात घ्या. एक हजार एकर, दोन हजार एकर जमीन आणि आमचा शेतकरी जो आहे, त्याच्याकडे एक एकर, दीड एकर, दोन एकर.

तेव्हा शाहू महाराजांनी पाहिलं, की हे जे भौतिक मागासलेपण आहे ते कृषीशी संबंधित आहे. म्हणजे कृषी क्षेत्रामध्ये जर आपण प्रगती केली, क्रांती झाली, जो कृषीचा व्यवसाय हा जवळजवळ ८० ते ८५ टक्के लोकांचा आहे, तर देशाची अर्थव्यवस्था सुधारण्याचा सगळ्यात मोठा भरीव मार्ग म्हणजे कृषी क्षेत्रामध्ये आपण प्रगती करायला पाहिजे. आजसुद्धा आमचं भारत सरकार तेच म्हणतंय, की आपण पहिल्यांदा शेतीवर जास्तीत जास्त लक्ष द्यायला पाहिजे. शेतकऱ्याचं आर्थिक मागासलेपण गेलं पाहिजे. शेतकऱ्याला हमीभाव मिळाला पाहिजे वगैरे वगैरे. ही भाषा शाहू महाराजांनी सव्वाशे वर्षापूर्वी केली होती.

कृषी क्षेत्रामधल्या क्रांती कार्याकडं शाहू महाराजांचं का

लक्ष गेलं? त्याला एक जबरदस्त कारण घडलं ते १८९६पासून १८९९पर्यंत. जवळजवळ चार वर्षे जो देशामध्ये दुष्काळ पडला, पर्यायानं महाराष्ट्रात, पर्यायानं कोल्हापूर संस्थानामध्ये. त्यात रयतेची झालेली हार, शाहू महाराजांनी जनावरांपासून माणसांपर्यंत प्रत्येकाची काळजी घेतली आणि जनावरंसुद्धा मरू दिली नाहीत. एकही भूकबळी झाला नाही. पण या देशामध्ये लक्षावधी माणसं ही अन्नाविना, पाण्याविना तडफडून मेली. शाहू महाराजांच्या राज्यात मात्र एकही भूकबळी झाला नाही. पण या गोष्टीनं शाहू महाराजांच्या मनावर फार मोठा परिणाम होऊ लागला. एका बाजूला अज्ञान आणि दुसऱ्या बाजूला दारिद्र्य आणि दोन्हीतून निर्माण होणारा मागासलेपणा.



रंकाळा तलाव, कोल्हापूर



याच्यावर जर मात करायची झाली, तर आपणाला मुलभूत स्वरूपाचं काम करावं लागेल. आणि म्हणून १९०२ साली दोन जाहीरनामे शाहू महाराजांनी काढले. पहिला जाहीरनामा तुम्हाला माहित आहे, आरक्षणाचा आणि दुसरा जाहीरनामा जो आहे, तो सार्वजनिक पाटबंधारे प्रोजेक्टचा. सार्वजनिक पाटबंधारे प्रोजेक्ट म्हणज मास इरिगेशन पॉलिसी. आता याच्यामध्ये काय होतं?

याच्यामध्ये शाहू महाराजांनी आपल्या संस्थानामध्ये पाण्याचे स्रोत किती आहेत याच्यासाठी सर्व्हे करण्याची आज्ञा दिली. जलस्रोत किती आहेत आणि ते कसे वाढवता येतील आणि या सदराखाली शाहू महाराज त्या जाहीरनाम्यामध्ये म्हणाले आहेत, की आपल्या संस्थानामध्ये विहिरी किती आहेत, तलाव किती आहेत, बंधारे किती आहेत, त्याच्यात किती प्रमाणात पाण्याचा साठा होतो. किती प्रमाणात त्यातून पावसाचं पाणी वाहून जातं. किती प्रमाणात गाळामुळं पाणी साचत नाही. याचाच अर्थ गाळ काढल्यास किती प्रमाणात पाणी जास्त मिळेल आणि सर्वात महत्त्वाचं म्हणजे, आणखीन कोणकोणत्या ठिकाणी आपणाला पाणी अडवता येईल.

आमचे ज्येष्ठ मार्गदर्शक भाई वैद्य यांनी एका व्याखानामध्ये शाहू महाराजांच्या कार्याचं वर्णन केलेलं आहे. मला ते अतिशय भावलं. अतिशय अचूक वर्णन केलेलं आहे. त्यांनी म्हटलंय, की भारताचं जे स्वराज्य येऊ घातलेलं आहे, त्या स्वराज्यामध्ये कशा प्रकारची प्रगती करावी लागेल. कोणकोणती विधायक कामं करावी लागतील, कोणकोणते कायदे करावे लागतील हे सर्व शाहू महाराजांनी शंभर वर्षांपूर्वी आपल्या राज्यात केलं. महाराष्ट्र सरकारची धोरणं जेव्हा आपण पाहतो जलसंधारण करण्यासाठी, महाराष्ट्र सरकारनं ज्या विविध उपाययोजना केल्या, या उपाययोजना शाहू महाराजांनी शंभर वर्षांपूर्वी आपल्या राज्यात केलेल्या आहेत. भारताचं स्वातंत्र्य आणि भारताचं स्वराज्य हे कसं असेल त्याचं एक मॉडेल शाहू महाराजांनी तयार केलं असं भाई वैद्यांनी म्हटलेलं आहे.

अशा प्रकारचा सर्वे, मास इरिगेशन पॉलिसी ही देशामधली राज्यकर्त्यांनी केलेली, ब्रिटीशांनी केलेली नाही, एका भारतीय संस्थानिकानं ही इरिगेशन पॉलिसी स्वीकारलेली आहे. स्पेशल इरिगेशन ऑफिसर त्यासाठी नेमण्यात आले. इंजिनिअर्स त्यासाठी नेमण्यात आले. आणि जवळजवळ वीस बंधारे कोल्हापूर संस्थानामध्ये नव्याने बांधण्यात आले. विहिरी, ओढे खोलवले गेले, तलाव खोलवले गेले. अधिकाधिक पाणी त्याच्यामध्ये साचलं. पण, महाराजांचं समाधान झालेलं नव्हतं. त्यांनी आपले एक मित्र आणि एकेकाळी इथं पोलिटिकल एजंट होते, ते कर्नल फेरीस यांना लिहिलेल्या एका पत्रामध्ये महाराज म्हणतात, की आपण इथून निघून गेल्यावर मी सुमारे वीस बंधारे बांधले. पण, माझी महत्त्वाकांक्षा पूर्ण झाली नाही. इच्छा नव्हे, महत्त्वाकांक्षा. महत्त्वाकांक्षा अशी झेप घेत असते. माणसाला प्रगतीपथावर नेत असते. इच्छा

ही शेख महंमदी स्वप्न असतं. म्हणून त्यांनी म्हटलेलं आहे, की माझी महत्त्वाकांक्षा पूर्ण झालेली नाही. म्हणून मी आता मोठा सिंचन प्रकल्प म्हणजे इरिगेशन स्कीम हाती घेणार आहे. संपूर्ण भारतातला मोठा असा तो प्रकल्प होणार आहे. ते म्हणजे राधानगरी धरण.

म्हणजे हे वीस बंधारे बांधून महाराज समाधानी नाही झाले. राधानगरी डॅम बांधायचा म्हणजे त्या काळामध्ये स्वतंत्र भारतामध्ये कोयना धरण बांधण्यासारखं होतं आणि शाहू महाराजांचं उत्पन्न काय होतं? २० लाख, जास्तीत जास्त २५ लाख आणि त्यातले ते एक लाख रूपये राधानगरी धरणावर खर्च करतायंत. पुढं ती रक्कम वाढत गेली. १९१८पर्यंत



राजाराम बंधारा, कोल्हापूर



१४ लाख रूपये शाहू महाराजांनी या धरणावर खर्च केलेले आहेत. हेतू हा, की सह्याद्रीच्या रांगांवर जो मुबलक पाऊस पडतो आहे, आजही अडीचशे इंच पाऊस पडतो, प्रचंड पाणी वाहून जातं होतं. महाराजांना वाटलं, की हे जर पाणी अडवता आलं तर आणि आपली पूर्वेकडची जमीन फार काळीभोर आहे, पण तृषार्त आहे, पाण्याची तहान लागलेली आहे. त्या काळ्याभोर जमिनीला जर आपल्याला हे पाणी देता आलं तर आपला प्रदेश सुजलाम् सुफलाम् होईल. त्या काळामध्ये शाहू महाराजांना स्फुरलेलं हे स्वप्न आहे. हे महत्त्वाकांक्षी स्वप्न आहे. १९०९ला धरणाचं काम सुरू झालं आणि टप्प्याटप्प्यानं ते पूर्ण झालं. पण, शाहू महाराजांच्या काळामध्ये जे ४० फुटी धरण झालं होतं, त्याच्यामध्ये दरवर्षी ६०० दशलक्ष घनफूट पाणी जमा व्हायला लागलं. हे पाणी जसं लागेल तसं त्या नदीमध्ये, जी नदी उन्हाळ्यामध्ये कोरडी पडत होती, ती पाण्यानं भरून वाहू लागली.

कृषी क्षेत्रामध्ये शाहू महाराजांनी जी प्रगती केली, ही केवळ धरणं बांधून महाराज थांबले नाहीत. अनेक प्रयोग शाहू महाराजांनी शेतीच्या क्षेत्रामध्ये केलेले आपणाला दिसतात. किंबहुना शाहू महाराजांच्या चरित्राकडं जर आपण पाहिलं तर आपणाला असं दिसेल, की हा एक प्रयोगशील राजा आहे. सातत्यानं नवनवीन प्रयोग करतोय. मळलेल्या वाटेनं जाणारा हा राजा नाहीये. हा नवीन वाटा निर्माण करणारा राजा आहे. आपला शेतकरी हा सज्ञान झाला पाहिजे, आपला शेतकरी सुधारला पाहिजे. त्यासाठी त्यांनी शैक्षणिक सुधारणा केल्या. हा आधुनिक शेतकरी बनला पाहिजे. पण आधुनिकता म्हणजे काय? आधुनिक शेती करण्यासाठी काय काय लागतं? कोणतं बियाणं लागतं, कोणत्या पद्धती असतात, कोणती अवजारं असतात, यासाठी शाहू महाराजांनी कृषी प्रदर्शनं सुरू केली. राजधानीच्या ठिकाणी, तालुक्याच्या ठिकाणी, त्या त्या ठिकाणी कृषी प्रदर्शनं सुरू केली. औद्योगिक प्रदर्शनं सुरू केली. वैज्ञानिक प्रदर्शनं सुरू केली. म्हणजे विज्ञान आणि तंत्रज्ञान याचंही ज्ञान, की ज्यामुळं इंग्लंड आणि अमेरिका हे देश प्रगतीपथावर आहेत, त्याची निदान झुळूक तरी आपल्या लोकांना लागली पाहिजे. आपण किती मागासलेले आहोत आणि आपणाला काय गाठायचं आहे. आपण आधुनिक होणं म्हणजे काय.

साधी गोष्ट आहे. ऊसाचं पीक पहिल्यापासून आपल्याकडं होतं. पण, ऊसाचा रस हा लाकडी चरखातून काढला जात असे. म्हणजे घाणा जो असेल तो लाकडी असायचा. शाहू महाराज म्हणाले, की याच्याऐवजी आपणाला लोखंडी घाणा करता आला तर बघा. म्हणजे जो लाकडाचा होता तिथं लोखंडी आला. अधिक सुलभ. पुढं निरीक्षणाअंती त्यांच्या लक्षात आलं, की बऱ्याच शेतकऱ्यांची बोटं तुटलेली आहेत. त्यांनी चौकशी केली असता त्यांना सांगण्यात आलं, की लोखंडी चरक्यामध्ये बोटं सापडून ती तुटलेली आहेत.


लक्ष्मणराव किर्लोस्कर यांनी बनविलेला लोखंडी नांगर



शाहू महाराजांनी लगेच आदेश काढला, जाहीरनामा काढला तमाम सगळ्या टेक्निशियनना, की असा नवीन घाणा करा ज्याच्यामध्ये शेतकऱ्यांची बोटं अडकणार नाहीत. काही दिवसांनी तशा प्रकारची काही मॉडेल्स सादर केली गेली. त्यातलं एक मॉडेल शाहू महाराजांनी स्वीकारलं. त्या मॉडेलच्या कॉपीज् तयार करण्यात आल्या आणि ते ठिकठिकाणी शेतकऱ्यांच्यासाठी ठेवण्यात आली.

शाहू महाराजांनी कोल्हापुरामध्ये एक मोठं म्युझियम काढलं ते म्हणजे कृषी म्युझियम. शेतकऱ्यांसाठी म्युझियम काढलं. त्यामध्ये आधुनिक अवजारं कशी आहेत, पूर्वी लाकडाचे नांगर होते. लोखंडी नांगर हे लक्ष्मणराव किर्लोस्करांनी त्याचं उत्पादन सुरू केलं, ही त्या काळातली क्रांती होती हे लक्षात घ्या. लाकडी नांगरापेक्षा लोखंडी नांगरानं चांगली मशागत होत असे. ते खोलवर जात असे. जाता जाता हेही मी आपणाला सांगतो, की पहिल्या महायुद्धामध्ये लक्ष्मणराव किलोस्करांना लोखंड मिळणं फार कठीण होऊन बसलं. कारखाना बंद होण्याच्या स्थितीला आला. लक्ष्मणराव हे फार बुद्धीमान होते. या काळात आपला कोण त्राता आहे याचा विचार करून ते शाहू महाराजांकडे गेले आणि म्हणाले, की तुमच्या राज्यामध्ये शेकडो लोखंडी तोफा आहेत. माझा कारखाना बंद पडण्याच्या मार्गावर आहे. तुम्ही या तोफा जर आम्हाला दिल्या, आज त्याचा काही उपयोग नाही, तर मी त्याचे नांगर करेन. शाहू महाराजांनी त्या तोफा लक्ष्मणरावांना दिल्या. आपला माणूस, मराठी माणूस हा उद्योगधंद्याच्या क्षेत्रामध्ये पुढे आला पाहिजे, तो अडचणीत आल्याबरोबर त्यांनी हात दिला.

आता ही जी प्रदर्शनं भरवली जात असत, कोल्हापूर, जयसिंगपूर, शिरोळ, हातकणंगले, गडहिंग्लज, आजरा याठिकाणी जी प्रदर्शनं भरवली जात असत, विशेषत: कोल्हापूरमध्ये जी प्रदर्शनं भरवली जात असतं ती यात्रांच्या काळात भरवली जात असत. महाराजांचा समाजशास्त्राचा इतका परिपूर्ण अभ्यास होता, की हा अभ्यास राज्यकर्त्याला हवा आहे. आजच्या राज्यकर्त्यांनी काय घ्यायचंय. नुसती सुधारणा करून आणि केव्हाही प्रदर्शनं आयोजित करून चालणार नाही. जास्तीत जास्त लोकांनी ते पाहिलं पाहिजे म्हणून महाराज कुस्त्यांच्या फडाचं आयोजन करत असत. हत्तींच्या टकरा, रेड्यांच्या टकरांचं आयोजन करत असत. ते पाहण्यासाठी शेकडो, हजारो रयत, शेतकरी येत असत आणि बाजूला हे प्रदर्शनसुद्धा पाहात असत. म्हणजे घोड्याला पाणी कसं पाजायचं, हे शाहू महाराजांना चांगलं माहित होतं.

मघाशी मी बोललो, की शाहू महाराजांचं कार्य हे क्रांती कार्य आहे आणि शाहू महाराजांनी मळलेल्या वाटेनं कधीच प्रवास केला नाही. नवीन वाटा शोधून काढल्या आणि जो नवीन वाटा शोधून काढतो तो इतिहास घडवतो. शाहू महाराजांनी पाहिलं, की आपल्याकडं ऊस होतोय, गूळ होतोय, त्यानंतर भुईमूग होतोय, कडधान्य होतायंत. ही आपली पारंपरिक धान्यं झाली. शेतीचं उत्पादन झालं. पण याशिवाय आपणाला नवीन करता येईल का? जर केरळमध्ये, मलबारमध्ये चहाचे मळे असतील, तर तशाच प्रकारची परिस्थिती थोडीफार आपली संस्थानाच्या पश्चिम भागात, सह्याद्रीच्या उतारावर तशीच परिस्थिती आहे. तेवढाच पाऊस पडतोय. मग चहाचे मळे का तयार करू नयेत. शाहू महाराजांनी चहाचे मळे काढले. रबर


प्लँटेशन केलं. मसाल्याच्या पदार्थांच्या वनस्पती लावल्या. एवढ्या सगळ्यातून आपणाला दिसतंय, की शाहू महाराजांनी नवनवीन प्रयोग सह्याद्रीच्या कुशीमध्ये केलेले दिसतात. त्यातले काही यशस्वी झाले. त्यामध्ये चहाच्या उत्पादनाचा समावेश आहे. कोल्हापूर संस्थानामध्ये चहाचे जे उत्पादन होत होतं ते पन्हाळा टी नंबर फोर या नावानं. हा चहा ठिकठिकाणी म्हैसूरच्या महाराजांना, बडोद्याच्या महाराजांना हा आमच्या संस्थानामध्ये निर्माण झालेला चहा आहे, तो प्या असं म्हणून शाहू महाराज पाठवत असत. बडोद्याच्या महाराजांना हा चहा इतका आवडला, की त्यांनी आयुष्यभर कोल्हापूरच्या संस्थानामध्ये निर्माण झालेला चहा वापरत राहिले.

कृषी क्षेत्रातील शाहू महाराजांच्या कार्याच्या संदर्भात एक-दोन नव्या नोंदी, ज्या शाहू महाराजांच्या चरित्रकारांनी फारशा लक्षात घेतलेल्या नाहीत त्या याठिकाणी मांडायला पाहिजेत. त्या म्हणजे, शाहू महाराजांनी चेंबर ऑफ प्रिन्सेस, म्हणजे संस्थानिकांची एक संघटना होती. संस्थानिकांनी एकत्र येऊन त्यांच्या समस्येविषयी, त्यांच्या प्रश्नांविषयी खल करावा आणि सरकारला काय सांगायचं असेल तर चेंबर ऑफ प्रिन्सेसच्या माध्यमातून सांगितलं जावं. या चेंबर ऑफ



प्रिन्सेसमध्ये अनेक विषयांवर संस्थानिक बोलत असत. पण, शाहू महाराजांनी कटाक्षानं शेतीवर भर दिलेला आहे. ॲग्रीकल्चर इन कोल्हापूर, त्याच्या समस्या, शेतकऱ्यांचं मागासलेपण, अज्ञान, जमिनीचे तुकडे म्हणजे उत्पादन कमी का होतं, शेतकरी दारिद्र्यात का राहातो, एक अज्ञान आहे, जमिनीचे तुकडे आहेत, त्यातून पोटापुरतं पण ज्याला मिळत नाही तो देशासाठी काय उत्पादन करणार. हे सगळे विषय भारतीय शेतीच्यासंदर्भात राष्ट्रीय पातळीवर शाहू महाराजांनी नेले. खरं तर ही फार मोठी गोष्ट आहे. पण आपलं तिकडं लक्ष असत नाही.

अर्थात शाहू महाराजांनी हा जो विषय मांडला, हा जो विचार आहे, तो राष्ट्रीय पातळीवर मांडला. पण इलाखा पातळीवर किंवा महाराष्ट्रापुरता पहिल्यांदा जर कोणी विचार मांडला असेल तर महात्मा फुल्यांनी मांडलाय. महात्मा फुल्यांचा समग्र क्रांतीचा जो विचार आहे, त्याचा जो कणा आहे तो रयत आहे. शेतकरी आहे. विविध मार्गांनी जो उभारला जाणारा, धार्मिक असतील, पुरोहित असतील, व्यापारी असतील, शेठ सावकार असतील सगळ्यांचा त्यांनी एक परामर्श केलाय. पण त्याच्यामध्ये शेतकऱ्यांचं हलाखीचं जे काय संशोधन, मुलभूत स्वरुपाचे विचार महात्मा फुल्यांनी मांडलेले आहेत. तेच शाहू महाराजांनी मांडलेले आहेत. आणि तेच पुढे डॉ. आंबेडकरांनी मांडलेले आहेत. आंबेडकरांच्यासुद्धा कार्याचा सर्वांगिण अभ्यास अजून झालेला नाही. स्त्रियांच्या उद्धाराच्यासंदर्भात केवढं मोठं कार्य केलंय. शेतकऱ्यांच्या संदर्भामध्ये जे विचार मांडलेले आहेत, हे फुल्यांच्याच विचारासारखे विचार आहेत. ते म्हणतात, की जमिनीच्या तुकड्यांमुळं हे सगळं दैन्य निर्माण झालेलं आहे. यावर काय प्रभावी उपाय करता येतील. सामूहिक शेती कशी करता येईल. दामोदर व्हॅलीसारखी पहिली कल्पना डॉ. आंबेडकरांची आहे. जसं आपण



कोल्हापुरातील पन्हाळा किल्ला

म्हणतो, की राधानगरी हे धरण शाहू महाराजांच्या कल्पनेतून, तशी दामोदर व्हॅली योजना ही डॉ. आंबेडकरांनी पहिल्यांदा मांडली. नद्या जोड ही अलिकडच्या काळामध्ये एक संकल्पना आली आहे, ती डॉ. आंबेडकरांनी मांडलेली आहे.

तेव्हा फुले-शाहू-आंबेडकर जेव्हा आपण म्हणतो, आणि आपण म्हणतो, की महाराष्ट्राची ही एक विचारधारा आहे. विचारधारा आहे म्हणजे काय आहे, तर ही विचारधारा आहे. त्यांनी कोणाचा विचार केला. फुल्यांनी जो विचार केला, तो कुणब्यांचा केला. शेतकऱ्यांचा केला. बारा बलुतेदारांचा केला आणि दलितांचा, अस्पृश्यांचा केला. तसाच विचार शाहू महाराजांनी केला. तसाच विचार डॉ. आंबेडकरांनी केला. ही जी तिघांची कार्यक्रमपत्रिका आहे, ती सारखी आहे.

चेंबर ऑफ प्रिन्सेसच्या व्यासपीठावर शाहू महाराजांनी जो शेतीचा एक रिसर्च पेपर म्हणूया, तो वाचला, कारण तो अभ्यासपूर्ण होता. त्यात शाहू महाराजांचं संशोधन होतं, निरीक्षण होतं आणि यावर मात कशी करायची हे पण त्यांनी सांगितलेलं आहे. नुसते शेतीवरचे प्रॉब्लेम सांगून महाराज थांबले नाहीत, ते सोडवता कसे येतील यासाठी अनेक उपाययोजना सांगितल्या आहेत. त्यातली एक उपाययोजना अतिशय नाविन्यपूर्ण आहे आणि ही शाहू महाराजांसारख्याच माणसाला सुचणार. दुसऱ्या कुणाला सुचेल असं मला वाटत नाही. ती अशी आहे, की ते ब्रिटीश सरकारला आवाहन करतायंत, की महायुद्ध नुकतंच संपलेलं आहे. या महायुद्धामध्ये महाराष्ट्रातले मराठे लढले. हे मराठे कोण होते. हे मराठे मूळचे शेतकरीच आहेत. आता ते रिटायर होऊन घरी आलेले आहेत. तर शेतकरी कुटुंबातलाच एक मुलगा सैन्यामध्ये जातो, तिथे पराक्रम गाजवतो आणि तुमच्या नियमानुसार तो रिटायर होतो आणि घरी येतो. तर अशा शेतकऱ्यांच्या मुलांना, म्हणजे जे सैनिक होते त्यांना तुम्ही तुमच्या ज्या वसाहती आहेत आफ्रिका खंडामध्ये, त्या वसाहतींमध्ये शेतजमिनी द्या. कॉन्ट्रॅक्ट पद्धतीने द्या, की एक २५ वर्षे ही जमीन तु कसायची आहे. जमीन मुबलक आहे. हजारो एकर जमीन. पडीक जमीन आहे. तिथे आमचे मराठा सैनिक जातील, शेतकरी जातील आणि तिथं आधुनिक पद्धतीनं शेती कशी करायची हे तुम्ही त्यांना शिकवा. अहो, हे कुणाच्या डोक्यामध्ये आजसुद्धा येणार नाही.

आता काही आपली बडी मंडळी आफ्रिका खंडात जातात आणि तिथं जमिनी खरेदी करतात. पण हा विषय वेगळा आहे. आणि त्यातून देशाची प्रगती वगैरे असे काही नाही. त्या कुटुंबाची प्रगती आहे. इथं समाजाच्या प्रगतीचा विचार आहे. शाहू महाराज जेव्हा म्हणतात, की मी जे धरण बांधतोय ते भारतातलं सर्वात मोठं धरण असणार आहे. संस्थेचा जीव केवढा आणि शाहू महाराज भारतातले सर्वात मोठे धरण बांधायला निघालेत. आपलं जीवित कर्तव्य आहे म्हणतात. हे उद्गार त्यांनी स्वत: काढले आहेत. माझी सगळी बुद्धीमत्ता आणि शक्ती मी या राधानगरी धरणावर केंद्रीत केलेली आहे. त्याचा फायदा काय शाहू महाराजांना मिळालेला नाही. त्याचा फायदा शाहू महाराजांच्या प्रजाजनांना मिळाला. शेतकऱ्यांना मिळाला. आजही मिळतो आहे. त्यामुळंच भारतातलं सर्वात जास्त पर कॅपिटा इन्कम हे कोल्हापुरकरांचं आहे. एक लाख, दीड लाख पर कॅपिटा इन्कम आहे. ही श्रीमंती कुठून आली. तर ती राधानगरी धरणातून आली हे लक्षात घ्या.



गेल्याच्या गेल्या वर्षी दुष्काळ पडला होता. लातूरला आपल्याला रेल्वेनं पाणी पाठवायला लागलं. इतकी वर्षे महाराष्ट्रामध्ये पाण्याची टंचाई होते आहे. पाण्याचा एक थेंबसुद्धा कोल्हापुरकरांना आणावा लागला नाही. कोल्हापुरात तुम्ही येताच, सगळीकडं असा हिरवागार निसर्ग नटलेला असतो. कोल्हापूर सोडून तुम्ही जर कोकणामध्ये उतरायला लागला तर कोल्हापुरची हद्द जिथपर्यंत आहे तिथपर्यंत एक फूटसुद्धा जागा रिकामी ठेवलेली नाही शेतकऱ्यांनी. इतका कष्टाळू शेतकरी आहे इथला. आणि म्हणून आज कोल्हापूरची सुबत्ता, पर कॅपिटा इन्कम, मुंबईनंतर पहिल्यांदा जर कोणती गोष्ट येत असेल विक्रीसाठी तर ती कोल्हापुरात येते. हे सगळं वैभव हे शाहू महाराजांच्यामुळं आहे. शाहू महाराजांच्या कर्तृत्वामुळं आहे. शेतीला पूरक व्यापार कसा असला पाहिजे, उद्योगधंदे कसे असले पाहिजेत आणि नवीन उद्योगधंदे आपण का आणि कशासाठी काढले पाहिजेत यासंदर्भामध्ये जे अनेक उपक्रम राबवले आणि त्याला त्यांनी सहकाराची जोड दिली, म्हणजे उद्योगधंदे, व्यापार आणि परत ते सहकाराच्या माध्यमातून समस्त समाजाचं कल्याण कसं होईल म्हणून ते सहकाराचा मार्ग सुचवतात.

■■



Nanded City, Pune
Sinhagad Road, Pune
प्रत्येक घराला एक मन असतं.
प्रत्येक शहराला एक व्यक्तिमत्व असतं.
CBSE व ICSE शाळा
नांदेड सिटी, उत्साही मन आणि दमदार व्यक्तिमत्व यांचा देखणा मिलाफ!
A project by
MAGARPATTA CITY
Call: 020-67275800 / 1 / 2
www.nandedcitypune.com
info@nandedcitypune.com

घंटाकर्ण




# राम आणि हनुमानाची जात कोणती?

जातीवर आधारित राजकारण कोणत्या थरापर्यंत जाऊ शकते?

उत्तर प्रदेश आणि बिहारसारख्या हिंदी पट्ट्यात जातीनिष्ठ राजकारणाचा फार मोठा पगडा आहे.

भाजप आणि रा.स्व.संघाने या हिंदीभाषक राज्यांचे राजकारण जातींवरुन धर्मावर आधारित करण्याचा प्रयत्न केला. परंतु आता निवडणुकीच्या ऐन तोंडावर शेतकरी आंदोलनामुळे हे राजकारण धर्माऐवजी सामाजिक न्यायावर आधारित होण्याकडे झुकले आहे. त्यामुळे आता भाजप आणि रा.स्व.संघाची मंडळीही सामाजिक न्यायाची किंवा जातीनिष्ठ राजकारणाची भाषा बोलू लागले आहेत.

उत्तर प्रदेशाचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी याबद्दल पुढाकार घेतल्याचे समोर आले आहे.

एखादा मुख्यमंत्री प्रचारात हनुमानाची जात कोणती असे मुद्दे उपस्थित करीत असेल तर त्या प्रचाराची पातळी काय आहे याची कल्पना केलेली बरी!

आता योगीमहाराज हे आहेत क्षत्रिय किंवा राजपूत!

प्रभु रामचंद्र हे क्षत्रिय कुलातील होते. त्यामुळे योगी महाराज हे स्वतःला प्रभु रामचंद्रांशी जोडू पहात आहेत हे स्पष्ट आहे.

योगी महाराज हे गोरखनाथ मंदिराचे महंत किंवा पुजारी आहेत. त्यांचे गुरु महंत अवैद्यनाथ यांच्यानंतर त्यांचे उत्तराधिकारी म्हणून ते या मंदिराचे पुजारी झाले व त्यानंतर राजकारणात त्यांनी प्रवेश केला.

२०१८ मध्ये राजस्थानच्या विधानसभा निवडणुकीत प्रचार करताना त्यांनी हनुमान दलित, आदिवासी, गिरिजन व वंचित असल्याचे सांगून मते मागितली होती. त्यांनी हनुमानाची जात काढल्याने त्यावेळी भरपूर गोंधळ झाला होता. त्यातच भर म्हणून भाजपच्या एका नेत्याने हनुमान हा जाट समाजाचा असल्याचे सांगून मते मागितली होती.

समाजवादी पक्षाच्या एका मुस्लिम उमेदवाराने हनुमानाला मुस्लिम करुन टाकले होते.

एका आदिवासी उमेदवाराने हनुमानास गोंड करुन टाकले आणि हनुमानाचा जन्म गोंडवनात झाल्याचा शोध लावला होता.

आता उत्तर प्रदेशात निवडणुका होत आहेत. मग काय योगी महाराजांचा क्षात्रधर्म उफाळून येणे स्वाभाविकच होते. त्यांनी प्रचारात ते आणि प्रभु रामचंद्र एकाच जातीचे असल्याचा प्रचार सुरु केला आहे.

या त्यांच्या उघडउघड सांप्रदायिक प्रचाराबद्दल काही मंडळींनी तक्रार केली असली तरी लज्जाहीनता हा ज्या पक्षाचा स्थायीभाव आहे त्याच पक्षाचे योगीमहाराज असल्याने त्यांनी बिनदिक्कतपणे हा प्रचार चालू ठेवला आहे. परंतु काही ओबीसी राजकीय नेते रामाचे दोन पुत्र लव आणि कुश हे अनुक्रमे कुर्मी व कोयरी समाजाचे असल्याचाही दावा करताना आढळतात आणि त्यांच्या समाजाची मते मागत आहेत.

मति गुंग करणारे हा जातिनिष्ठ राजकारण आहे!

एक मात्र खरे की हिंदुत्व आणि धार्मिक ध्रुवीकरणाचा कितीही प्रयत्न केला तरी सामाजिक न्यायाचे मुद्दे त्यापेक्षाही अधिक प्रभावी ठरतात!

याचा अर्थ उत्तर प्रदेशात सामाजिक न्यायाच्या शक्ति विजयी होतील असा लावायचा काय???



# संसदेचे अर्थसंकल्पी अधिवेशनही धुतले जाणार?

काय योगायोग असतात पहा?

संसदेचे अर्थसंकल्पी अधिवेशन ३१ जानेवारीला सुरु झाले. पण त्याच्या दोन-तीन दिवस आधीच न्यूयॉर्क टाइम्स या वृत्तपत्राने एक गौप्यस्फोट करुन भारत सरकारने पेगॅसस स्पायवेअर इस्रायलमधील कंपनीकडून खरेदी केले असल्याची बातमी प्रसिध्द केली.

अर्थसंकल्पी अधिवेशनाच्या ऐन तोंडावरच हा पेगॅससचा नवा गौप्यस्फोट झाल्याने खळबळ उडणे आणि त्याचे पडसाद या अधिवेशनात उमटणेही ओघाने आलेच.

अर्थसंकल्पी अधिवेशनात प्रामुख्याने आर्थिक मुद्यांनाच प्राधान्य असते. अर्थसंकल्पपूर्व आर्थिक पाहणी अहवाल, प्रत्यक्ष केंद्रीय अर्थसंकल्प, त्यावरील सर्वसाधारण चर्चा आणि त्यानिमित्ताने देशाची एकंदर अर्थव्यवस्था कोणत्या अवस्थेत आहे याची छाननी, आढावा घेतला जातो.

हे अधिवेशन दोन भागात असते.






पहिल्या भागात आर्थिक पाहणी अहवाल व प्रत्यक्ष अर्थसंकल्प सादर केला जातो. त्यानंतर त्यावर सर्वसाधारण चर्चा होते.

यानंतर विविध मंत्रालयाशी निगडित संसदीय स्थायी समित्या मंत्रालयांच्या अनुदानविषयक मागण्यांची छाननी करतात व त्यासाठी तीन आठवडे संसदेच्या दैनंदिन कामकाजाला सुटी दिली जाते.

तीन आठवड्यानंतर अधिवेशनाचा उत्तरार्ध सुरु होतो. त्यामध्ये काही मंत्रालयांच्या मागण्यांवर प्रत्यक्ष चर्चा केली जाते. त्यांना मंजुरी दिली जाते. सर्वात महत्वाचा भाग असतो तो २०२२-२३साठीच्या वित्तविधेयकाला लोकसभेची मंजुरी घेतली जाते. त्यानिमित्ताने अर्थसंकल्पाची तपशीलाने चर्चा केली जाते. सरकारही एकंदर आढावा घेऊन अर्थसंकल्पात काही सुधारणा किंवा बदल करायचे असतील तर वित्त विधेयकाच्या मंजुरीच्या निमित्ताने करुन संबंधित वर्गांना दिलासा देण्याचे काम करीत असते.

पहिला भाग ८ फेब्रुवारी रोजी संपणार आहे. पूर्वी रेल्वे अर्थसंकल्पही असे. पण २०१४मध्ये भारतात जे स्थित्यंतर झाले त्यानंतर वेगळा रेल्वे अर्थसंकल्प रद्द करण्यात आला. त्यामुळे आपोआपच पहिला भाग आणखीनच लहान किंवा आक्रसत गेला आहे.

त्यातच भर म्हणून पेगॅससचा गौप्यस्फोट झाल्यामुळे विरोधक त्या मुद्यावर आक्रमक होणेही क्रमप्राप्तच आहे. काँग्रेस आणि इतरही प्रमुख राजकीय पक्षांनी या बातमीवर प्रतिक्रिया देताना 'हा प्रकार म्हणजे निव्वळ देशद्रोह' असल्याची तीव्र प्रतिक्रिया दिली आहे. तसेच या मुद्यावर पंतप्रधानांनी म्हणजेच



सरकारने संसदेची दिशाभूल केली व खोटी माहिती दिल्याचा आरोप करुन विरोधी पक्षांनी हक्कभंगाची सूचनाही दिली आहे. अर्थात हक्कभंग असो किंवा स्थागन प्रस्ताव असो, या सूचना सरसकट फेटाळण्याचा विक्रम २०१४ पासून या देशाच्या संसदेत सुरु आहे. त्यामुळे विरोधी पक्षांनी सरकारच्या विरोधात कोणतेही आणि कितीही प्रस्ताव दिले तरी त्या नियमाअंतर्गत चर्चेची परवानगी मिळण्याची सुतराम शक्यता नाही हे सूर्यप्रकाशाइतके स्पष्ट आहे. मग विरोधी पक्षांच्या हातात काय उरते? गोंधळ, आदळआपट आणि संसदेचे कामकाज बंद पाडणे!

........................आणि सरकारला नेमके हेच हवे असते!

गोंधळ करुन संसदीय कामकाज बंद पाडल्याबद्दल विरोधी पक्षांना बदनाम करणे आणि त्याचबरोबर करोना आणि इतरही अनेक कारणांमुळे अर्थव्यवस्थेची लागलेली वाट, प्रचंड वाढती बेकारी, अर्थव्यवस्थेत आलेली मरगळ, वाढती महागाई अशा जनतेला चटके देत असलेल्या मुद्यांवरील चर्चेलाही फाटा मिळतो आणि ते विषय आपोआपच मागे पडतात.

सरकारला त्यावर स्पष्टीकरण देण्याचीही गरज भासत नाही.

सारे काही सरकारला पाहिजे तसे होते. सरकारला अडचणीचे ठरणारे हे विषय आपोआपच दुर्लक्षिले जातात.

.................आणि हो, सरकारला हेच हवे असते!

पेगॅसस स्पायवेअरच्या मदतीने आपल्या विरोधकांवर नजर ठेवण्याचे सरकारचे कामही बिनबोभाट चालू राहील!

आनंदी आनंद गडे.............
.................!!!

# दारूबंदीची भाकड कथा!

बिहार सरकारने दारूबंदीचे धोरण अमलात आणले असले तरी त्याची परिणामकारकता फारशी नाही.

उलट दारूबंदी केल्याने दारूच्या चोरट्या धंद्याला फारमोठी तेजी येत असते. हे अतिशय अप्रिय व कडवट असे वास्तव आहे!

गुजरातमध्ये दारूबंदी आहे. खरोखरच एकही गुजराती व्यक्ती दारू पीत नाही असा निष्कर्ष त्यावरुन काढायचा का?

उलट दारूचा चोरटा धंदा करुन कितीजण गब्बर झाले असतील. यासंदर्भातल्या अनेक सुरस कहाण्या प्रसिध्द आहेत. बिहारमध्येही आता असाच प्रकार सुरु आहे.

या दारूबंदीमुळे घडणारे किस्सेही मनोरंजक होऊ लागले आहेत.

अलीकडेच बिहार पोलिसांना माहिती मिळाली की एका गोदामात चोरट्या दारूचा साठा लपविण्यात आला आहे.

पोलिसांनी छापा मारला.

पाहतात तो काय बटाट्याचे प्रचंड ढीग तेथे सापडले. त्या ढिगांची कसून







छाननी केल्यानंतर दारूच्या वाटल्या त्यात लपविलेल्या आढळल्या.

पोलिसांना डबल फायदा!

बटाटेही मोठ्या संख्येने मिळाले आणि दारूही!

पण बटाट्याचे करायचे काय?

मग पोलिसांनीही डोके लढवले. त्यांनी पोलिस ठाण्यात चक्क स्वस्त दराने बटाटे विकायला ठेवले आणि त्यातून कमाई केली.

आणखी एका जिल्ह्यातही असाच प्रकार घडला.

पोलिसांनी ज्या गोदामावर छापा टाकला तेथे, किराणा माल, लसूण,चिकन, अंडी, कांदे अशा वस्तुंमध्ये दारुच्या बाटल्या लपवून ठेवल्या होत्या. पोलिसांनी छाप्यानंतर या वस्तुंचीही विक्री केली.

बिहारमधील दारूबंदीच्या या सुरस व चमत्कारिक कहाण्या आहेत.

दारूबंदी करुन चोरट्या दारू पुरवठ्याचे पेव फुटण्याचा हा प्रकार आहे!

## आघाडीतली बिघाडी?? की कुरघोडी???

उत्तर प्रदेशातील विधानसभा निवडणुकीच्या निमित्ताने भाजपच्या नेतृत्वाखालील 'एनडीए' किंवा 'राष्ट्रीय लोकशाही आघाडी'मधील पक्षांच्या परस्परसंबंधांमधील तकलादूपणाही उघडकीस आला.

बिहारमध्ये भाजप आणि संयुक्त जनता दलाचे सरकार आहे. संयुक्त जनता दल(जेडी-यू) हा सर्वस्वी भाजपवर परावलंबी असलेला पक्ष आहे कारण केवळ भाजपच्या कृपादृष्टीमुळेच कमी संख्याबळ असूनही नीतीशकुमार यांना मुख्यमंत्रीपद देऊन उपकृत करण्यात आले. एकप्रकारे त्यांच्यावर भाजपने दाखविलेली ती दयादृष्टीच आहे.

आता उत्तर प्रदेशातही नीतीशकुमार यांचा हा पक्ष काही जागा लढवू इच्छित होता. त्यासाठी भाजपच्या नेत्यांशी त्यांनी बोलणी करण्याचे ठरविले. परंतु भाजपने बोलणे सोडाच पण या पक्षाच्या प्रतिनिधींना भेटही दिली नाही.

अखेर नीतीशकुमार यांनी त्यांच्या पक्षाचे अध्यक्ष राजीव रंजन उर्फ लल्लनसिंग यांना सांगून साधारणपणे पंधरा ते सोळा जागांवर पक्षाचे उमेदवार उभे करण्यास सांगितले.

परंतु हे सर्व करताना भाजपने





आणखी एक खेळ केला.

सध्या संयुक्त जनता दलाचे राज्यसभेतील नेते आरसीपी सिंग हे केंद्रीय मंत्री आहेत.

हे आरसीपी सिंग इतके भाजपच्या कह्यात आहेत की ते त्यांच्या पक्षालाच नव्हे तर नीतीशकुमार यांनाही फाट्यावर मारताना आढळतात.

भाजपने या सिंग यांना पूर्णपणे आपल्या कळपात घेऊन संयुक्त जनता दलाला चांगलाच शह दिलेला आहे.

उत्तर प्रदेशात भाजपच्या नेत्यांनी संयुक्त जनता दलाला फाट्यावर मारल्याचे सिंग यांनी समर्थन करताना उत्तर प्रदेशात आपल्या पक्षाचे काहीच स्थान नसल्याचा युक्तिवाद नीतीशकुमार यांच्याजवळ केल्याचे समजते.

नीतीशकुमार यांना मुकाटपणे सिंग यांचे भाजपचा आलेला पुळका सहन करण्याखेरीज पर्याय नव्हता कारण नीतीशकुमार यांचे आसन केवळ आणि केवळ भाजपच्या कृपेवर अवलंबुन आहे. ही राजकीय आगतिकता सहन करीतच नीतीशकुमार मुख्यमंत्रीपद उपभोगत आहेत. पण भाजप आणि संयुक्त जनता दलामध्ये तळ्यात-मळ्यात चालूच असते.

उत्तर प्रदेशात संयुक्त जनता दलाला भाजपने दुर्लक्षित केले.

परंतु सध्या बिहारमध्ये रेल्वेभरतीच्या मुद्यावरुन प्रचंड गदारोळ सुरु आहे. रेल्वेभरतीसाठी आलेल्या उमेदवारांनी परीक्षा पध्दतीवर हरकत घेऊन आंदोलन सुरु केले.

रेल्वे हा काही राज्याचा विषय नाही आणि थेट केंद्र सरकारच्या अधिकारातील विषय असल्याने नीतीशकुमार यांनी तत्काळ आंदोलनाला पाठिंबा दिला.

या आंदोलनात सर्व विरोधी पक्षही सामील झाले होते. यामुळे भाजपला बचावाच्या पवित्र्यात जावे लागले.

थोडक्यात काय? आघाडीत बिघाडी होत राहते आणि वेळोवेळी कुरघोडी देखील!

## याला न्याय म्हणायचे काय?

महाराष्ट्रातील आमदार नितेश राणे यांच्यावर एका राजकीय कार्यकर्त्यावर हल्ला, मारहाण करण्याचे आणि त्याच्या जिवाचे बरेवाईट करण्याच्या हेतु असल्याचा आरोप आहे.

अटक टाळण्यासाठी त्यांनी सर्वोच्च न्यायालयापर्यंत मजल मारली.

सर्वोच्च न्यायालयाने त्यांना दहा दिवस अटक करु नये असा आदेश देतानाच त्यांना स्थानिक कोर्टात जाण्याचा आदेश दिला.

थोडक्यात एकप्रकारे त्यांना दिलासाच दिला.

पण असे दिलासे आणि तेही विशिष्ट व्यक्तींना देण्याची एक मालिकाच डोळ्यासमोर उभी राहते आणि मग प्रश्न पडतो की न्यायालयात खरोखरच



सामान्य माणसाला न्याय मिळतो का?

..................आणि पुढचा प्रश्न मनात येतो की काही अतिविशिष्ट व्यक्तींसाठी कायदा वेगळा असतो काय? मुंबईचे माजी पोलिस आयुक्त परमबीरसिंग यांचे उदाहरण घ्या!

ते तर बेपत्ता व फरारी होते. परंतु जेव्हा त्यांनी पोलिसांसमोर हजर राहण्याची तयारी दर्शविली तेव्हा तत्काळ सर्वोच्च न्यायालयाने त्यांच्याविरुध्द कारवाई किंवा कठोर कारवाई (कोअर्सिव्ह ॲक्शन)करु नये असे सांगून पोलिसांवर मर्यादा टाकली.





या परमबिरसिंगविरुध्द अनेक गंभीर आरोप आहेत. अगदी खंडणीवसुलीपासून ते कोर्टासमोर शपथेवर खोटे प्रतिज्ञापत्र देण्यापर्यंत!

परंतु तरीही त्याला सवलती मिळतात!

एक अत्यंत वाह्यात चित्रपट अभिनेत्री आहे आणि ती म्हणे केंद्रातील प्रमुख नेत्यांची निकटवर्ति आहे. तिच्याविरुध्दही अनेक गंभीर आरोप व तक्रारी पोलिसांकडे नोंदलेल्या आहेत. पण त्या तारकेलाही न्यायालयीन संरक्षण प्राप्त आहे. तिला आजपर्यंत अटक होऊ शकलेली नाही.

असेच आणखी एक राजकीय नेते आहेत. अकाली दलाचे विक्रमसिंग मजीठिया असे त्यांचे नाव आहे.

पंजाबचे अत्यंत सन्माननीय नेते प्रकाशसिंग बादल यांची सून हरसिम्रत कौर यांचे हे विक्रमसिंग बंधू आहेत.

पंजाबमधील वादग्रस्त मादक पदार्थ तस्करीच्या प्रकरणात त्यांचे नाव प्रमुख आहे. इतरही अनेक आर्थिक अपराधांचे आरोप त्यांच्या विरुध्द आहेत. तेही काही काळ फरारी व बेपत्ता होते. त्यांनीही पोलिसांसमोर येण्याची तयारी दर्शविताच दयाळू न्यायदेवतेला त्यांच्याबद्दल दयेचा असा काही पाझर फुटला की न्यायदेवतेने त्यांच्याविरुध्दही कारवाई करण्यापासून पोलिसांना रोखले.

व्वा रे व्वा! कमाल आहे या न्यायदेवतेची!

मानवाधिकार, नागरी

स्वातंत्र्याच्या मुद्यांवर लढा देणाऱ्या सामाजिक कार्यकर्त्यांना खोट्यानाट्या आरोपांखाली दीर्घकाळ जामीन न देता डांबून ठेवणारी न्यायदेवता आणि मोकाट अपराध्यांना सवलती देणारी न्यायदेवता! ऐंशी वर्षांचे वय असलेल्या फादर स्टेन यांच्यासारख्या व कंपवाताने ग्रासलेल्या एका वयोवृध्द सामाजिक कार्यकर्त्याला दोन कानाचा कप पाहिजे म्हणून तुरुंगात उपोषण करावे लागते आणि अखेरपर्यंत त्याला पाणी पिण्यासाठी सोयीचा असलेला दोन कानांचा कप न मिळता त्याला मरण येते! गौतम नवलखा, आनंद तेलतुंबडे आणि त्यांच्याच बरोबरीच्या सामाजिक कार्यकर्त्यांना या न्यायदेवतेने तुरुंगात खितपत ठेवलेले आहे. याला न्याय म्हणायचा काय???



## संसदेपासून पत्रकार आणि माध्यमे लांबच!

२०१४मध्ये या देशात सत्तेत आलेले सरकार आणि या सरकारचे नेतृत्व यांना माध्यमे व पत्रकारांची मूलभूत 'ॲलर्जी' आहे. या सरकारचे प्रमुख त्यांच्या पक्षाच्या खासदार व मंत्र्यांना जाहीरपणे आदेश देत असतात की, त्यांनी माध्यम प्रतिनिधी व पत्रकारांशी बोलू नये आणि त्यांच्याबरोबर गप्पा मारण्यात व्यर्थ वेळ दवडू नये!

एकीकडे लोकशाही देश असल्याच्या फुशारक्या मारायच्या आणि त्यामुळे मिळणारे लाभ लाटायचे. परंतु पत्रकार आणि माध्यमांना माहितीचा मूलभूत अधिकार नाकारायचा!

अशा या दिवाभीत किंवा 'माध्यमभीत' सरकारला करोना साथीचे एक निमित्तच मिळाले. त्यांनी २०२०च्या मार्च महिन्यानंतर पत्रकारांच्या संसद संकुलातील प्रवेशावर निर्बंध घातले.

अधिवेशनकाळात संसदीय कामकाजाचे वार्तांकन करण्यावरही



मर्यादा घालण्यात आली. केवळ सरकारी माध्यमे (आकाशवाणी, दूरदर्शन इ.), वृत्तसंस्था आणि तथाकथित बडी वृत्तपत्रे यांनाच वार्तांकनासाठी रोजच्यारोज परवानगी देण्यात आली आहे. इतर भाषिक वृत्तपत्रांना केवळ एक किंवा दोन दिवसांसाठी नुसते तोंडी लावण्यापुरते वार्तांकन करण्याची संधी दिली जात आहे. या सरकारचा ढोंगीपणा निर्विवाद आहे. बाहेर सर्वत्र निर्बंध उठविले जात आहेत. परंतु संसदेत मात्र ते कायम राखले जात आहेत.

संसदीय लोकशाहीत संसदेने जनतेसमोर आदर्श ठेवायचा असतो. परंतु भारतात बरोबर याच्या उलटे घडत आहे कारण राज्यकर्त्यांनाच संसदेच्या आसपासही कुणी फिरकायला नको आहे. पत्रकारांना सेंट्रल हॉल कायमस्वरुपी बंद करण्यात आला आहे. आता जुने संसदगृह संग्रहालयात रुपांतरित होणार आहे. नव्याने बांधण्यात येणाऱ्या संसदगृहात सेंट्रल हॉलसारखी जागाच ठेवण्यात आलेली नाही. आता तर संसदेचे मोबाईल ॲप विकसित करण्यात आले आहे. त्याद्वारे पत्रकारांना आणि ज्यांना संसदीय कामकाजात रस आहे त्यांना संसदेतील घडामोडींची सर्व माहिती मोबाईलवरच उपलब्ध होणार आहे. अगदी संसदेतील चर्चाही मोबाईलवर पाहता येणे शक्य होणार आहे. या सर्वाचा अर्थ काय?

सरकारचे नेते फुशारक्या मारत हेच सांगतील की पहा, आम्ही संसदेचे कामकाज घराघरात पोहोचविले. परंतु त्यात एक गोष्ट मुद्दाम जोडणार नाहीत की सरकार जे दाखवील तेवढेच मोबाईल ॲपवर उपलब्ध होईल.

संसदेत पत्रकारकक्षात बसून संसदीय कामकाजाचे अवलोकन करुन त्याचे वार्तांकन करण्याची सत्तर वर्षांची परंपरा होती. त्यामध्ये जिवंतपणा असायचा कारण पत्रकार प्रत्यक्ष डोळ्यांनी अवलोकन करुन व कानाने ऐकून संबंधित चर्चांचे वार्तांकन करीत असे. आता तो जिवंतपणा नाहीसा करण्यात आला आहे. अशा या डिजिटल प्रकाराने पोहोचणारे कामकाज किती निर्जीव व यांत्रिक स्वरुपाचे असेल याची कल्पनाच केलेली बरी!

या सरकारवर अघोषित आणीबाणी व माध्यमांवर नियंत्रणे लागू करण्याचा आरोप नेहमीच केला जातो तो या वर उल्लेख केलेल्या गोष्टींमुळे!

या सरकारने आपला एक खाक्या बनवलेला आहे. जे पाळीव आहेत त्यांना खूष करुन त्यांच्या मदतीने सरकारी गुणगानाचे डंके पिटत रहायचे.

कुणी एखाद्याने सरकारला चार बोल सुनावण्याची भूमिका घेतलीच तर त्याला अनुल्लेखाने मारायचे किंवा त्याच्यामागे ससेमिरा लावून त्याला सळो की पळो करुन सोडायचे.

माध्यमांना मोठमोठ्या जाहिराती देऊन बटीक बनवून ठेवायचे हाही याच धोरणाचा एक भाग आहे. या युक्ति व चलाखीचे सर्वात मोठे उदाहरण योगीमहाराज आदित्यनाथ आहेत.

थोडक्यात काय? सर्वंकष अशा एकाधिकारशाहीकडे भारताची वाटचाल सुरु आहे!

■■



|अभंग वारसा|
लेख-१





# दोन संत, विचार एकच

सचिन परब

**विठ्ठलाच्या भक्तीतून सामाजिक परिवर्तन घडवणाऱ्या संतांनी महाराष्ट्रातलं पुरोगामीपण घडवलंय. हा आपला खरा वैचारिक वारसा आहे. म्हणून त्यांच्या विचारांची ओळख करून देणारं हे एकपानी सदर.**

जें कां रंजले गांजले। त्यासि म्हणे जो आपुलें॥
तो चि साधु ओळखावा। देव तेथें चि जाणावा॥
मृदु सबाह्य नवनीत। तैसें सज्जनाचें चित्त॥
ज्यासि आपंगिता नाहीं। त्यासि धरी जो हृदयी॥
दया करणें जें पुत्रासी। ते चि दासा आणि दासी॥
तुका म्हणे सांगू किती। तोचि भगवंताची मूर्ती॥

Know him to be a true man who takes to his bosom those who are in distress. Know that God resides in the heart of such a one. His heart is saturated with gentleness through and through. He receives as his only those who are forsaken. He bestows on his man servants and maid servants the same affection he shows to his children. Tukaram says: What need is there to describe him

further? He is the very incarnation of divinity.

आपल्याला थोडंफार इंग्रजी येत असेल, तरी हा अनुवाद सहज कळतो. अगदी सोप्पा. इतकं सोपं असणं खूपच कठीण असतं. कारण हे फक्त भाषांतर नाही, अनुवाद आहे. अभंगातला फक्त अर्थच नाही तर भावही इथे सहज साहेबाच्या भाषेत उतरतो. जेव्हा विचार एकजीव झालेले असतात, तेव्हाच असं होऊ शकतं.

खरा धर्म आणि खरा देव सांगणारा हा अभंग संतश्रेष्ठ तुकोबारायांचा आहे, हे वेगळं सांगायला नको. पण त्याचा हा इंग्रजी अनुवाद कोणाचा आहे, हे कळलं तर अनेकांना आश्चर्य वाटू शकतं. हा अनुवाद राष्ट्रपिता महात्मा गांधींनी केलाय. गांधीजींनी या एकाच नाही तर तुकोबारायांच्या सोळा अभंगांचा अनुवाद केलाय. तेही त्यांना जिवे मारण्याच्या योजना जिथे आखल्या गेल्या, त्या पुण्यातल्या येरवडा तुरूंगात बंदी असताना.



हा काही साहित्यिक उपक्रम नव्हता. तो त्यांच्या जगण्यावर सुरू असलेल्या जगण्याच्या प्रयोगांचा एक भाग होता. त्यांची प्रयोगशाळा असलेल्या आश्रमाच्या दिनचर्येसाठी त्यांनी 'आश्रम भजनावली' तयार केली. यात देशभरातल्या विविध संतांच्या निवडक रचना सगळ्यांना कळाव्यात म्हणून इंग्रजीत आणल्यात. त्यातले तुकोबांचे अभंग आणि त्याचे अनुवाद आपल्याला मोहवतात. देशभरातल्या आपल्या आधीच्या संतांच्या विचारांचे तुकडे जोडत त्यांनी जणू गांधीवादच उभा केलाय.

हे अनुवाद वाचताना जवळपास अडीच शतकांचा काळ भेदून तुकोबा आणि गांधीजी हे दोन वैष्णव एकजीव होताना दिसतात. विशेषतः यातल्या अभंगांच्या निवडीतून ते जाणवतं. तुकोबांचे काही हजार अभंग उपलब्ध आहेत. त्यातले फक्त सोळा अभंग निवडणं हे कठीण काम होतं. पण कुणीही सांगेल गांधीजींची निवड अफलातून आहे. विचार आणि जगणं सारखं असेल तरच हे शक्य आहे.

हे जगणं पाहीलं तर तुकोबारायांनी सांगितलेल्या संतत्वाच्या कसोट्यांवर हे दोघे वैष्णव खरे संत ठरतात. या दोघांनीही रंजल्या गांजलेल्यांना आपलं म्हटलं. ज्यांचं कुणी नाही त्यांना हृदयाशी धरलं. समाजाने उपेक्षित ठरवलेली कामं करणाऱ्या दासदासींना पोटच्या पोरांसारखं प्रेम दिलं. त्यामुळे सर्वसामान्य लोकांनीही या लोण्यासारखं मऊ मन असणाऱ्या तुकोबा आणि गांधीजींमधला साधू ओळखला आणि देवही जाणला.

सत्यशोधक चळवळीतले कार्यकर्ते नागपूरचे डॉ. इंदुभूषण भिंगारे आणि कृष्णराव देशमुख यांनी १९४८ साली तुकोबांचा गाथा 'तुकाराम की राष्ट्रगाथा' या नावाने हिंदीत संपादित केला. त्याची प्रस्तावना गांधीजींनी लिहिली होती. त्यात चुका राहू नयेत म्हणून तो गांधीजींनी कुंदर दिवाण यांच्याकडून तपासून घेतला. त्यासाठी शांतिनिकेतनमधील जगप्रसिद्ध चित्रकार नंदलाल बोस यांच्याकडून तुकोबांची चित्रं काढून घेतली.

तुकोबा आणि गांधीजी या दोघांनीही आपापल्या काळात खरा धर्म लोकांपर्यंत पोचवल्यामुळे धर्माच्या नावाने चालणारी दुकानं बंद पडू लागली होती. खोट्या धर्माच्या दुकानदारांनीच तुकोबारायांची गाथा इंद्रायणीत बुडवली आणि गांधीजींची हत्या केली. या दोघांचीही जात काढून त्यांना अधिकार नाकारण्यात आले. दोघांनीही त्यावर उग्र प्रहार केले. या बुरसटलेल्या विचारांशी संघर्ष करण्यासाठी सेवेचा मार्ग दाखवला.

हेच त्या दोघांमधलं खरं साम्य होतं. पण वैचारिक गोंधळ उडवून ते साम्य नाकारण्याचे प्रयत्न आज सुरू आहेत. या दोघांनाही विरोध करणाऱ्या सनातन्यांचे एकविसाव्या शतकातले वारसदार दोघांच्याही नावाने जयघोष करण्यात आघाडीवर आहेत. त्यामुळे आज या रंजल्या गांजलेल्या आपलं मानणाऱ्या खऱ्या साधूंमधलं अद्वैत पुन्हा पुन्हा सांगण्याची गरज आहे.

**(लेखक पत्रकार असून रिंगण या संतविचारांचा सामाजिक सांस्कृतिक मागोवा घेणाऱ्या वार्षिकाचे संपादक आहेत.)**

■■

# शेवटचे पान



# शिक्षणाचा 'खेळ खंडोबा'

काही वर्षापूर्वी ख्यातनाम निर्माते दिग्दर्शक व्ही. शांताराम ह्यांचा 'पिंजरा' हा चित्रपट खूप गाजला होता. डॉ. श्रीराम लागूंनी 'मास्तर' साकारला होता. एका ध्येयवेड्या शिक्षकाचे अध:पतन हा कथेचा गाभा होता. 'पिंजरा' ची लोकप्रियता तमाशापट म्हणून थोडी बाजूला ठेवली तरी सुमारे पन्नास वर्षापूर्वीचे 'गुरुजींचे चरित्र' (?) आणि आजचे वास्तव यात विलक्षण साम्य आहे. तर आजचे 'गुरुजी' म्हणजे 'मास्तर' जे माध्यमांमध्ये मशहूर झालेले आहेत ते. ते म्हणजे 'डिसले गुरुजी'. एक भला मोठा पुरस्कार तो ही आंतरराष्ट्रीय पातळीवरचा हा आपल्या महाराष्ट्रातील 'कोहिनूर' च ठरला. अफाट प्रसिद्धी मिळाल्यावर डिसले गुरुजींच्या सत्कारांची मालिकाच सुरू झाली. इतकं मोठेपण मिळाल्यावर गुरुजी पण शिक्षण पेशातल्या परिवर्तनाची आवई उठवू लागले. हे महाराज सोलापूर जिल्ह्यातील ग्रामीण शाळेतील प्राथमिकचे शिक्षक. त्यांची 'डायट' प्रकल्पावर प्रतिनियुक्ती झाली होती. तिकडे ते फिरकले सुध्दा नाहीत आणि घरबसल्या वेतन मिळविले. थोडे थोडके नाही तर तब्बल बत्तीस महिने. ह्या धुंदीतच त्यान शिक्षण विभाग व संबंधीत शिक्षणाधिकारी ह्यांचा मुलाहिजा ठेवला नाही. एवढच काय त्यांच्या दुरध्वनीलासुध्दा प्रतिसाद दिला नाही. हे महाभारत घडत असताना डिसले गुरुजीना अमेरिकेची आणखी एक शिष्यवृत्ती मिळाली. आता त्यांना फॉरेन रिटर्न शिक्षक म्हणून शिक्कामोर्तब करण्याची संधी आली होती. त्यासाठी त्यांनी वर्षभराच्या रजेचा अर्ज केला होता. तो नामंजूर झाल्यावर सगळीकडे हाकाटी पिटण्यात आली कि केवढा अन्याय होतोय गुरुजींवर. मग काय डिसले गुरुजींच्या केसमध्ये थेट राज्याच्या शिक्षण मंत्र्यांनी हस्तक्षेप करून त्यांची रजा मंजूर केली आणि गुरुजींच्या परदेश गमनाला हिरवा झेंडा दाखविला गेला. आता येत्या वर्ष दोन वर्षात गुरुजींना गेला बाजार 'पद्मश्री' पुरस्कार तरी नक्कीच मिळणार. आपल्या शिक्षण व्यवस्थेत होत असलेल्या अशा घटनांमुळे आपण तेवढ्या पुरते अस्वस्थ होतो. पुढे मग ना खंत ना खेद. ह्या बरोबरीने दुसरी बातमी अशीच झळकतेय. शिक्षकांसाठीच्या TET परीक्षेत ते घोटाळे बाहेर आले आहेत. राज्यात फेब्रुवारी २०१३ नंतर नियुक्त्या झालेल्या पहिले ते आठवीच्या शिक्षकांची TET प्रमाणपत्रांची आणि गुणपत्रिकांची तपासणी होणार आहे अशी तब्बल सहा हजार प्रमाणपत्रे जमा करण्यात आली आहेत. हे षड्यंत्र घडवून आणणारी मोठी टोळीच सध्या चर्चेमध्ये आहे. त्यांनी उमेदवारांना पात्र करण्यासाठी OMR मध्ये फेरफार, गुण वाढवून देणे आणि थेट प्रमाणपत्र दिल्याचे आढळून आले आहे. हे सर्व





घडविण्यासाठी लाखों रुपयांची देवघेव झाली आहे. तब्बल सहा हजार शिक्षक अपात्र ठरतील आणि शिक्षकांविना शाळा अशी परिस्थिती सुद्धा येईल. आपल्या शिक्षण क्षेत्राचा असा खेळ खंडोबा झाल्यावर नव्या पिढीचे भविष्य अंधकारमय होणार हे सांगायला कुण्या ज्योतिषाची गरजच पडणार नाही. राजकारणापलीकडे जाऊन शिक्षण क्षेत्रातील ही 'घाण' साफ करायची वेळ आली आहे हे मात्र नक्की.